नातळोनि दुजेपण । एका जनार्दना शरण । धरोनि श्रोत्यांचे चरण । पुढील अनुसंधान पावेल ।। ७४ ।।
एकाजनार्दन नांवें देख । दों नांवीं स्वरूप एक । हें जाणे तो आवश्यक । परमसुख स्वयें पावे ।। ७५ ।।
एकाजनार्दना शरण । त्याची कृपा परिपूर्ण । पंचाध्यायी निरूपण । झाली संपूर्ण जनार्दनकृपा ।।५७६।।
इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे वसुदेवनारदसंवादे एकाकारटीकायां पंचमोऽध्यायः ।। ५ ।।

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

# अध्याय सहावा.

श्रीगणेशाय नमः ।।ओं नमो श्रीजनार्दन । भावार्थें नमितां चरण । जनांसहित मीपण । नाहींच जाण स्वयें केलें ।। १ ।। लिंगदेहाचें मर्दन । तेंचि जनाचें अर्दन । यालागीं नामें जनार्दन । प्रगट जाण प्रसिद्धी ।। २ ।। तुझी ऐशीच करणी । कर्म कर्ता नुरवूनी । सुखें नांदविसी जनीं । समाधानीं जनार्दना ।। ३ ।। सुखेंचि तुझें नाम घेतां । घातु करिसी जीविता । जीऊ घेऊनि तत्त्वतां । होसी सर्वथा कृपाळू ।। ४ ।। तुझे नामाचें प्रबळ बळ । माथा नुधविती कळिकाळ । चारी मुक्ति केवळ । होती निश्चळ निजदासी । ।। ५ ।। नामें एवढें ढसाळ देणें । त्या तुझें स्वरूप कवण जाणे । सांडूनि जाणणें नेणणें । निवांत राहणें तत्त्वतां ।। ६ ।। तुझा स्तुतिवादु करणें । तंव परतलीं श्रुति-पुराणें । तेथ माझें आरिख बोलणें । कोठें कोणें सारावें ।। ७ ।। तुझा स्तुतिवादु तें मौन । तुझा कळवळा तें कीर्तन । कांहीं न

---

द्वैतभावाला स्पर्शहि न करितां एकनाथ जनार्दनस्वामींना शरण जाऊन, श्रोत्यांचें चरण धरून, पुढील कथानक सांगेल. ७४ एकनाथ व जनार्दन हीं नांवें दोन, पण दोघांचें स्वरूप एकच आहे, असें जो जाणतो तो परमसुखाला प्राप्त होतो. ७६ एकनाथानें जनार्दन स्वामींना शरण जाऊन त्यांच्याच पूर्णकृपेनें या पंचाध्यायीचें निरूपण संपविलें, ही त्यांचीच कृपा होय. ५७६. ( ५ )

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह निमिजायंतसंवादांतील
वसुदेव-नारदसंवादनांवाचा पांचवा अध्याय समाप्त झाला.

हे जनार्दनस्वामी ! तुला नमस्कार असो. भक्तिभावानें तुझ्या चरणांना वंदन करतांच जनांसह ' मीपणा ' आपोआप नाहींसा होतो. १ सूक्ष्म देहाचा नाश म्हणजेच जनांचा नाश होय. म्हणून तूं ' जनार्दन ' या नांवानें प्रसिद्ध झालास. २ हे जनार्दना ! तुझी करणी अशीच आहे. कर्म व कर्ता यांना न उरवितां तूं जनांमध्यें सुखानें नांदत आहेस. ३ प्रेमानें तुझें नांव घेतांच तूं ' जीवपणाच ' नाहींसा करितोस. जीवाचें हरण करून मग खरोखर कृपा करितोस. ४ तुझ्या नांवाचें सामर्थ्य मोठें दांडगें आहे. त्यामुळें कळिकाळहि डोकें वर काढीत नाहीं. चारी मुक्ति केवळ दासी होऊन मुकाट्यानें रहातात. ५ तुझ्या नांवाचा प्रभाव जर एवढा मोठा आहे, तर तुझें स्वरूप कोण जाणूं शकणार ? तेव्हां जाणणें व न जाणणें हीं दोन्हीं सोडून स्वस्थ बसावें, हें बरें. ६ तुझी स्तुति गाण्यांत श्रुति व पुराणेंहि थकलीं, तेथें माझें बोबडें बोलणें कोणाला व कसें रुचणार ! यास्तव हे श्रीकृष्णा ! गप्प बसणें हेंच तुझें

करणें तें अनुसंधान । साचार जाण श्रीकृष्णा ॥८॥ ऐशियाही अर्थीं तुझे ठायीं । अचाट हांव उठिली पाहीं । तेचि अर्थीं चित्त देईं । कृपानिर्वाही गुरुराया ॥ ९ ॥ खद्योत प्रकाशूं पाहे चांदा । मशक गरुडासी घे खांदां । तैसा मी एकादशस्कंधा । मूर्ख नुसधा टीकार्थीं ॥ १० ॥ येचि विषयीं गुरुनाथा । कृपा करावी सर्वथा । ग्रंथरचना ग्रंथार्था । सार्थकता करावी ॥ ११ ॥ ऐशी विनवणी ऐकतां । कृपापद्मकरु ठेविला माथां । तंव उद्योत्कार जाहला ग्रंथा । यथार्थता निजदीपें ॥ १२ ॥ नवल कृपेची करणी । अर्थचिंतामणींची खाणी । उघडली तत्क्षणीं । पदार्थश्रेणी कविमुद्रा ॥ १३ ॥ लेतां सिद्ध अलंकारा । कवण सांकडें लेण्हारा । ताला राखतां खांबसूत्रा । लेपाच्या करा प्रयास काय ॥ १४ ॥ बापाचीं पक्वान्नें घेउनी । बाळ घाली बापाचे वदनीं । तेणें साचाचि तो संतोषोनी । होय मनीं सुखाचा ॥ १५ ॥ तैशीच हेही कथा । तूंचि ग्रंथु तूंचि कविता । तेथ कोणीं घ्यावी अहंता । मी कर्ता म्हणोनी ॥ १६ ॥ गुरुनें सांडविली अहंता । शेखीं राहों नेदीच सोहंता । तेथ मी एकु कवि कर्ता । हेंही सर्वथा न सरे पैं ॥ १७ ॥ सूचितां अहंकाराचा झाडा । सूचनाचि होय त्याचा जोडा । जो आपणियातें म्हणवी वेडा । तोचि गाढा अतिचतुर ॥ १८ ॥ तैशीच हेही होईल वार्ता । यालागीं श्रीगुरुनाथा । चरणीं ठेविला माथा । कर्ता करविता तूंचि तूं ॥ १९ ॥ मागील ग्रंथसंगती । पंचमाध्यायाचे अंतीं । नारद वसुदेवाप्रती । बोलिला उपपत्ति ते ऐशी ॥ २० ॥ हा परमात्मा श्रीहरी । लीलाविग्रहें देहधारी । अवतरला तुमचे घरीं । भाग्यें करी नटनाट्यें ॥ २१ ॥ हा ईशाचाही निजईशू । वैकुंठींचा निजवासू । परमात्मा परेशू । जगदीशू श्रीकृष्णु ॥ २२ ॥ तेंचि नारदवचनप्रमाण । प्रार्थावया श्रीकृष्ण । मिळवोनियां देवगण । द्वारकेसी जाण स्वयें आले ॥ २३ ॥

---

स्तुतिस्तोत्र, कळवळा हेंच तुझें कीर्तन व कांहीं न करणें हेंच तुझें चिंतन. ८ अशा तुझ्याविषयीं अचाट हांव सुटली आहे. हे गुरुराया ! कृपा करून त्याच अर्थाकडे लक्ष दे. ९ काजव्यानें चंद्राला प्रकाशित करूं पहावें किंवा डासानें गरुडाच्या खांद्यावर बसावयास जावें, त्याप्रमाणें मी केवळ मूर्ख अकराव्या स्कंधावर टीकार्थ करण्यास प्रवृत्त झालों आहें. १० तरी हे गुरुश्रेष्ठा ! याविषयीं माझ्यावर पूर्ण कृपा करावी व ग्रंथरचना करण्यांत मला यथार्थ सांगून त्याचें सार्थक करावें. ११ ही विनंति ऐकून गुरुरायानें आपला कृपेचा वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेविला. त्याबरोबर आत्मज्योतीच्या प्रकाशानें ग्रंथाचा यथार्थ प्रकट झाला. १२ तुझ्या कृपेची करणी आश्चर्यकारक आहे. तिनें तत्काल अर्थरूपी चिंतामणींची खाणच उघडली. १३ मग शब्दार्थज्ञ विद्वानांना ते सिद्ध अलंकार अंगावर घालतांना श्रम कसले ? किंवा कळसूत्री बाहुलीकडून ताल धरविला तर तिच्या चिंध्यांनीं बनविलेल्या हातांना त्रास कसला होणार ? १४ तथापि बापाच्या ताटांतलें पक्वान्न घेऊन बालकानें तें बापाच्या तोंडांत घातलें तर त्यापासून त्या बापाला खरोखर सुख वाटतें व त्याचें मन प्रसन्न होतें. १५ त्याचप्रमाणें येथें स्थिति आहे. ग्रंथहि तूंच आणि कविताहि तूंच. तेथें ‘ मी कर्ता ’ असा खोटाच अभिमान कोणीं धरावा ? १६ गुरूनें अहंकार टाकविला व शेवटीं ‘ सोहं ’ ही भावनाहि शिल्लक ठेविली नाहीं; त्यामुळें मी कवि किंवा मी कर्ता अशी भावना मुळीं उरलीच नाहीं. १७ लौकिक अहंकाराचा त्याग करूं गेल्यास शास्त्रीय अहंकार चिकटतो, म्हणून जो स्वतःला वेडा समजतो, तोच मोठा चतुर होय. १८ मी ग्रंथकर्ता म्हटल्यास माझीहि तशीच स्थिति होईल. यास्तव हे सद्गुरुराया ! मी तुझ्या चरणीं मस्तक ठेवितों. कर्ता-करविता सर्व तूंच आहेस. १९ मागील अध्यायाचा कथासंदर्भ असा आहे—पांचव्या अध्यायाच्या शेवटीं नारदानें वसुदेवाला अशी उपपत्ति सांगितली कीं, २० श्रीहरि साक्षात् परमात्मा असून त्यानें लीलेनें मनुष्यदेह धारण करून तुमच्या घरीं अवतार घेतला आहे. तुमच्या भाग्यामुळें तो अनेक लीला करीत आहे. २१ हा श्रीकृष्ण ईश्वराचाहि ईश्वर, वैकुंठाचा सम्राट्, परमात्मा, परेश, जगदीश आहे. २२ नारदाचें तें बोलणें प्रमाण मानून श्रीकृष्णाची प्रार्थना करण्यासाठीं सर्व देवांचा समुदाय एकत्र जमून स्वतः द्वारकेस आला. २३.

श्रीशुक उवाच–अथ ब्रह्मात्मजैर्देवैः प्रजेशैरावृतोऽभ्यगात् । भवश्च भूतभव्येशो ययौ भूतगणैर्वृतः ॥१॥

**शुक म्हणे परीक्षिती । पहावया श्रीकृष्णमूर्ति । सुरवर द्वारकेसी येती । विचित्र स्थिति तिहीं केली ॥ २४ ॥ श्रीकृष्णमूर्तीचें कवतिक । पहावया देव सकळिक । चतुर्मुख पंचमुख । वेगें षण्मुख पातले ॥ २५ ॥ करावया प्रजाउत्पत्ती पूर्वीं नेमिला प्रजापती । तोही आला द्वारकेप्रती । कृष्णमूर्ती पहावया ॥ २६ ॥ सनकादिक आत्माराम । अवाप्तसकळकाम । तेहि होऊनि आले सकाम । मेघश्याम पहावया ॥ २७ ॥ भूतनायक रुद्रगण । आले अकराही जण । पहावया श्रीकृष्ण । भूतगणांसमवेत ॥ २८ ॥ पहावया श्रीकृष्णरावो । घेऊनि गणांचा समुदावो । द्वारके आला महादेवो । भूतभविष्यांचा पहा हो त्रिकाळज्ञाता ॥ २९ ॥ श्रीकृष्णदर्शनाची उत्कंठा । थोर लागली नीलकंठा । धांवतां मोकळ्या सुटल्या जटा । कृष्णवरिष्ठा पहावया ॥ ३० ॥**

इन्द्रो मरुद्भिर्भगवानादित्या वसवोऽश्विनौ । ऋभवोऽङ्गिरसो रुद्रा विश्वे साध्याश्च देवताः ॥ २ ॥
गन्धर्वाप्सरसो नागाः सिद्धचारणगुह्यकाः । ऋषयः पितरश्चैव सविद्याधरकिन्नराः ।
द्वारकामुपसंजग्मुः सर्वे कृष्णदिदृक्षवः ॥ ३ ॥

**एकुणपन्नास मरुद्गण । तेणेंसी इंद्र आला आपण । पहावया श्रीकृष्ण । स्वयें जाण सादर ॥ ३१ ॥ सांडोनियां रविमंडळा । बारा आदित्यांचा मेळा । पहावया कृष्णसोहळा । तृषित होऊनि आले ॥ ३२ ॥ सूर्य अधिष्ठिला डोळां । देखे पदार्थां सकळां । कृष्ण न देखतां डोळां । सूर्यो पावला अंधत्व ॥ ३३ ॥ पाहतां श्रीकृष्णाचें मुखकमळ । फिटलें सूर्याचें पटळ । मग देखणा जाला केवळ । सर्वांगें सकळ स्वयें**

---

(या सहाव्या अध्यायांत ब्रह्मादि देवांनीं हरीची स्तुति करून त्याला स्वधामीं येण्यासाठीं प्रार्थना केली व उद्धवानें मलाहि स्वधामीं घेऊन जा असें म्हटलें, हा कथाभाग आहे.)

—आतां यापुढें आत्मविद्येचें सविस्तर निरूपण करण्यासाठीं तिचा प्रस्ताव करितात—

श्रीशुकः उवाच–शुकाचार्य म्हणाले, अथ–त्यानंतर, ब्रह्मा–ब्रह्मदेव, आत्मजैः प्रजेशैः देवैः आवृतः अभ्यगात्–आपल्या सनकादि पुत्रांकडून व प्रजांचे ईश्वर असे जे देव त्यांकडून आवृत होत्साता (त्या सर्वांसह) द्वारकेस आला, भूतभव्येशः भवः च–भूत व भविष्यत् भूतांचा ईश्वर असा जो शंकर तोहि, भूतगणैः वृतः ययौ–भूतगणांसह द्वारकेस गेला. १.

शुकाचार्य म्हणाले–हे परीक्षित् राजा, श्रीकृष्णाची मूर्ति पहावयासाठीं श्रेष्ठ देव द्वारकेंत आले व तेथें त्यांनीं आश्चर्यकारक स्थिति केली. २४ श्रीकृष्णमूर्तीचें कौतुक पहाण्याकरितां ब्रह्मदेव, शंकर, कार्तिकेय हे सगळे देव आले. २५ सृष्टीची उत्पत्ति करण्यासाठीं पूर्वींच प्रजापतीला नेमिलें होतें. पण तोहि श्रीकृष्णाला पहाण्याकरितां द्वारकेला आला. २६ स्वरूपांत रममाण होणारे सनकादिक पूर्णकाम असूनहि घनश्यामाला पहाण्याच्या इच्छेनें आले. भूतनायक अकरा रुद्रगण आपल्या भूतगणासह २८ व भूत-भविष्यत् जाणणारा त्रिकालज्ञानी महादेवहि आपल्या गणांचा समुदाय घेऊन श्रीकृष्णाला पहाण्यास द्वारकेंत आला. २९ त्या नीलकंठाला श्रीकृष्णाच्या दर्शनाची इतकी उत्कंठा लागली कीं, तो त्याला पहाण्यासाठीं धांवत असतां त्याच्या जटा मोकळ्या सुटल्या. ३०.

मरुद्भिः भगवान् इंद्रः—देवांसह भगवान् इंद्र, आदित्याः०–बारा आदित्य, आठ वसु, दोन अश्विनीकुमार, ऋभु, अंगिरस, अकरा रुद्र, दहा विश्वेदेव, साध्य, इतर देवता, गंधर्व, अप्सरा, नाग, सिद्ध, चारण, गुह्यक, ऋषि, विद्याधर व किन्नर यांसह पितर, सर्वे कृष्णदिदृक्षवः– हे सर्व श्रीकृष्णाला पहाण्याची इच्छा करणारे, द्वारकां उपसंजग्मुः–द्वारकेला प्राप्त झाले. २-३.

एकुणपन्नास मरुद्गणांसह इंद्र व रविमंडळाला सोडून बारा आदित्यांचा समूह, कृष्णाचा सोहळा पहाण्यासाठीं अति तृषित होऊन आले. ३१-३२ पण कृष्णाला आपल्या डोळ्यांनीं न पाहिल्यामुळें ते जणुंकाय अंध झाले. सूर्य प्राण्यांच्या चक्षूंमध्यें अधिष्ठित होऊन सर्व पदार्थांना पहातो. ३३ त्यानें श्रीकृष्णाचें मुखकमल पहातांच त्यावरील सर्व पटल गेलें व तो नखशिखांत देखणा झाला. ३४ आहवनीयादि तिन्ही अग्नि मोठे तेजस्वी खरे,

रवी ॥ ३४ ॥ तिन्ही अग्नी तेजाळे । परी ते धूमें झांकोळले । कृष्ण देखतांच उजळले । निर्धूम जाले निजतेजें ॥ ३५ ॥ आठां वसूंचा मेळा । पाहों आला कृष्णलीला । म्हणे मदनाचा पुतळा । तंव तो खेळे लीला कृष्णांकीं ॥ ३६ ॥ अश्विनीकुमार धन्वंतरी । तेही भवरोगें पीडिले भारी । कृष्णदर्शनामृतकरीं । निरुज क्षणावरी ते जाहले ॥ ३७ ॥ ऋषभदेव आंगिरस । रुद्र मीनले असमसाहस । विश्वे साध्यदेव बहुवस । देवीं आकाश दाटलें ॥ ३८ ॥ आमुची गायनकळा मोटी । होतें गंधर्वांच्या पोटीं । ते कृष्ण । वेणुगीतासाठीं । जाली शेवटीं न सरती ॥ ३९ ॥ यालागीं दर्शनाची आस । क्षणक्षणां पाहती वास । त्यांसी गायनकळा सावकाश । दिधली सुरस कृपामात्रें ॥ ४० ॥ अप्सरा म्हणती आम्ही नाचणी । तंव कालियाच्या फणारंगणीं । एकेचि तालें लाजवूनी । तत्क्षणीं सांडिल्या ॥ ४१ ॥ त्या दीनवदना कामिनी । आल्या दर्शनालागोनी । नाचों शिकविल्या नाचणी । रासरंगणीं भृकुटिमात्रें ॥ ४२ ॥ पहावया श्रीरंग । आले पाताळींचे पन्नग । सिद्ध चारण अनेग । विद्याधर सांग समुदायें ॥ ४३ ॥ कश्यपादि ऋषीश्वर । अर्यमादि पितर । गुह्यक आणि किन्नर । आले अपार स्वगणेंसीं ॥ ४४ ॥ एवं विमानांचिया पंक्ती । दाटलिया द्वारकेप्रती । पहावया कृष्णमूर्ती । आले सुरपती स्वानंदें ॥ ४५ ॥

वपुषा येन भगवान्नरलोकमनोरमः । यशो वितेने लोकेषु सर्वलोकमलापहम् ॥ ४ ॥

जेणें शरीरें श्रीहरी । नाना चारित्रांतें करी । यश विस्तारिलें संसारीं । दुराचारी तरावया ॥ ४६ ॥ एकतां श्रीकृष्णकीर्ती । चतुर्विध प्रायश्चित्तांची गती । खुंटली जी निश्चितीं । श्रवणार्थीं सादर जाहलिया

---

पण ते धुरानें आच्छादित झाले होते; तथापि कृष्णाला पहातांच ते धूमरहित होऊन आपल्या तेजानें उजळले. ३५ आठ वसूंचा मेळा कृष्णाची लीला पहावयास आला आणि तो हा कृष्ण मदनाचा पुतळाच आहे असें जों म्हणत आहे तोंच त्यानें साक्षात् मदनाला श्रीकृष्णाच्या मांडीवर खेळतांना पाहिलें. ३६ अश्विनीकुमार मोठे धन्वंतरी, पण त्यांनाहि भवरोगानें अतिशय पीडिलें होतें; तथापि कृष्णदर्शनरूप अमृताचा स्वाद घेतांच एका क्षणांत ते निरोगी झाले. ३७ आंगिरस, ऋषभदेव, अनुपम धैर्यवान् रुद्र, विश्वेदेव, साध्य इत्यादि देवांनीं सर्व आकाश व्यापिलें. ३८ आमची गायनकला फार मोठी आहे असें गंधर्वांना वाटत होतें, पण कृष्णाच्या मुरलीपुढें ती फिकी पडली. ३९ म्हणून त्याच्या दर्शनाची त्यांना मोठी हांव सुटली होती. ते क्षणोक्षणीं आपल्याला दर्शनाचा लाभ केव्हां मिळतो म्हणून वाट पहात होते. म्हणून श्रीकृष्णानें त्यांना दर्शन देऊन केवळ कृपेनेंच सुरस गायनकला दिली. ४० अप्सरा म्हणाल्या, 'आम्ही मोठ्या नाचणाऱ्या,' पण भगवानानें कालिया सर्पाच्या फणेवर एकाच तालानें नाचून त्यांना अगदीं लाजवून सोडिलें. ४१ त्या बिचाऱ्या अगदीं दीनमुख होऊन त्याच्या दर्शनास आल्या. तेव्हां त्यानें रासरंगणांत केवल भृकुटीसंकेतानें त्यांना नाचावयास शिकविलें. ४२ श्रीरंगाला पहावयास पाताळांतील नाग, अनेक सिद्ध, चारण, विद्याधर, ४३ कश्यपादि ऋषीश्वर, अर्यमादि पितर, गुह्यक, किन्नर इत्यादि सर्व आपल्या असंख्य गणांसह तेथें आले. ४४ द्वारकेमध्यें विमानांची दाटी झाली. कृष्णमूर्ति पहावयास देव आनंदानें तेथें आले. ४५.

—'अहोपण, ते सर्व उपेंद्रादिरूप भगवानाला नित्य पहात असतांना त्यांना हें रूप पहाण्याची इतकी उत्कट इच्छा कां झाली ?' अशी आशंका घेऊन शुकाचार्य सांगतात—

**येन वपुषा**—ज्या शरीरानें, **नरलोकमनोरमः भगवान्**—मनुष्य लोकामध्यें मनोहर असलेला भगवान्, **लोकेषु**—सर्व लोकांमध्यें, **सर्व लोकमलापहं यशः वितेने**—सर्व लोकांच्या पापाचा नाश करणारें यश विस्तारिता झाला. [ तें अति सुंदर रूप पहाण्याच्या इच्छेनें देवादि द्वारकेस आले. ] ४.

ज्या शरीरानें श्रीहरि संसारांतील दुराचारी लोकांना तारावयासाठीं अनेक चरित्रें करून आपलें यश सर्वत्र पसरवीत होता, ४६ ज्या कृष्णाची कीर्ति मोठ्या आदरानें ऐकिली असतां चारी प्रकारच्या प्रायश्चित्तांची गति

**॥ ४७ ॥ भावें घेतालिया श्रीकृष्णनाम। सकळ पातकां करी भस्म। देवीं देखिला पुरुषोत्तम। विश्रामधाम जगाचें ॥ ४८ ॥ ठाणठकारें अतिउत्तम। सुरनरांमाजीं मनोरम। डोळ्यां जाला विश्राम। मेघश्याम देखोनी ॥ ४९ ॥ मुकुटकुंडलें मेखळा। कांसे कसिला सोनसळा। कंठीं रुळे वनमाळा। घनसांवळा शोभतु ॥ ५० ॥ लावण्यगुणनिधान। अवतारमाळे मुख्य रत्न। देवीं देखिला श्रीकृष्ण। निवासस्थान द्वारका ॥ ५१ ॥**

तस्यां विभ्राजमानायां समृद्धायां महर्द्धिभिः। व्यचक्षतावितृप्ताक्षाः कृष्णमद्भुतदर्शनम् ॥ ५ ॥

**कृष्णें अधिष्ठिली पुरी। कनककळसांचिया हारी। रत्नें जडिलीं नाना कुसरी। तेज अंबरीं न समाये ॥ ५२ ॥ जे द्वारकेभीतरीं। कामधेनू घरोघरीं। कल्पद्रुमांचिया हारी। खेळणीं द्वारीं चिंतामणींची ॥ ५३ ॥ द्वारकाजननिवासियांसी। घरीं नवरत्नांचिया राशी। ऋद्धिसिद्धि करूनि दासी। हृषीकेशी नांदतु ॥ ५४ ॥ कृष्णरूपाचिया लालसें। डोळ्यां तेणें लाविलें पिसें। आवडी जालें मोरपिसें। अतिडोळसें हरिअंगीं ॥ ५५ ॥ कैसी बरवेपणाची शोभा। पाहतां नयनीं निघती जिभा। रसाळपणें तो वालभा। उपनिषद्गाभा साकारला ॥ ५६ ॥ कृष्ण पहावया आवडी। होताहे देवांसी बरपडी। डोळ्यां थोर लागली गोडी। अर्ध घडी न विसंबती ॥ ५७ ॥ कृष्णरूपाचें कवतुक। पाहतां नयनां लागली भूक। अंतरीं निबिड दाटलें सुख। तरी अधिकाधिक भुकेले ॥ ५८ ॥ अवलोकितां श्रीकृष्णासी। दृष्टीसी दाटणी होतसे कैशी। मुंडपघसणी न्याहारासी। हृषीकेशी पहावया ॥ ५९ ॥ मागें पुढें श्रीकृष्णासी। देखणोनि वेढिलें चौपाशीं। भाग्य उपजलें डोळ्यांसी। पूर्णपुरुषासी देखती ॥ ६० ॥ श्रीकृष्ण घनमेघ सांवळा। निजात्मभावें पाहतां डोळां। सहजें श्यामता आली बुबुळा। कृष्णकळा**

---

कुंठित होते, ४७ ज्या श्रीकृष्णाचें भक्तीनें नामस्मरण केलें असतां सर्व पातकांचें भस्म होतें त्या सर्व जगाचें विश्रांतिस्थान अशा पुरुषोत्तमाला देवांनीं पाहिलें. ४८ ज्याच्या शरीराची ठेवण अति उत्तम आहे, देव व मनुष्य यांमध्यें जो मनोहर आहे, त्या घनःशामाला पाहून देवांचे नेत्र तृप्त झाले. ४९ कानांत कुंडलें, कमरेला मेखळा, पिवळा पीतांबर, कंठामध्यें लोंबणारी वनमाला यांनीं तो घनसांवळा फार शोभला. ५० लावण्यगुणाचा जणुंकाय ठेवाच व अवतारांच्या मालिकेंतील मुख्य रत्न, अशा द्वारकानिवासी श्रीकृष्णाला देवांनीं पाहिलें. ५१

**तस्यां विभ्राजमानायां**–त्या शोभायमान, **महर्द्धिभिः समृद्धायां**–फार मोठ्या ऐश्वर्यानें समृद्ध असलेल्या द्वारकेंत, **अवितृप्ताक्षाः**–ज्यांचें नेत्र अत्यंत अतृप्तच आहेत असे देव, **अद्भुतदर्शनं कृष्णं व्यचक्षत**–ज्याचें दर्शन अद्भुत आहे अशा कृष्णाला पहाते झाले. ५.

कृष्ण ज्यामध्यें रहात होता त्या द्वारकानगरीवर सोन्याच्या कळसांच्या पंक्ति झळकत होत्या. त्यांना अनेक रत्नें मोठ्या कुसरीनें जडलीं होतीं. त्यामुळें त्या द्वारकेचें तेज आकाशांतहि मावेना. ५२ द्वारकेंत कामधेनु, कल्पवृक्षांच्या रांगा व चिंतामणींचीं खेळणीं होतीं. ५३ द्वारकेंत रहाणाऱ्या लोकांच्या घरांत नवरत्नांच्या राशी पडल्या होत्या. तेथें ऋद्धि-सिद्धींना दासी करून हृषीकेश नांदत होता. ५४ श्रीकृष्णाचें रूप पहाण्याच्या लालसेनें डोळ्यांना वेड लागलें. त्याचें रूप पहाण्याच्या आवडीनें ज्याच्या मस्तकांवरील मयूरपिच्छांनाहि दृष्टि आली, ५५ त्याच्या सौंदर्याची शोभा काय वर्णावी ! त्याला पहात असतां जणुंकाय त्याच्या नेत्रांना जिव्हा फुटल्या. कारण तो उपनिषदांचा सारभूत अर्थच साकार झालेला असल्यामुळें रसाळपणानें त्यांना प्रिय वाटला. ५६ कृष्णाला पहाण्याची देवांना मोठी आवड ! डोळ्यांना त्याच्या रूपाची इतकी गोडी लागली कीं, ते क्षणभरहि त्यांना विसंबिनात. ५७ श्रीकृष्णाचें कौतुक पहाण्याची डोळ्यांना इतकी भूक लागली कीं, अंतःकरण जरी सुखानें भरून गेलें तरी त्यांची भूक अधिकाधिकच वाढत गेली. ५८ श्रीकृष्णाला पहाण्याची तेथें इतकी गर्दी झाली कीं, त्यामुळें प्रेक्षकांच्या मस्तकावरील मुकुट एकमेकांवर घांसूं लागले, ५९ पहाणारांना मागेंपुढें जिकडे पहावें तिकडे तोच एक दिसूं लागला. खरोखर डोळ्यांचें भाग्य उदयाला आलें, त्यामुळेंच ते त्या परम पुरुषाला पाहूं शकले. ६० श्रीकृष्णाचें मेघासारखें सांवळें

ठसावली ॥ ६१ ॥ जो न कळेचि वेदविवंचना । योगियांच्या न ये ध्याना । त्या प्रत्यक्ष देखोनि कृष्णा । भाग्यगणना अपूर्व ॥ ६२ ॥ ऐसा देखोनियां श्रीहरी । देव सुमनांच्या शतधारीं । बहु वरुषले पैं अंबरीं । राहोनि वरी विमानीं ॥ ६३ ॥

स्वर्गोद्यानोपगैर्माल्यैश्छादयन्तो यदूत्तमम् । गीर्भिश्चित्रपदार्थाभिस्तुष्टुवुर्जगदीश्वरम् ॥ ६ ॥

मांदार पारिजात संतान । कल्पद्रुम हरिचंदन । ऐशिया वृक्षांचीं सुमनें जाण । कृष्णावरीं संपूर्ण वरुषले ॥ ६४ ॥ श्रीकृष्णासी चहूंकडां । दिव्य सुमनांचा जाला सडा । समस्त देवीं सन्मुख पुढां । केला पैं गाढा जयजयकारू ॥ ६५ ॥ सार्थ पदबंध रचना । नाना गद्यपद्यविवंचना । स्तवूं आदरिलें यदुनंदना । अमरसेना मिळोनी ॥ ६६ ॥

देवा ऊचुः—नताः स्म ते नाथ पदारविन्दं बुद्धीन्द्रियप्राणमनोवचोभिः ।
यच्चिन्त्यतेऽन्तर्हृदि भावयुक्तैर्मुमुक्षुभिः कर्ममयोरुपाशात् ॥ ७ ॥
त्वं मायया त्रिगुणयाऽऽत्मनि दुर्विभाव्यं व्यक्तं सृजस्यवसि लुम्पसि तद्गुणस्थः ।
नैतैर्भवानजित कर्मभिरज्यते वै यत्स्वे सुखेऽव्यवहितेऽभिरतोऽनवद्यः ॥ ८ ॥

---

रूप निजात्मभावानें डोळ्यांनीं पहात असतां आपोआपच बुबुळांना काळेपणा आला. कृष्णाचा वर्ण डोळ्यांत ठसला. ६१ जो वेदविचारानेंहि कळत नाहीं, योग्यांच्या ध्यानांत येत नाहीं, त्या कृष्णाला प्रत्यक्ष पहाणारांचें भाग्य अपूर्व होय! ६२ अशा श्रीहरीला पाहून देवांनीं विमानांत बसून आकाशांतून त्यावर शेंकडों धारांनीं पुष्पवृष्टि केली. ६३.

स्वर्गोद्यानोपगैः माल्यैः—स्वर्गस्थ नंदनवनांतील पुष्पांनीं, यदूत्तमं छादयन्तः—यदुश्रेष्ठाला आच्छादित करून, चित्रपदार्थाभिः गीर्भिः—विचित्र म्ह० प्रायः शृंखलाबद्ध पदांनीं व विचित्र अर्थांनीं युक्त अशा वाणींनीं, जगदीश्वरं तुष्टुवुः—जगदीश्वराची स्तुति करिते झाले. ६.

देवांनीं मांदार, पारिजातक, संतान, हरिचंदन, कल्पतरु अशा वृक्षांच्या फुलांचा कृष्णावर वर्षाव केला. ६४ श्रीकृष्णाच्या चोहोंबाजूला दिव्य पुष्पांचा सडा पडला. सर्व देवांनीं पुढें येऊन मोठ्यानें जयजयकार केला. ६५ अर्थासह काव्य व दुसरेंहि अनेक प्रकारचें गद्य-पद्य यांच्यायोगानें ती सर्व देवांची सेना यदुनंदनाची आदरानें स्तुति करूं लागली. ६६.

देवाः ऊचुः-देव म्हणाले, नाथ— हे नाथ, कर्ममयोरुपाशात् मुमुक्षुभिः भावयुक्तैः अन्तर्हृदि यत् चिन्त्यते—कर्ममय फार मोठ्या पाशापासून मुक्त होण्याची इच्छा करणाऱ्या व भावयुक्त अशाहि भक्तांकडून ज्याचें हृदयामध्यें केवल चिंतन केलें जातें, पण साक्षात् पाहिलें जात नाहीं, तत् ते पदारविन्दं—त्या तुझ्या चरणकमलास, बुद्धींद्रियप्राणमनोवचोभिः नताः—आम्हीं ज्ञानेंद्रियें, प्राण, मन व वाक् यांनीं नमस्कार केला आहे, स्म— हें आमचें केवढें भाग्य! अहोपण, मी सुद्धां दृष्ट व अदृष्टकर्म करितों, तेव्हां कर्मपाशापासून मुक्त होण्याची इच्छा करणाराकडून माझ्या चरणकमलाचें चिंतन कां केलें जातें? असें भगवान् विचारील म्हणून देव म्हणतात,—हे अजित्—कोणाकडूनहि पराभूत न होणाऱ्या कृष्णा, ( तूं आतां जें थोडेंसें कर्म करीत आहेस ते तर राहूं देच, पण ) त्वं त्रिगुणया मायया गुणस्थः आत्मनि दुर्विभाव्यं व्यक्तं सृजसि अवसि लुम्पसि—तूं त्रिगुणात्मक मायेनें त्या मायेच्या गुणांमध्यें नियंतृत्वानें स्थित होऊन आपल्या स्वरूपांत मनानेंहि अचिंत्य असलेल्या या महदादि व्यक्त प्रपंचाला उत्पन्न करितोस, त्याचें पालन करितोस व संहार करतोस. ( आणि मायागुणांमध्यें नियंतृत्वानें स्थित होऊन हें सर्व करीत असल्यामुळें ) एतैः कर्मभिः भवान् न अज्यते—या कर्मांनीं तूं लिप्त होत नाहींस. कारण कीं, यः भवान् अनवद्यः—आपण रागादि दोषांनीं रहित आहां, स्वे सुखे अव्यवहिते अभिरतः वै— स्वरूपभूत साक्षात् सुखामध्यें रममाण होत आहां. [ त्यामुळें कर्म करीत असूनहि आत्माराम असलेल्या परमेश्वराचें मुमुक्षु चिंतन करितात. ] ८.

विवेकयुक्त प्राणधारणा । मनसा वाचा कर्मणा । नमस्कारू तुझिया चरणां । सच्चिद्घना श्रीकृष्णा ॥ ६७ ॥ इंद्रियउपरमालागीं जाणा । सांडूनि विषयवासना । दश इंद्रियीं लागलों चरणां । नमन श्रीकृष्णा निजभावें ॥ ६८ ॥ विषयीं होऊनियां उदास । सांडोनि संसाराची आस । चरण चिंतिती तापस । कर्मपाश छेदावया ॥ ६९ ॥ ऐसे मुक्तीचिया वासना । मुमुक्षु चिंतिती चरणां । त्यांसी अर्ध क्षण न येसी ध्याना । दृढ भावना करितांही ॥ ७० ॥ ते प्रत्यक्ष तुझे चरण । आम्हांसी जालें जी दरुषण । देव आपुल्या भाग्या आपण । अतिस्तवन करिताती ॥ ७१ ॥ देखूनि सगुण स्वरूपासी । एवढी श्लाघा कां म्हणसी । जें आलें आकारासी । तें निश्चयेंसीं मायिक ॥ ७२ ॥ जैसे तुम्ही शरीरधारी । तैसाच मीही एकु शरीरी । त्या माझेनि दर्शनेंकरीं । तुम्ही कैशापरी तराल ॥ ७३ ॥ ऐसें न म्हणावें जी अनंता । जें तूं मायेचा नियंता । हेंही कळलें असे तत्त्वतां । समूळ कथा परियेसीं ॥७४॥

झोंप लागल्या झोंप न दिसे पाहीं । जागें जाहल्या दिसेसी नाहीं । तैसी माया अतर्क्य देहीं । न पडे ठायीं सुरनरां ॥ ७५ ॥ मुळींच तुझी अतर्क्य माया । तिसी गुणक्षोभु जाला साह्या । ते ब्रह्मादिकां न येचि आया । देवराया श्रीकृष्णा ॥ ७६ ॥ तूं धरोनि देवीमायेसी । ब्रह्मादिकांतें स्रजिसी । प्रतिपाळोनि संहरिसी । तूं त्या कर्मासी अलिप्त ॥ ७७ ॥ स्वप्नीं स्वयें सृष्टि स्रजिली । प्रतिपाळोनि संहारिली । ते क्रिया कर्त्यासी नाहीं लागली । तेवीं सृष्टि केली त्वां अलिप्तत्वें ॥ ७८ ॥ मृगजळाची भरणी । सूर्य करी निजकिरणीं । शोषूनि ने अस्तमानीं । अलिप्तपणीं तैसा तूं ॥ ७९ ॥ समूळ धर्माची वाढी मोडे । अधर्माची शीग चढे । तैं तुज अवतार धरणें घडे । आमुचें सांकडें फेडावया ॥ ८० ॥ करोनि अधर्माचा घातु । धर्म वाढविशी यथास्थितु । देवांसी निजपदीं स्थापितु । कर्मातीतु तूं श्रीकृष्णु

---

हे सच्चिद्घन श्रीकृष्णा, विवेकयुक्त प्राणधारणा करून, वाणीनें, मनानें व कर्मानें तुला नमस्कार असो. ६७ इंद्रियांची खळबळ शांत होण्यासाठीं विषयवासना सोडून, दहाहि इंद्रियें तुझ्याकडे लावून हे कृष्णा, भक्तिभावानें तुला आम्ही नमन करितों. ६८ तपस्वी जन विषयांविषयीं विरक्त होऊन, संसाराची इच्छा टाकून, कर्मबंधाचा छेद करण्यासाठीं तुझ्या चरणाचें चिंतन करितात. ६९ याप्रमाणें मुमुक्षुजन मुक्तीसाठीं तुझे चरण चिंतितात, पण त्यांची दृढभावना असूनहि तूं अर्धाक्षणदेखील त्यांच्या ध्यानांत येत नाहींस. ७० अशा तुझ्या चरणांचें आम्हांला प्रत्यक्ष दर्शन घडलें, असें म्हणून देव आपल्या भाग्याची आपणच मोठी स्तुति करूं लागले. ७१ तूं कदाचित् असें म्हणशील कीं, ' हें माझें सगुण स्वरूप पाहून तुम्ही त्याची इतकी प्रशंसा कां करितां ? ' जेवढी म्हणून साकार वस्तु असते ती निश्चयानें मायिक असते. ७२ तुम्ही जसे देहधारी अहांत तसाच मीहि एक देहवान् आहें. त्या माझ्या दर्शनानें तुम्ही कसे तरून जाणार ! ७३ हे अनंता, असें म्हणूं नकोस, तूंच मायेचा चालक आहेस, हें तत्त्वतः आम्हांला कळलें आहे. ती सविस्तर कथा आतां ऐक. ७४.

झोंप लागली असतां ती आपल्याला दिसत नाहीं. जागें झाल्यावरहि ती दृष्टीस पडत नाहीं. त्याप्रमाणें देहांतील माया अतर्क्य आहे. ती देवांना व मनुष्यांना कळत नाहीं. ७५ तुझी माया मूळचीच अतर्क्य, त्यांत तिच्यामध्यें सत्त्व, रज व तम या तीन गुणांची साम्यावस्था ढळून गुणक्षोम झाला. तेव्हां हे देवराया श्रीकृष्णा, ती ब्रह्मदेवाच्याहि आटोक्यांत राहीनाशी झाली. ७६ त्या मायादेवीला तूं हातीं धरून ब्रह्मादिकांस उत्पन्न करितोस, रक्षण करितोस व संहार करितोस व पुनः तूं स्वतः त्या कर्मापासून अलिप्तच रहातोस. ७७ ज्याप्रमाणें स्वप्नांत आपण स्वतः सृष्टि निर्माण केली तिचा प्रतिपाळ करून संहारहि केला तरी ती स्वप्नांतील क्रिया कर्त्याला बद्ध करीत नाहीं, त्याप्रमाणें तूं अलिप्त राहून सृष्टि केलीस. ७८ सूर्य जसा आपल्या किरणांच्या परावर्तनानें मृगजल भासवितो व सूर्यास्त होतांच त्याला नाहींसें करितो, त्याप्रमाणें तूं अलिप्त राहून सर्व लीला करितोस. ७९ जेव्हां धर्मप्रवृत्ति समूळ मोडते व अधर्माचा कळस चढतो तेव्हां आमच्यावरील संकट निवारण करण्यासाठीं तुला अवतार घेणें भाग

॥ ८१ ॥ तुज अखंडदण्डायमान । आत्मसुखाचें अनुसंधान । तें आम्हांसी नाहीं अर्ध क्षण । दीनवदन यालागीं ॥ ८२ ॥ ज्यासी आत्मसुख निरंतर । तो देहधारी परी अवतार । त्याचे चरण पवित्रकर । गंगासागरादि तीर्थांसी ॥ ८३ ॥ तो जरी बर्ते गुणांआंतु । तरी तो जाणावा गुणातीतु । त्याचा चरण-रेणु करी घातु । त्रैलोक्यांतु महापापां ॥ ८४ ॥ ऐसी तुझ्या दासांची कथा । त्या तुझे चरण वंदूं माथां । असो चरणांची हे कथा । कीर्ति ऐकतां निजलाभु ॥ ८५ ॥ चरण देखती ते भाग्याचे । त्यांचें महिमान न वर्णवे वाचे । पवित्रपण तुझिये कीर्तीचें । परिस साचें स्वामिया ॥ ८६ ॥ अग्नि-शिखां समसमानीं । इंधन घालितां वाढे अग्नी । आशा वाढे देहाभिमानीं । श्रवणकीर्तनीं ते त्यागवी ॥ ८७ ॥

शुद्धिर्नृणां न तु तथेड्य दुराशयानां विद्याश्रुताध्ययनदानतपःक्रियाभिः ।
सत्त्वात्मनामृषभ ते यशसि प्रवृद्धसच्छ्रद्धया श्रवणसंभृतया यथा स्यात् ॥ ९ ॥

कृष्णस्तवनें स्वविता तरे । श्रवणद्वारें ऐकतां उद्धरे । यालागीं स्तव्य तूंचि निर्धारें । स्तवनद्वारें तारकु ॥ ८८ ॥ एवं तुझे कीर्तीचें श्रवण । तेंचि परम शुद्धीसी कारण । यावेगळें जें साधन । तें केवळ जाण प्रयास ॥ ८९ ॥ ऐकें गा सुरवरिष्ठा । तुझिया श्रवणाची उत्कंठा । अंतरीं पापाचा मळकटा । धुवोनि चोखटा करी वृत्ती ॥ ९० ॥ तुझ्या श्रवणीं होउनि उदास । तपें तपतां तापस । नाना साधनीं कर्कश । जाहल्या निरस मती त्यांच्या ॥ ९१ ॥ मंत्रविद्याग्रहण । विकळ उच्चारितां वर्ण । शुद्धी नव्हे परी दारुण । पातक

---

पडतें. ८० कर्मातीत असलेला तूं श्रीकृष्ण अधर्माचा नाश करून यथाशास्त्र धर्म वाढवितोस आणि देवांचें त्यांच्या स्वपदावर स्थापन करितोस. ८१ तूं अविछिन्न आत्मसुखाचें अनुसंधान आहेस, पण आम्हांला तें अर्धाक्षणहि लाभत नाहीं, म्हणून आम्ही असे दीनवदन झालों आहों. ८२ ज्याला निरंतर आत्मसुख प्राप्त झालें आहे तो देहवान् असला तरी अवतारच आहे. त्याचे चरण गंगा-सागरादि तीर्थांनाहि पवित्र करणारे आहेत. ८३ तो जरी गुणांमध्यें वागत असला तरी गुणातीत आहे. त्याच्या चरणांची धूळ त्रैलोक्यांतील महापातकांचाहि नाश करिते. ८४ अशी तुझ्या दासांची कथा आहे. तुझे चरण मस्तकावर धारण करून त्यांना वंदन करूं. ही चरणाची कीर्ति ऐकिली असतां आत्मलाभ होतो. ८५ असे ते चरण पहाणारे किती भाग्यवान् आहेत. त्यांचें वर्णन शब्दानें करितां येत नाहीं. हे प्रभो, तुझ्या कीर्तीचा पवित्रपणा आतां ऐक. ८६ अग्नीची ज्वाळा एकसारखीच असते, पण त्यांत सर्पण घातलें कीं अग्नि वाढतो, त्याप्रमाणें देहाभिमानानें जी आशा वाढते ती श्रवण व कीर्तन यांनीं तूं टाकवितोस. ८७

—अहोपण, आत्मस्वरूपांतच रममाण होणाऱ्या ईश्वराला कर्मानुष्ठान करून तरी काय करावयाचें आहे ! अशी आशंका घेऊन देव म्हणतात—

ईड्य, ऋषभ—हे स्तुत्य व श्रेष्ठ कृष्णा ! यथा ते यशसि श्रवणसंभृतया प्रवृद्धसच्छ्रद्धया सत्त्वात्मनां शुद्धिः स्यात्-ज्याप्रमाणें तुझ्या यशाविषयींच्या श्रवणानें उत्पन्न झालेल्या व अतिशय वाढलेल्या सत् श्रद्धेनें साधूंची शुद्धि होते, तथा दुराशयानां नृणां विद्याश्रुताध्ययनदानतपःक्रियाभिः न तु स्यात्-तशी विषयासक्त पुरुषांची शुद्धि उपासना, शास्त्रज्ञान, अध्ययन, दान व तप या कर्मांनीं होत नाहींच. [ परम पावन यशाचा विस्तार करण्यासाठीं तुज ईश्वराचें कर्माचरण आहे, असा याचा भावार्थ. ] ९.

स्तवन करणारा श्रीकृष्णाच्या स्तवनान तरतो व श्रोता श्रवणाच्या द्वारां उद्धरतो. म्हणून तूंच स्तवन करण्यास योग्य व स्तवनाच्या द्वारां तारणारा आहेस. ८८ याप्रमाणें तुझ्या कीर्तीचें श्रवण परम शुद्धि करणारें आहे. याखेरीज दुसरीं सर्व साधनें म्हणजे केवळ प्रयास आहेत. ८९ हे देवश्रेष्ठा, ऐक. तुझ्या कीर्तनश्रवणाची उत्कंठा लागली म्हणजे ती अंतःकरणांतील पापाचे थर धुवून टाकिते व वृत्ति निर्मल करिते. ९० तुझ्या श्रवणाविषयीं उदास होऊन जे तपस्वी अनेक प्रकारच्या क्लेशकर साधनांनीं तपश्चर्या करीत होते त्यांची मति नीरस झाली. ९१ मंत्रविद्या ग्रहण करून त्या वर्णाचा अशुद्ध उच्चार केला असतां साधकांची शुद्धि न होतां उलट पातकच त्यांच्या माथीं बसतें. ९२

पूर्ण अंगीं वाजे ॥ ९२ ॥ करितां शास्त्रश्रवण । चौगुणां गर्व चढे पूर्ण । तो ज्ञातेपणाचा अभिमान । न निघे जाण चतुर्मुखा ॥ ९३ ॥ करितां वेदाध्ययन । विस्वर गेलिया उच्चारण । शुद्धी नव्हेचि परी मरण । अवश्य जाण वृत्रासुराऐसें ॥ ९४ ॥ दान देतां नृग बहुवस । कूपीं जाला कृकलास । प्राप्ती दूरी परी नाश । असमसाहस रोकडा ॥ ९५ ॥ तप करितां ऋष्यश्रृंगासी । तो वश जाहला वेश्यांसी । श्रद्धा श्रवणाचिया ऐसी । शुद्धी आणिकांसी पैं नाहीं ॥ ९६ ॥ कर्म करावें यथानिगुती । तंव त्या कर्मांची गहन गती । प्राचीनबर्ह्याची कर्मस्थिती । नारदोक्तीं सांडविली ॥ ९७ ॥ कर्मी आचमन करावें । तेथ माषमात्र जळ घ्यावें । न्यूनाधिक्यत्वासवें । दोष पावे सुरापानसम ॥ ९८ ॥ एवं दुष्टहृदय ज्यासी । तपादिक साधनें त्यासी । शुध्दि नव्हे हृषीकेशी । श्रवणें कीर्तीसी नायकतां ॥ ९९ ॥ श्रवणें परीक्षिती तरला । श्रवणें क्रौंच उद्धरिला । मकरोदरीं श्रवण पावला । सिद्ध जाहला मत्स्येंद्र ॥ १०० ॥ तुझें श्रवण दोंपरी । एक तें चित्तशुद्धी करी । दुसरें जीवब्रह्म ऐक्य करी । दोहींपरी उद्धारू ॥ १ ॥ प्रत्यक्ष पाहतां वाराणसीं । श्रवणी तारक ब्रह्म उपदेशी । मुक्तिक्षेत्र जाहली काशी । श्रवणें जीवांसी उद्धारू ॥ २ ॥ तूं अवाप्तसकळकाम । निष्कामाचें निजधाम । ऐशिया तुज करणें कर्म । भक्तश्रम छेदावया ॥ ३ ॥ नाना चरित्रांची करणी । करिता झालासी चक्रपाणी । मोक्षमार्गाची निश्रेणी । दिधली रचूनी जनासी ॥ ४ ॥ चित्तशुद्धीसी कारण । प्रेमयुक्त कीर्तिश्रवण । येथ सच्छ्रद्धाचि प्रमाण । अकारण साधनें ॥ ५ ॥ अपेक्षा जें जें साधन साधिलें । तें तें अपेक्षेनेंचि फोल केलें । निरपेक्षाचें हृदय भलें । वेगीं गेलें परमार्थी ॥ ६ ॥ हृदयाचे सखोल आळा । स्वधर्मबीजें अंकुरला । श्रद्धेचा वेल उगवला । कोंभ निघाला तरितरितू ॥ ७ ॥ सच्छ्रवणप्रबळजळें । रुतलीं वैराग्यदृढमूळें । वेगीं गेलीं निजबळें । श्रद्धामेळें चिदाकाशीं ॥ ८ ॥ ते चिदाकाशींचा चंद्रमा । स्वप्रकाश तूं पुरुषोत्तमा । साधक

---

शास्त्राचें श्रवण केलें असतां चौपट गर्व वाढत जातो आणि त्याचा तो ज्ञानीपणाचा अभिमान ब्रह्मदेवहि घालवूं शकत नाहीं. ९३ वेदाध्ययन करीत असतां मंत्रांतील स्वर उच्चारण्यांत चूक झाली कीं, त्यांस पुण्य न मिळतां वृत्रासुरासारखें मरण अवश्य येतें. ९४ दान देण्यांत न कळत दोष घडतांच नृगराजा सरडा होऊन विहिरींत पडला. लाभ तर दूरच राहिला पण नाश मात्र निश्चयानें झाला. ९५ ऋष्यश्रृंग तप करीत असतांनाच वेश्यांना वश झाला. श्रवणाविषयींची श्रद्धा जशी चित्ताला शुद्ध करिते तशी दुसऱ्या कशानेंहि होत नाहीं. ९६ यथाविधि कर्म आचरावें तर त्या कर्माची गति गहन आहे. प्राचीनबर्हिषराजा अतिशय कर्मनिष्ठ होता; पण नारदाच्या उपदेशानें त्याची कर्मस्थिति सुटली. ९७ कर्मामध्यें आचमन घेण्यासाठीं उडीद बुडेल इतकेंच पाणी हातावर घ्यावें असें विधान आहे; त्यांत जरा कमीजास्त झालें कीं मद्यपानाइतकें पातक लागतें. ९८ याप्रमाणें हे हृषीकेशा, ज्याचें अंतःकरण मलीन आहे त्याच्याकरितां हीं तपादिक साधनें आहेत. तुझ्या कीर्तीचें श्रवण न केल्यास त्याला शुद्धि प्राप्त होत नाहीं. ९९ श्रवणानें परीक्षिति राजा तरला. श्रवणानें क्रौंचाचा उद्धार झाला. मत्स्याच्या उदरांत असतांना घडलेल्या श्रवणामुळें मत्स्येंद्र सिद्ध झाला. १०० तुझें श्रवण दोन प्रकारचें आहे. एकानें चित्तशुद्धि होतें व दुसरें जीव-ब्रह्माचें ऐक्य करितें. मिळून दोन्हीं प्रकारें उद्धारच होतो. १ वाराणशीचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें असतां तिच्यांतील विश्वनाथ मरणसमयीं त्या मुमुक्षूंच्या कानांत तारक ब्रह्माचा उपदेश करितो. त्यामुळें काशी मुक्तीचें क्षेत्र बनली. श्रवणानेंच जीवांचा उद्धार होतो. २ तुला कोणताहि काम मिळवावयाचा शिल्लक राहिला नाहीं. तूं कामनारहितस्थितीचें स्थानच आहेस. अशा तुला भक्तांचा श्रम घालविण्यासाठीं कर्म करावें लागतें. ३ अनेक चरित्रें करून तूं लोकांना मोक्षमार्गाचा जिनाच करून दिला आहेस. ४ प्रेमानें तुझ्या कीर्तीचें श्रवण हेंच चित्तशुद्धिचें कारण आहे. येथें निर्मळ श्रद्धाच प्रमाण आहे. इतर सर्व साधनें व्यर्थ आहेत. ५ मनांत कामना धरून जें जें साधन आचरिलें तें तें वासनेमुळें व्यर्थ झालें आहे. निष्काम साधकाचें हृदय सत्वर परमार्थाकडे जातें. ६ हृदयाचें खोल अळें आहे, त्यांत स्वधर्मबीजाला अंकुर फुटला, श्रद्धेची वेल उगवली आणि जोरानें त्याचा कोंभ निघाला. ७ सच्छ्रवणाचें स्वच्छ पाणी लावलें, त्यामुळें वैराग्यरूपी मुळें मजबूत झालीं व आपल्या सामर्थ्यानें श्रद्धेमुळेंच चिदाकाशाला जाऊन भिडली. ८ त्या

शिणती मेघश्यामा । तुझी प्रतिमा पहावया ॥ ९ ॥ त्या तुझे श्रीचरण । प्रत्यक्ष जालें दर्शन । घालोनियां लोटांगण । चरणस्तवन करिताती ॥ ११० ॥

स्यान्नस्तवाङ्घ्रिरशुभाशयधूमकेतुः क्षेमाय यो मुनिभिरार्द्रहृदोह्यमानः ।
यः सात्वतैः समविभूतय आत्मवाद्भिर्व्यूहेऽर्चितः सवनशः स्वरतिक्रमाय ॥ १० ॥

आमुच्या अशुभाशयाचा घातु । करिता चरणधूमकेतु । तुझाचि जी विख्यातु । त्रैलोक्यांतु श्रीकृष्णा ॥ ११ ॥ पापइंधनाचा मेळु । तेथ तुझा चरण वडवानळु । लागतां तो अतितेजाळु । तिळेंतिळु जाळितु ॥ १२ ॥ ऐसा पापियांतें कांपविता । प्रेमळांतें अभयदाता । तुझा चरण जी अनंता । हृदयीं सर्वथा वाहताती ॥ १३ ॥ तेंचि हृदय जी कैसें । बोळलें भक्तिप्रेमरसें । तेथ तुझे चरण सावकाशें । अतिउल्हासें वाहताती ॥ १४ ॥ करितां चरणांचें ध्यान । जे विसरले भूकतहान । त्यांसी द्यावया अभयदान । चरणध्वजु जाण पैं तुझा ॥ १५ ॥ तोचि चरण सात्वतीं । पावावया समविभूती । पूजिला जी श्रीपती । चतुर्मूर्ती व्यूहरूपें ॥ १६ ॥ वासुदेव संकर्षण । अनिरुद्ध आणि प्रद्युम्न । हाचि चतुर्व्यूह जाण । पूजास्थान भक्तांचें ॥ १७ ॥ भिन्न भिन्न चारी व्यक्ती । चहूं रूपीं एक मूर्ती । ऐसें जाणोनि पूजिजे भक्तीं । व्यूहस्थिति त्या नांव ॥ १८ ॥ सात्वत म्हणिपती ते भक्त । भगवत्पदऐश्वर्यातें वांछित । चतुर्व्यूहरूपें पूजित । ऐश्वर्यीं चित्त ठेवूनी ॥ १९ ॥ जन्ममरणप्रवाहस्थिती । नासावया एक भक्ती । पूजा कीजे चतुर्मूर्ती । आत्मवंतीं सज्ञानीं ॥ १२० ॥ त्रिषवण त्रिकाळ । पूजा करितां अविकळ । भजोनि जिंतिला कळिकाळ । जन्ममूळ छेदा-

---

चिदाकाशांतील तूं चंद्रमा आहेस. हे पुरुषोत्तमा ! तूं स्वयंप्रकाश आहेस. हे मेघश्यामा ! साधक तुझी मूर्ति पहाण्या-साठीं फार शिणतात. ९ अशा तुझ्या चरणाचें प्रत्यक्ष दर्शन झालें म्हणून साष्टांग नमस्कार करून आम्ही चरणाची स्तुति करितों. ११०.

—याप्रमाणें तुझ्या यशाविषयींची श्रद्धाच शुद्धीचें साधन आहे. पण आम्हीं तुझे चरण साक्षात् पाहिले आहेत, म्हणून —

यः क्षेमाय मुनिभिः आर्द्रहृदा ह्यमानः—जो तुझा चरण मुमुक्षूंकडून मोक्षासाठीं प्रेमार्द्र हृदयानें चिंतिला जातो, यः च सात्वतैः समविभूतये व्यूहे आर्चितः–आणि जो भक्तांकडून समान ऐश्वर्यासाठीं वासुदेवादि व्यूहामध्यें पूजिलेला आहे, आत्मवाद्भिः स्वरतिक्रमाय सवनशः अर्चितः—आणि त्यांतीलच कांहीं आत्मज्ञ धीर भक्तांकडून स्वर्गाचें उल्लंघन करून वैकुंठप्राप्ति व्हावी म्हणून त्रिकाल पूजिला जातो, सः तव अङ्घ्रि नः अशुभाशय धूमकेतुः स्यात्—तो तुझा चरण आमच्या विषयवासनांना जाळणारा अग्नि होतो. १०.

हे श्रीकृष्णा, तुझे चरणरूप धूमकेतू आमच्या अशुभ विषयवासनांचा नाश करितात, हें त्रिभुवनांत प्रसिद्ध आहे. ११ पापरूपी सर्पणाला तुझ्या चरणाचा वणवा लागतांच तो अति तेजस्वी अग्नी त्या पापाला हळुहळू निःशेष जाळून टाकितो. १२ हे अनंता ! असे सर्व पाप्यांना कांपविणारे व भक्तिमानांना अभय देणारे तुझे चरण भक्त सर्वथा हृदयांत धारण करितात. १३ तें हृदय कसें ? तर भक्तिप्रेमरसानें भरलेलें असतें. त्यांत तुझे चरण मोठ्या उल्हासानें ते भक्त धारण करितात. १४ जे तुझ्या चरणांचें ध्यान करीत असतांना तहान भूकहि विसरतात, त्यांना अभय देण्यास तुझे चरण जणूंकाय ध्वजच आहेत. १५ त्याच चरणाचें भक्तांनीं समान ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठीं चतुर्मूर्तिव्यूहरूपानें पूजन केलें. १६ वासुदेव, संकर्षण, अनिरुद्ध व प्रद्युम्न हाच चतुर्व्यूह भक्तांचें पूजास्थान आहे. १७ भिन्न भिन्न चार व्यक्ति चार रूपानें एकाच मूर्तींत आहेत, असें समजून पूजा करावी. त्यालाच व्यूहस्थिति असें नांव आहे. १८ जे भक्त सात्वत म्हणवितात ते भगवानाच्या ऐश्वर्याची इच्छा करितात. ते चतुर्व्यूहरूपानें ऐश्वर्यांत चित्त ठेवून पूजा करितात. १९ आत्मज्ञानी सज्ञान पुरुषांनीं जन्म, मरण, जरादिकांचा नाश होण्यासाठीं भक्तीनें चतुर्मूर्तींची पूजा करावी. १२० सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं जे तुझी सांग पूजा

वया ॥ २१ ॥ आणिकही भक्तजन । तुझें करिताती भजन । यज्ञद्वारा होमहवन । विधिविधान वेदोक्त ॥ २२ ॥

यश्चिन्त्यते प्रयतपाणिभिरध्वराग्नौ त्रय्या निरुक्तविधिनेश हविर्गृहीत्वा ।
अध्यात्मयोग उत योगिभिरात्ममायां जिज्ञासुभिः परमभागवतैः परीष्टः ॥ ११ ॥

दीक्षाग्रहणी अतिसादर । यज्ञद्वारा भजनतत्पर । क्रियेपासोनि नेमिले कर । हस्तव्यापार न करिती ॥ २३ ॥ तेथ वेदत्रयीची विधानकळा । बाहेर त्रिगुणांची त्रिमेखळा । आंत यज्ञपुरुष आव्हानिला । चैतन्यतेजाळा सर्वात्मा ॥ २४ ॥ तेथ ओंकार वषट्कार । लक्षणोक्त मंत्रउच्चार । द्रव्यें अर्पिती अपार । अतिपवित्र अवदानीं ॥ २५ ॥ आणिक एक योगयुक्त । योगधारणा तूतें भजत । प्राणापानांची समता देत । आसनस्थ होऊनियां ॥ २६ ॥ वज्रासनीं दृढ बंध । भेदोनि षट्चक्रांचे भेद । कुंडलिनीचा स्कंध । अतिसुबद्ध थापटिला ॥ २७ ॥ ते खवळली महाशक्ती । वेगें चालिली ऊर्ध्वगती । पवन ग्राशूनि ग्रासिती । योगस्थिती गगनातें ॥ २८ ॥ शोषूनि सहस्रदळाचे पाट । औटपीठ आणि गोल्हाट । क्रमोनियां श्रीहाट । आली अतिउद्भट ब्रह्मस्थाना ॥ २९ ॥ तेथ परमानंदाचा भोग । शिवशक्तींचा संयोग । यापरी अभ्यासोनि योग । हा भजनमार्ग योग्यांचा ॥ १३० ॥ तुझी जाणावया माया । एक भजों लागलें तुझिया पाया । सर्वथा अतर्क्य तुझी माया । देवराया श्रीकृष्णा ॥ ३१ ॥ माया न लक्षेचि लक्षितां । तोचि मायामोह जाला चित्ता । मग तें सिद्धीलागीं तत्त्वतां । चरण भगवंता पूजिती ॥ ३२ ॥ आणिकही एक पक्ष । तुज भजावया मुमुक्ष । जाले गा अतिदक्ष । अध्यात्मपक्ष

---

करितात ते पुनर्जन्माचें मूळ छेदण्यासाठीं कळिकाळाला जिंकितात. २१ दुसरे भक्त यज्ञद्वारां व वेदोक्त विधीनें होमहवन करून तुझें पूजन करितात. १२२.

ईश प्रयतपाणिभिः हविः गृहित्वा अध्वराग्नौ त्रय्या निरुक्तविधिना यः चिन्त्यते–हे ईश्वरा, जोडलेल्या हातांनीं हवि ग्रहण करून आहवनीयादि अग्नींमध्यें वेदानें सांगितलेल्या विधीनें जो यज्ञपुरुष इंद्रादिरूपानेंच चिंतिला जातो, उत–शिवाय, अध्यात्मयोग योगिभिः आत्ममायां जिज्ञासुभिः यः चिन्त्यते–अध्यात्मयोगामध्यें तुझी अणिमादि माया जाणण्याची इच्छा करणाऱ्या योग्यांकडून ती ती सिद्धि मिळावी म्हणून ज्याचें चिंतन केलें जातें, परमभागवतैः परीष्टः–पण मुक्त झालेल्या परम भागवतांकडून जो सर्वतः पूजिला जातो तो तुझा चरण आमच्या अशुभ वासनांना जाळणारा अग्नि होवो. ११.

दीक्षा ग्रहण करण्यांत अतिशय दक्ष, यज्ञद्वारां भजन करण्यांत अतिशय तत्पर, असे याज्ञिक क्रियेपासून आपल्या हातांना एक क्षणभरहि वेगळे होऊं देत नाहींत. २३ त्यांना वेदाचें विधान प्रमाण असतें, ते बाहेरून त्रिगुणांच्या तीपदरी दोरीनें बद्ध झालेले असतात, आंत चैतन्यप्रकाश सर्वात्मा यज्ञपुरुष बोलाविलेला असतो. २४ ओंकार, वषट्कार लक्षणयुक्त मंत्रोच्चार यांच्यायोगानें ते आहुतीमध्यें अति पवित्र व अपार द्रव्य अर्पण करितात. २५ दुसरे योगयुक्त होऊन योगधारेणेनें तुला भजतात. आसनस्थ होऊन प्राण व अपान यांची गति समान करितात. २६ वज्रासन घालून बसतात. षट्चक्रांचा भेद करून कुंडलिनीला हालवून जागे करितात. २७ ती महाशक्ति खवळून वेगानें ऊर्ध्वगमन करूं लागते व वायूचा ग्रास करून योगस्थितीनें गगनाला जाऊन भिडते. २८ सहस्रदळाचें पाट शोषून औटपीठ, गोल्हाट व श्रीहाट यांचें क्रमानें आक्रमण करून ती अति उत्कट ब्रह्मस्थानाला जाऊन पोंचतें. २९ तेथें ब्रह्मानंदाचा अनुभव घेते, कारण त्या स्थानीं शिव-शक्तींचा संयोग झालेला असतो. याप्रमाणें योगाचा अभ्यास करणें हा योग्यांचा भजनमार्ग आहे. १३० कित्येक तुझी माया जाणण्यासाठीं तुझ्या चरणांना भजूं लागले; पण हे देवराया, श्रीकृष्णा ! तुझी माया अतर्क्य आहे. ३१ मायेचें कितीहि चिंतन केलें तरी ती दिसत नाहीं. तोच चित्ताला महामोह झाला व ते सिद्धीसाठीं भगवंताच्या चरणाचें पूजन करूं लागले. ३२ मुमुक्षूंना तुझें भजन करण्यास योग्य असा आणखीहि एक मार्ग आहे. त्या अध्यात्मपक्षाचा स्वीकार करून कित्येक तुझें भजन

निजयोगें ॥ ३३ ॥ आत्ममायेचा नाशू । करावया जिज्ञासू । निजात्मबोधें सावकाशू । अतिउल्हासू पूजेचा ॥ ३४ ॥ विवेकाचिया भावना । नित्यानित्याची विवंचना । करुनि आणितां अनुसंधाना । सर्वत्र जाणा तूंचि तूं ॥ ३५ ॥ जें अनित्यपणें बाळिलें । तें मायिकत्वें मिथ्या जाहलें । मग चिन्मात्रैक उरलें । निर्वाळिलें निजरूप ॥ ३६ ॥ एवं पाहतां चहूंकडे । तुझेंचि स्वरूप जिकडे तिकडे । मग पूजिती बाडेंकोडें । निजसुरवाडें सर्वत्र ॥ ३७ ॥ जें जें देखती जे जे ठायीं । तें तें तुजवांचूनि आन नाहीं । ऐसा सर्वत्र चरण पाहीं । ठायींचा ठायीं पूजिला ॥ ३८ ॥

पर्युष्टया तव विभो वनमालयेयं संस्पर्धिनी भगवती प्रतिपत्निवच्छ्रीः ।
यः सुप्रणीतममुयाऽर्हणमाददन्नो भूयात्सदाऽङ्घ्रिरशुभाशयधूमकेतुः ॥ १२ ॥

ऐसें सर्वत्र तूतें पूजिती । ते भक्त पढियंते होती । त्यांची पूजा तेही अतिप्रीतीं । स्वयें श्रीपती मानिसी ॥ ३९ ॥ रानींची रानवट वनमाळा । भक्तीं आणूनि घातली गळां । रमा सांडोनि उताविळा । स्वयें भाळला माळेसी ॥ १४० ॥ भक्तीं अर्पिली आवडीं । म्हणोनि तियेची अधिक गोडी । शिळी जाली तरी न काढी । अर्धवडी गळांची ॥ ४१ ॥ भक्तीं भावार्थें अर्पिली । देवें सर्वांगीं धरिली । यालागीं सुकों विसरली । टवटवीत सर्वदा ॥ ४२ ॥ तिचा आस्वादितां गंधु । भावें भुलला मुकुंदु । श्रियेसी उपजला क्रोधु । सवतीसंबंधु मांडिला ॥ ४३ ॥ मज न येतां आधीं । भक्तीं अर्पिली नेणों कधीं । मी तरुण सांडोनि विशुद्धी । ते वृद्ध खांदीं वाहातसे ॥ ४४ ॥ देव नेणे भोगाची खूण । ती वृद्ध मी

---

करूं लागले. ३३ आत्ममायेचा नाश करण्यासाठीं जिज्ञासूंना आत्मबोधानें तुझी पूजा करण्याचा अति उल्हास वाटतो, ३४ पण विवेकाच्या अभ्यासानें नित्यानित्यविवेचन तुझें अनुसंधान करूं लागलें असतां सर्वत्र एक तूंच तूं दिसूं लागतोस. ३५ जें अनित्यत्वानें युक्त असतें तें मायिक म्हणून मिथ्या होतें व मग केवळ एक चिन्मात्र निजरूपच अवशिष्ट रहातें. ३६ याप्रमाणें पाहूं लागलें असतां चहूंकडे जिकडे तिकडे तुझेंच स्वरूप दिसतें. त्यामुळें असले भक्त मोठ्या आवडीनें सर्वत्र तुझेंच पूजन करितात. ३७ ज्या ज्या ठिकाणीं जें जें कांहीं पहातात तें तें तुझ्यावांचून दुसरें कांहीं नाहीं. याप्रमाणें ते तुझ्या चरणाची बसल्या ठिकाणींच पूजा करितात. १३८.

—पूर्वोक्त मुनि, भक्त, इत्यादि या सहा प्रकारच्या सेवकांतील परम भागवतांवर लक्ष्मीहूनहि तुझी अधिक प्रीति आहे, अशी देव स्तुति करितात—

हे विभो—हे प्रभो, भगवती श्रीः यत्र अहं वसामि तत्र एव इयं अपि वसति इति प्रतिपत्नीवत् संस्पर्धिनी—ही पूज्य रमा ज्या वक्षःस्थलावर मी रहातें तेथेंच ही शिळी वनमालाहि रहाते, असें म्हणून एखाद्या सवतीप्रमाणें तिच्याशीं स्पर्धा करिते. तथापि-तरी त्या स्पर्धा करणाऱ्या श्रीचा अनादर करून, यः अनया पर्युष्टया वनमालया सुप्रणीतं अर्हणं आददत्—जो तूं या शिळ्या झालेल्याहि वनमालेनें ही भक्तानें अर्पिली आहे अशा प्रीतीनें संतोषपूर्वक पूजेचा स्वीकार करितोस, तस्य तव अङ्घ्रिः नः अशुभाशयधूमकेतुः सदा भूयात्-तो तुझा चरण आमच्या अशुभ वासनांना दग्ध करणारा सर्वदा होवो. १२.

याप्रमाणें जे तुला सर्वत्र पूजितात ते भक्त तुला प्रिय होतात. हे श्रीपते, त्यांची पूजा तूं मोठ्या आवडीनें स्वीकारितोस. ३९ भक्तानें रानांतील रानटी फुलांची माळ गळ्यांत आणून घालतांच तूं रमेला सोडून त्या माळेला भाळतोस. १४० भक्तानें प्रेमानें अर्पण केलेली म्हणून तिची अधिक गोडी, ती शिळी झाली तरी क्षणभरहि गळ्यांतून काढीत नाहींस. ४१ भक्तानें परम श्रद्धेनें अर्पण केलेली आणि देवानें सर्वांगावर धारण केलेली, तेव्हां ती कोमेजण्याचेंहि विसरली व सर्वदा टवटवीत राहिली. ४२ तिचा वास घेण्यांत मुकुंद इतका गुंग झाला कीं, तें पाहून लक्ष्मीच्या मनांत सवतीमत्सर उत्पन्न होऊन ती क्रोधानें बोलूं लागली. ४३ ‘ मी तुमच्याकडे येण्याच्या आधींच भक्तानें कधीं ही अर्पण केली कोणास ठाऊक ! मी तरुण असूनहि मला सोडून त्या वृद्धेला खांद्यावर वहातां. ४४ देव भोगाची खूण जाणत नाहीं. मी तरुण आणि ती वृद्धा, तरी हा निर्गुण तिला भाळला आहे.

तरुण। परी तिशींच भुलला निर्गुण। गुणागुण हा नेणे ॥ ४५ ॥ मज चरणसेवा एकादे वेळां। हे सर्व काळ पडली गळां। मजहूनि स्नेह आगळा। नेला वनमाळा सर्वथा ॥ ४६ ॥ मातें डावलूनि वेगीं। हे बैसली दोहीं अंगीं। इसीं बोलतो श्रीशार्ङ्गी। मजचिलागीं त्यागील ॥ ४७ ॥ मज दीधली चरणांची सेवा। इचा मत्सरू किती सहावा। अपाद आवरिलें यादवा। माझी सेवा हरितली ॥ ४८ ॥ मी कुळात्मजा क्षीराब्धीची। हे रानट रानींची। खांदीं बैसली देवाची। भीड भक्तांची म्हणवूनी ॥ ४९ ॥ हे भक्तिबळें बैसली खांदीं। कंहीं नुतरेचि त्रिशुद्धी। रमा वनमाळेतें वंदी। द्वेषबुद्धी सांडोनी ॥ १५० ॥ ऐसी भक्तांची पूजा। तुज आवडे गरुडध्वजा। सुप्रणीत भावो बोजा। चरणीं तुझ्या अर्पिल्या ॥ ५१ ॥ तो चरणधूमकेतु तुझा। आमुच्या पापांतें नाशू वोजा। पुनः पुनः गरुडध्वजा। पापसमाजा निर्दळ ॥ ५२ ॥ करितां चरणांचें वर्णन। न धाये देवांचें मन। पुढतपुढतीं चरणस्तवन। ध्वजलक्षण वर्णिती ॥ ५३ ॥

केतुस्त्रिविक्रमयुतस्त्रिपतत्पताको यस्ते भयाभयकरोऽसुरदेवचम्वोः।
स्वर्गाय साधुषु खलेष्वितराय भूमन् पादः पुनातु भगवन् भजतामघं नः ॥ १३ ॥

बलिबंधनीं अनंता। त्रिविक्रमचरणु वाढतां। सत्यलोकाहीं वरुता। दिसे झळकता श्रीचरणु ॥ ५४ ॥ चरणु वाढला सर्वांवरी। तो केतु बोलिजे कवीश्वरीं। पताका झळकत कवणेपरी। सुरसरित् निजगंगा ॥ ५५ ॥ बलिबंधनीं आवेश। चरण उचलिला दुराश। नखें भेदला आवरणकोश। जळ

---

याला गुण अवगुण कांहीं कळत नाहीं. ४५ मला चरणसेवा एखाद्या वेळींच घडते. पण ही मात्र सर्वकाळ त्याच्या गळ्यांत पडलेली असते. माझ्याहून जास्त प्रेम या वनमाळेवर आहे. ४६ मला डावीकडे ढकलून हिला मात्र दोहोंबाजूला बसविली आहे. बरें हिला जर कांहीं बोलावें तर भगवान् माझा त्याग करणार ! ४७ मला आपल्या चरणाची सेवा करावयास लावलें आहे व हिनें मात्र यादवाला पायापर्यंत व्यापिलें आहे आणि माझी सेवा हरण केली आहे. तेव्हां तिचा हा दावा किती सहन करावा ! ४८ मी क्षीरसागराची कुलीन कन्या व ही रानांतील रानवट, पण ती भक्तांच्या भिडेनें देवाच्या खांद्यावर बसली आहे.' ४९ भक्तांच्या सामर्थ्यानें ती वनमाळा देवाच्या खांद्यावर जी बसली ही कांहीं केल्या तेथून खरोखरच उतरेना. हें पाहून रमेनें मत्सर सोडून त्या माळेला वंदन केलें १५० याप्रमाणें हे गरुडध्वजा ! तुला भक्तांची पूजा आवडते. ती तुझ्या निर्मल चरणांवर नम्रभावानें अर्पिली आहे. ५१ तो तुझा चरणरूपी धूमकेतु म्हणजे अग्नि आपल्या तेजानें आमच्या पापाचा नाश करो. आमचा सर्व पापसंचय जळून जावो. ५२ देवाच्या चरणाचें वर्णन करून देवांचें मन तृप्त झालें नाहीं, म्हणून ते आणखी चरणस्तवन करून ध्वजलक्षण वर्णितात. १५३.

—तुझ्या चरणाचा भक्तपक्षपात प्रसिद्धच आहे, अशी स्तुति करीत होत्साते देव भगवानाची स्तुति करितात—

त्रिविक्रमयुतः–बलीच्या बंधनप्रसंगीं तीन विक्रमांनीं–पावलांनीं युक्त असलेला, ( त्यांतील द्वितीय विक्रमाचें वेळीं सत्य-लोकास गेलेला तुझा पाद ) केतुः–अति उंच विजयध्वजाप्रमाणें, त्रिपतत्पताकः–तीन मार्गांनीं तीन लोकांमध्यें संचार करणारी गंगा याच ज्याच्या तीन पताका आहेत, यः असुरदेवचम्वोः भयाभयकरः–आणि जो तुझा चरण असुरांच्या सेनेला भय देणारा व देवांच्या सेनेला अभय देणारा आहे तसाच, यः ते पादः–जो तुझा चरण, भूमन्–हे सर्वव्यापका !, साधुषु स्वर्गाय खलेषु इतराय–देवांच्या ठिकाणीं स्वर्गसुखाला व असुरांच्या ठिकाणीं अधोगमनरूप दुःखाला कारण होतो, हे भगवन्–हे भगवाना ! सः– तो तुझा केतुरूप चरण, भजतां नः अघं पुनातु–भजन करणाऱ्या आमच्या पापांचा नाश करो. १३.

हे अनंता ! बळीच्या बंधनप्रसंगीं त्रिविक्रमचरण चढतां वाढतां सत्यलोकाच्याहि वर झळकत असलेला दिसला. ५४ त्या सर्वांहून उंच वाढलेल्या चरणाला श्रेष्ठकवींनीं ध्वज म्हटलें आहे. त्यावर त्या चरणांपासूनच उत्पन्न झालेली गंगा पताकेप्रमाणें झळकत आहे. ५५ बळीबंधनाच्या वेळीं मोठ्या आवेशानें तूं पाऊल उचलतांच तुझ्या नखानें भूमीच्या आवरणकोशाचा भंग झाला व त्यांतून पाण्याचा प्रवाह वाहूं लागला. ५६ भगवानाच्या चरणस्पर्शानें त्या जलाला

बहुवस चालिलें ॥ ५६ ॥ चरणस्पर्शें भगवंता । जाली जीवनासी पवित्रता । ब्रह्मा कमंडलीं धरितां । शिवें माथा वाहिली ॥ ५७ ॥ चरणध्वजीं पताका ते गंगा । त्रिवाहिनी त्रिपथगा । चरणशोभा श्रीरंगा । नयनभृंगा उल्हासू ॥ ५८ ॥ केतु झळकालिया पाठीं । आसुरी सेनेसी भय उठी । दैवी संपत्तीचे पोटीं । अत्यंत उठी आल्हादु ॥ ५९ ॥ आणिक चरणाची कथा । देवांसी स्वर्गसुखदाता । तोंच चरणु अधर्मवंतां होय तत्त्वतां नरकहेतू ॥ १६० ॥ एक तरले चरण पूजितां । एक तरले चरण ध्यातां । चरण उपेक्षिती सर्वथा । अधःपाता ते जाती ॥ ६१ ॥ चरण वंदिती कां निंदिती । ते निजपदाप्रती जाती । सर्वथा जे उपेक्षिती । अधोगती तयांसी ॥ ६२ ॥ चरण वंदितां तरली शिळा । निंदितां उद्धरिलें शिशुपाळा । जे उपेक्षिति चरणकमळा । तयां खळां रौरव ॥ ६३ ॥ ऐकें स्वामिया व्यापका । ऐसा तुझा चरण निका । आमुच्या सकळ पातकां । क्षणार्धें देखा उद्धारू ॥ ६४ ॥ जेथ पापाचा जाला उद्धारू । तेथ सहजचि खुंटला दुराचारू । ऐसा तरावया संसारू । चरण साचारू पैं तुझा ॥ ६५ ॥

नस्योतगाव इव यस्य वशे भवन्ति ब्रह्मादयस्तनुभृतो मिथुरर्द्यमानाः ।
कालस्य ते प्रकृतिपूरुषयोः परस्य शं नस्तनोतु चरणः पुरुषोत्तमस्य ॥ १४ ॥

निजसुखातें विस्तारितां । तुझा चरण जी अच्युता । काळादिकर्मांचा शास्ता । आत्मा नियंता देवांचा ॥ ६६ ॥ तूं काळाचा निजनियंता । काळासी अकाळें न करवे सत्ता । देवांसी अधिकारीं स्थापिता । देवनियंता । तूं कृष्णा ॥ ६७ ॥ कर्मस्वामी तूं कृष्णनाथा । इंद्रियक्रिया समस्ता । कोणा न करवे अन्यथा । कर्मनियंता श्रीकृष्णु ॥ ६८ ॥ ब्रह्मादि शरीर धारी । तूजआधीन गा श्रीहरी । जैसें

---

पवित्रत्व प्राप्त झालें. ब्रह्मदेवानें तें जल कमंडलूंत घेतलें व शिवानें मस्तकावर धारण केलें. ५७ तुझ्या चरणध्वजावरील जी पताका तीच ही तीन मार्गांनीं तिन्ही लोकांत वहाणारी गंगा होय. हे श्रीरंगा ! त्या तुझ्या चरणाची शोभा नेत्ररूपी भृंगांना फार आनंद देते. ५८ तो ध्वज फडकतांच असुरसेनेला मोठें भय उत्पन्न झालें व दैवीसंपत्तीनें युक्त असलेल्या देवांच्या मनांत मोठा आनंद उत्पन्न झाला. ६९ तुझ्या चरणांची आणखी दुसरी कथा ऐक. देवांना स्वर्गसुख देणारा तोच चरण अधर्मी लोकांना नरकांचा हेतु होतो. १६० चरणांचें पूजन करून कोणी तरले, दुसरे चरणांचें ध्यान करून तरले, पण चरणांची उपेक्षा करणारे मात्र अधोगतीला जातात. ६१ चरणांना वंदन करणारे व निंदा करणारे दोघेहि ब्रह्मपदाला प्राप्त होतात; परंतु सर्वथा उपेक्षा करणारांचा मात्र अधःपात होतो. ६२ श्रीरामचरणाला वंदन करितांच शिळा झालेली अहल्या उद्धरून गेली. श्रीकृष्णाची निंदा करणारा शिशुपाळहि उद्धरून गेला; पण तुझ्या चरणकमलाची जे उपेक्षा करितात ते दुर्जन रौरव नरकांतच पडतात. ६३ हे सर्वव्यापि प्रभो, ऐक. असा तुझा चरण खरोखर सर्व पापांपासून आमचा क्षणांत उद्धार करितो. ६४ जेथें पापांचा नाश झाला तेथें दुराचार सहजच खुंटला. याप्रमाणें तुझा चरण खरोखर संसारांतून तारणारा आहे. १६५.

—अहोपण, युद्धामध्यें देव व असुर एकमेकांना जिंकितात व एकमेकांचा पराभव करितात, त्यांत माझा काय संबंध ! अशी आशंका घेऊन देव म्हणतात—

नसि ओतगावः इव—ज्याच्या नाकांत वेसण घातली आहे अशा बैलांप्रमाणें, मिथुः अर्द्यमानाः ब्रह्मादयः तनुभृतः यस्य वशे भवन्ति—परस्पर युद्धादिकांच्या योगानें पीडिले जाणारे ब्रह्मादि देवधारी ज्याच्या अधीन रहातात, तस्य प्रकृतिपूरुषयोः परस्य पुरुषोत्तमस्य ते कालस्य चरणः नः शं तनोतु—त्या प्रकृति व पुरुष यांहून पर असलेल्या पुरुषोत्तम अशा तुज कालाचा म्ह० सर्वप्रवर्तकाचा तो चरण आमचें कल्याण करो. १४.

हे अच्युता ! तुझा चरण स्वात्मसुखाचा विस्तार करणारा आहे, काळादि कर्मांचा शास्ता आहे व देवांचा नियंता आत्मा आहे. ६६ हे श्रीकृष्णा ! तूं काळाचा नियंता आहेस, ६७ कारण तो तुझ्या इच्छेविरुद्ध वागूं शकत नाहीं. देवांना अधिकारावर स्थापून त्यांचा नियंताहि तूं आहेस. हे कृष्णानाथा ! तूं कर्मांचा स्वामी आहेस. इंद्रियांचें समस्त व्यापार कोणालाहि अन्यथा करितां येत नाहींत. तेव्हां तूं कर्मांचाहि नियंता आहेस. ६८ हे श्रीहरि ! ब्रह्मदेवादिक सर्व

**नाथिलें बैल नांगरीं । कृषीवळून धरी स्वामित्वें ॥ ६९ ॥ तेथ जो राहे मागें पुढें । तो झोडिजे आसुडें । तूझे आज्ञेवरी रोकडे । वर्तती गाढे कळिकाळादिक ॥ १७० ॥ संसारलक्षण शेताशी । अधिकारी जुंपोनी सर्वांसी । निजकर्मे क्षेत्रासी । तूं वाहविसी निजाज्ञा ॥ ७१ ॥ रोंवोनि अहंकाराची मेढी । महत्तत्त्वांचें खळें झाडी । त्रिगुणदोरें बापुडीं । बांधिशी कडोविकडी जीवपशूंतें ॥ ७२ ॥ उदोअस्तांचेनि झणत्कारें । देतां निजकर्मांचे फेरे । जो खांदा चुकवोनि वोसरे । तोचि मारें मारिजे ॥ ७३ ॥ हा बोल जरी म्हणसी वायां । सृष्टिकर्त्री धरिती माया । मजसी संबंध नाहीं यया । देवराया हें न म्हणें ॥ ७४ ॥ मायेसी तूं अधिष्ठान । यालागीं तूं परम कारण । तुझिये मांडीवरी जाण । क्रीडास्थान प्रकृतिपुरुषां ॥ ७५ ॥ तूं मायेहूनि अपारू । प्रकृतिपुरुषांहूनि परू । काळाचा काळ तूं दुर्धरू । सर्वसंहारू कर्ता तूं ॥ ७६ ॥ आमुच्या निजसुखा उत्तमा । तुझा चरणविस्तार मेघश्यामा । हेंचि मागों पुरुषोत्तमा । कृपा आह्मांवरी कीजे ॥ ७७ ॥**

अस्यासि हेतुरुदयस्थितिसंयमानामव्यक्तजीवमहतामपि कालमाहुः ।
सोऽयं त्रिणाभिरखिलापचये प्रवृत्तः कालो गभीररय उत्तमपूरुषस्त्वम् ॥ १५ ॥

**जगाची उत्पत्ति स्थिति । तुजचिपासोनि श्रीपति । सकळ संहारिता अंतीं । तूंचि निश्चितीं महाकाळु ॥ ७८ ॥ क्षोभलिया तामसी शक्ती । सृष्टीचा प्रळय करी अंतीं । तेथें बीजरूपीं अव्यक्तीं ।**

---

देहधारी तुझ्या अधीन आहेत. ज्याप्रमाणें शेतकरी बैलाला वेसण घालून ताब्यांत ठेवितो, ६९ तो जरा मागें पुढें करूं लागला कीं, त्याला आसुडानें झोडितो, त्याप्रमाणें कलिकाळादिक सर्व तुझ्या आज्ञेप्रमाणें चालतात. १७० तूं संसाररूपी शेताला तो तो अधिकारी जुंपून त्या देहवानास आपल्या आज्ञेप्रमाणें वागवायास लावितोस. ७१ अहंकाराची मेढ रोवून, महत्तत्त्वांचें खळें झाडून, त्रिगुणरूपी रज्जूंनीं या बिचाऱ्या जीवपशूंना तूं बांधून टाकितोस. ७२ सूर्याचे उदय व अस्त याच आसुडाच्या आवाजानें तूं त्यांना आपल्या कर्मांचे फेरे देतोस. त्यांतील जो खांदा चुकवून निसटूं पहातो, त्याला तूं मार देतोस, ७३ हें तुमचें बोलणें व्यर्थ आहे. कारण सृष्टिकर्त्री माया आहे. माझा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं, असें जर म्हणशील तर हे देवराया ! तें खरें नव्हे. ७४ तूं मायेचें अधिष्ठान आहेस, म्हणून तिचा माझा संबंध नाहीं, असें म्हणूं नकोस. तुझी मांडी हें प्रकृतिपुरुषाचें क्रीडास्थान आहे. ७५ तूं मायेहून भिन्न आहेस. प्रकृति-पुरुषांहून पर आहेस. काळाचा तूं दुर्धर काळ आहेस. सर्वांचा संहारकर्ता तूंच आहेस. ७६ हे मेघश्यामा ! आमच्या उत्तम सुखाचें निमित्त तुझा चरण आहे. यास्तव हे पुरुषोत्तमा ! आम्हांवर कृपा कर. हेंच मागणें आम्ही तुझ्यापाशीं मागतों. १७७.

—तुज पुरुषाला प्रकृतिपुरुषांहून परत्व आहे असें उपपादन करणारे देव त्याचें कालत्वानें पुरुषोत्तमत्व सांगतात—

**अस्य उदयस्थितिसंयमानां हेतुः असि**—तूं या जगाच्या उत्पत्ति–स्थिति–लयांचा हेतु आहेस., **अव्यक्तजीवमहतां अपि कालं आहुः**—कारण ' सर्वकारणभूत अक्षराहून म्ह० प्रकृतीहून तो **पर आहे**,' महत्‌हून अव्यक्त **पर आहे**, अव्यक्तहून पुरुष पर आहे, ' पुरुषाहून पर कांहीं नाहीं, तीच सर्वांची परा गति आहे, ' इत्यादि श्रुति. का. भा. १. ३. ११ पृ. ६३ प्रकृति, पुरुष व महत्तत्त्व यांचा तूं काल म्ह० नियंता आहेस, असें सांगतात. **यः अयं त्रिणाभिः अखिलापचये प्रवृत्तः गभीररयः कालः सः अपि त्वं**—जो हा तीन चातुर्मास्य याच ज्याच्या नाभी आहेत, असा सर्व वस्तूंचा क्षय **करण्यास प्रवृत्त झालेला** गंभीर वेगवान् संवत्सरात्मक काल तोहि तूंच आहेस, **अतः उत्तमपूरुषः**- म्हणून तूं उत्तम पुरुष आहेस. [श्रीमद्भगवगीतेच्या ' यस्मात् क्षरमतितोहं०' इत्यादि श्लोकांत सु. गी. १५–१८ पृ. २२८ पुरुषोत्तमाचें निर्वचन केलें आहे. ] १५.

हे श्रीपति ! जगाची उत्पत्ति व स्थिति तुझ्यापासूनच होते व शेवटीं सर्वांचा संहार करणारा महाकाळहि निश्चयानें तूंच आहेस. ७८ तामस शक्ति क्षुब्ध झाली म्हणजे ती सृष्टीचा प्रलय करिते, तेव्हां बीजरूपानें जीव

जीव राहती सूक्ष्मत्वें ।। ७९ ।। मग उत्पत्तीचे काळवेळे । तींच बीजें विरूढती सकळें । पाल्हेजती स्थितिकाळें । पुष्पफळें सफळित ।। १८० ।। हे गुणक्षोभाची अवस्था । तेथ मी नव्हें प्रळयकर्ता । ऐसें म्हणसी जरी कृष्णनाथा । तरी हे कथा परियेसीं ।। ८१ ।। तुझा साचार जालिया भावो । माया महत्तत्त्व आणि । जीवो । नासोनियां दास पाहा हो । निजपदीं निर्वाहो भोगिती ।। ८२ ।। त्या तूज सकळ संहारितां । कोण दुर्घटता कृष्णनाथा । कारणेंसीं प्रळयकर्ता । तूंचि सर्वथा महकाळु ।। ८३ ।। कळों नेदिसी संसारास्थिती । अतिसूक्ष्म काळगती । नाश करिसी अंतीं । निजप्रकृतिविकार ।। ८४ ।। प्रळयासी प्रमाण मूळ । लव निमेष घटिका पळ । अहोरात्र त्रिकाळ । त्रिनाभी केवळ जो म्हणिये ।। ८५ ।। ऐसिये गंभीर गतीसीं । मायामहत्तत्त्व नाशिसी । तो तूं महाकाळ होसी । हृषीकेशी श्रीकृष्णा ।। ८६ ।।

त्वत्तः पुमान् समधिगम्य ययाऽस्य वीर्यं धत्ते महान्तमिव गर्भममोघवीर्यः ।
सोऽयं तयानुगत आत्मन अण्डकोशं हैमं ससर्ज बहिरावरणैरुपेतम् ।। १६ ।।

पुढतीं सृष्टीचा स्रजिता । तूंचि होसी गा अनंता । ते उत्पत्तीची अवस्था । मूळकर्ता तूंचि तूं ।।८७।। तुझी लाहोनि वीर्यशक्ती । होये पुरुषासी पुरुषत्वप्राप्ती । तेणें अंगीकारूनि प्रकृती । केलें उत्पत्ती गर्भाधान ।। ८८ ।। तेचि ते वेळीं प्रकृती । महत्तत्त्वीं होय गर्भवती । पंचतत्त्वेंसी गर्भीं धरिती । हिरण्यवर्ण अंडातें ।। ८९ ।। तें अमोघ वीर्य प्रबळ । गर्भीं विश्वाकार बाळ । धरिती जाहली वेल्हाळ । ब्रह्मांड सकळ अंडामाजीं ।। १९० ।। जैसें गर्भासी उल्ब जाण । तैसें अंडासी बहिरावरण । सप्तधा नेमस्त प्रमाण । तूं निर्माण करविता ।। ९१ ।। पृथ्वी जल अनल अनिल । नभ आणि अहंकार स्थूल ।

---

अव्यक्तांत सूक्ष्मत्वानें रहातात. ७९ उत्पत्तीचा समय आला म्हणजे तीच सर्व लीन झालेली बीजें पुनः उगवतात व स्थितिकाळीं त्याला पालवी फुटून ती आपापल्यापरी फल-पुष्पानीं फुलून जातात, १८० हे प्रकृतीच्या गुणक्षोभाचें धर्म आहेत. त्यांत मी प्रलयकर्ता नाहीं, असें जर म्हणशील तर हे कृष्णनाथा! ही कथा ऐक! ८१ तुझें तत्त्वतः स्वरूप-ज्ञान झालें असतां माया, महात्तत्त्व व जीव हीं नाहींशीं होऊन तुझे भक्त निजपदाचें सुख भोगितात. ८२ सर्वांचा संहारकर्ता असा जो तूं त्या तुला दुर्घट असें काय आहे! कारणासह सर्वांचा नाश करणारा महाकाळ तूंच आहेस. ८३ तूं संसारस्थिति कळूं देत नाहींस. अतिसूक्ष्म काळगतीनें तूं आपल्या प्रकृति विकारानें तिचा शेवटीं नाश करितोस. ८४ लव, निमेष, घटिका, पळ, अहोरात्र व वर्षाचे तीन काळ यांनीं युक्त असलेला जो तूं तो 'केवळ त्रिणाभी' असें म्हटला जातोस. तेंच प्रलयाचें मूळ प्रमाण आहे. ८५ अशा गंभीर गतीनें तूं माया-महत्तत्त्वाचा नाश करितोस, म्हणूनच हे श्रीकृष्णा! तूं महाकाळ आहेस. १८६.

—प्रकृत्यादिकांच्या द्वारां तूंच जगाच्या उत्पत्यादिकांचें कारण आहेस, पण तें कोणत्याप्रकारानें हें आतां सांगतात—

अमोघवीर्यः पुमान् त्वत्तः वीर्यं समधिगम्य यया सह अस्य गर्भं इव महान्तं धत्ते—ज्यांचें सामर्थ्य अमोघ आहे, असा पुरुष तुझ्यापासून शक्तीला प्राप्त होऊन ज्या मायेसह या जगाच्या गर्भाप्रमाणें महत्तत्त्वाला धारण करितो, सः अयं तया अनुगतः सन् आत्मनः हैमं बहिरावरणैः उपेतं अंडकोशं ससर्ज—तो हा महान् त्या मायेनें अनुगत होत्साता आत्म्यापासून बाह्य आवरणांनीं युक्त, सुवर्णासारखा तेजस्वी असा ब्रह्माण्डकोश उत्पन्न करिता झाला. १६.

पुढें सृष्टीचा उत्पन्नकर्ताहि हे अनंता! तूंच होतोस. त्या उत्पत्तीचें कारण तूंच आहेस. ८७ तुझी वीर्यशक्ति मिळवून पुरुषाला प्राप्त झालें. त्यानें प्रकृतीचा अंगीकार केला व सृष्टीच्या उत्पत्तीसाठीं तिच्या ठिकाणीं गर्भाधान केलें. ८८ त्यावेळीं ती प्रकृति महत्तत्त्वाच्यायोगें गर्भवती झाली. सुवर्णासारख्या तेजस्वी ब्रह्मांडाला पंचतत्त्वांसह तिनें गर्भांत धारण केलें. ८९ तुझें अमोघ वीर्य अति सामर्थ्यवान् असल्यामुळें ती प्रकृति विश्वाकार बाळ म्ह० सर्व ब्रह्मांडच आपल्या गर्भांत वाढवूं लागली. १९० गर्भाला जसें वारेचें आवरण असतें तसें तूं त्या ब्रह्मांडाला सात प्रकारचें आवरण निर्माण केलेंस. ९१ पृथ्वी, जल, वायु, तेज, आकाश, स्थूल अहंकार आणि सातवें अति प्रबल

सातवें तें अतिसबळ । जाण केवळ क्रियासूत्र ॥ ९२ ॥ त्या गर्भासी जतनेवरी । तूंचि आंतू आणि बाहेरी । रिघालासी सूत्रधारी । खांबसूत्रीं जैसा कां ॥ ९३ ॥ ऐसें जग जालें दोघांपासूनी । परी तिसरें न देखों कोणी । अवघी सृष्टी दोघीं जणीं । दुमदुमुनीं भरलीसे ॥ ९४ ॥ वाती लावूनी पाहतां । तिसरें न लगेचि हाता । दुसरी प्रकृती निर्धारितां । तेही सर्वथा टवाळ ॥ ९५ ॥ ऐसा दुजेनवीण एकला । एकलाचि विश्व जाला । आकळीत कौशल्यकळा । मल्लमर्दना श्रीकृष्णा ॥ ९६ ॥ एवं एकलेपणें तूं कर्ता । त्यालागीं लेपु न लगे सर्वथा । कर्म करूनि तूं अकर्ता । तेचि कथा परियेसीं ॥ ९७ ॥

तत्तस्थुषश्च जगतश्च भवानधीशो यन्माययोत्थगुणविक्रिययोपनीतान् ।
अर्थाञ्जुषन्नपि हृषीकपते न लिप्तो येऽन्ये स्वतः परिहृतादपि बिभ्यति स्म ॥ १७ ॥

चरें आणि अचरें । जंगमें आणि स्थावरें । या जगाचा स्वामी तूं निर्धारें । केलें खरें गतश्लोकीं ॥ ९८ ॥ तेंचि स्वामित्व कैसें घडे । हें जरी पुससी धडफुडें । तरी तेहीविखीं रोकडें । वचन गाढें अवधारीं ॥ ९९ ॥ निजमायेचेनि योगें । नाना विषय भोगिसी अंगें । तें भोगिलेपणा अंगीं न लगे । अकर्तात्मसंगें अलिप्त ॥ २०० ॥ तोचि अकर्तात्मबोधू कैसा । जरी म्हणशी हृषीकेशा । तें आगमनिगमां अतर्क्य दशा । परम पुरुषा परियेसीं ॥ १ ॥ भोग्य भोग भोक्ता । या तिहींतें तूं प्रकाशिता । जेवीं घटीं बिंबोनि सविता । अलिप्तता स्वभावें ॥ २ ॥ घटजळप्रतिबिंबासी । स्वयें सविता प्रकाशी । प्रकाशूनि अलिप्त त्यांसी । तेवीं तूं भोगासी श्रीकृष्णा ॥ ३ ॥ अथवा कर्म कार्य कर्ता । या तिहींमाजीं निजात्मता ।

---

वायुरूप सूत्रात्मसंज्ञक क्रियाशक्तीरूप सूत्र जाण. ९२ त्या गर्भाचें अंतर्बाह्य पोषण करणारा तूंच परमात्मा असून कळसूत्री बाहुल्यांच्या प्रवर्तक सूत्रधाराप्रमाणें तूं आंत-बाहेर प्रवेश करून राहिला आहेस. ९३ याप्रमाणे हें जगत् प्रकृति व पुरुष या दोघांपासून उत्पन्न झालें आहे. तिसरें कोणी दिसत नाहीं. ही सर्व सृष्टि या दोघांनीं भरून गेली आहे. ९४ दिवा लावून जरी पाहिलें तरी तिचें कांहींच हातीं लागत नाहीं. दुसरी जी प्रकृति तीहि मिथ्याच आहे. ९५ याप्रमाणें दुसऱ्या कोणावांचून तूं एकटाच सर्व विश्व झालास. हे प्रबलांचें निर्दालन करणाऱ्या श्रीकृष्णा ! हें तुझें कौशल्य कोणालाहि कळत नाहीं. ९६ याप्रमाणें तूं एकटाच सर्वांचा कर्ता असून कशानेंहि लिप्त होत नाहींस. कर्म करूनहि तूं अकर्ता कसा आहेस, तीच कथा आतां ऐक. १९७.

—' पण माझें अशा प्रकारचें ईश्वरत्व तुम्हांला कशावरून अवगत झालें ' असें भगवान् म्हणेल म्हणून इंद्रादि देव सांगतात—

**तत् तस्थुषः च जगतः च भवान् अधीशः**—म्हणून या स्थावर व जंगम जगाचा तूं अधीश्वर आहेस. **यत् हृषीकपते मायया उत्थगुणविक्रियया उपनीतान् अर्थान् जुषन् अपि न लिप्तः**—कारण कीं हे इंद्रियांच्या स्वामिन् ! मायेनें उत्पन्न झालेल्या इंद्रियवृत्तिरूप गुणविकारानें समीप आणलेल्या विषयांचा उपभोग घेत असूनहि तूं लिप्त होत नाहींस. **ये अन्ये स्वतः परिहृतात् अपि बिभ्यति स्म**—पण जे इतर जीव किंवा योगी आहेत ते स्वतः अविद्यमान किंवा त्याग केलेल्या विषयसेवनालाहि भितात म्ह० नुसत्या विषयवासनेनेंच बद्ध होतात, असा भावार्थ. १७.

चर-अचर, स्थावर-जंगम अशा या सर्व जगाचा तूं स्वामी आहेस, ही गोष्ट मागील श्लोकांत निश्चित केली. ९८ पण तें स्वामित्व कसें संभवतें, असें जर उघड उघड विचारशील तर त्याविषयीं स्पष्ट वचन ऐक. ९९ आपल्या मायेच्या योगानें अनेक प्रकारचें विषय तूं स्वत भोगितोस, तरीहि त्या भोगानें लिप्त होत नाहींस. अकर्तृस्वरूपानें अलिप्तच रहातोस. २०० ' तो अकर्तृ-आत्मबोध कसा ' असें जर म्हणशील तर हे हृषीकेशा परमपुरुषा ! आगम-निगमांना अतर्क्य असलेली ती स्थिति ऐक ! १ भोग्य, भोग व भोक्ता या तिहींना तूं प्रकाशित करणारा आहेस ! सूर्य जसा घटांत प्रतिबिंब पाहून पुन अलिप्तच रहातो, २ तो घटजलांत पडलेल्या प्रतिबिंबाला प्रकाशित करितो व स्वतः त्यापासून अलिप्तच रहातो, तसा तूं भोगापासून अलिप्त आहेस. ३ किंवा कर्म, कार्य व कर्ता या तिहींमध्यें

देखे तो अभोक्ता । भोगोनि तत्त्वतां निजभोग ।। ४ ।। दर्पणींच्या प्रतिबिंबासीं । जो प्रवर्तला भोगासी । व्यभिचाराचा आळ त्यासी । केवीं अंगासी लागेल ।। ५ ।। जगचि हें अवघें । जो होऊनि ठाके अंगें । त्यासी बाधावें कोणें भोगें । निजात्मयोगें योगिया ।। ६ ।। ऐशिया बोधाचेनि बळें । तो विषयावरी जरी लोळे । तरी विषयाचेनि विटाळें । बोधु न मैळे तयाचा ।। ७ ।। तो घेणें देणें करी । पाहतां दिसे व्यवहारीं । नांदतांही घरदारीं । त्यामाझारीं तो नाहीं ।। ८ ।। नेणोनि बोधाची मागी । भोगत्याग केला योगीं । तरी कांपताति सर्वांगीं । वासना अंगीं उरलीसे ।। ९ ।। स्वप्नीं विषय देखती । जागे जाल्या प्रायश्चित्त घेती । नाहीं मावळली अहंकृती । यालागीं भीती सर्वदा ।। २१० ।। ऐशिया जी विषयभेडा । नाहीं निजबोधु धडफुडा । तैसा नव्हेसी तूं निधडा । दिसे रोकडा निजबोधू ।। ११ ।।

स्मायावलोकलवदर्शितभावहारिभ्रूमण्डलप्रहितसौरतमंत्रशौण्डैः ।
पत्न्यस्तु षोडशसहस्रमनङ्गबाणैर्यस्येन्द्रियं विमथितुं करणैर्न विभ्व्यः ।। १८ ।।

मी निधडा निजबोधें संपूर्ण । म्हणशी देखों न शके कवण । ये अर्थीचें उपलक्षण । ऐक ते खूण स्वामिया ।। १२ ।। सोळा सहस्र पत्न्या घरीं । आणि गोकुळींच्या परनारी । कुब्जादि मथुरेमाझारीं । कर्णकुमारी भोगिल्या ।।१३।। मुंजी नव्हतां आधीं । भोगिली त्वां गोंवळी पेंधी । धरोनियां सांदीबिंदीं । नदोनदीं असंख्य ।। १४ ।। अविधी भोगितां नारी । बोध न मैळेचि श्रीहरी । अंगें रिघालासी क्षीरसागरीं । अर्जुना करीं धरोनी ।। १५ ।। शेषशायी नारायणा । उत्कंठा तुझिया दर्शना । तेणें उपावो

---

जो आत्मस्वरूप पहातो तो वास्तविक भोग भोगूनहि अभोक्ता आहे. ४ आरशांत पडलेल्या प्रतिबिंबाचा उपभोग जर कोणी घेऊं लागला तर त्याच्याकडे व्यभिचाराचा दोष कसा येणार! ५ जो स्वतःच सर्व जग होऊन राहिला आहे, त्या स्वरूपतः योगी असलेल्याला कोणता उपभोग बाधणार! ६ अशा बोधाच्या बलानें तो विषयांत लोळत जरी असला तरी त्याला विषयांचा विटाळ होत नाहीं, किंवा त्याचें आत्मज्ञान मलिन होत नाहीं. ७ तो देणेंघेणें हा व्यवहार करितो. घरीं-दारीं नांदतो; पण त्या त्या व्यवहारांत तो नाहीं. ८ आत्मज्ञानाचा मार्ग न जाणून योग्यांनीं भोगांचा त्याग केला, तरी पण मनांत विषयवासना शिल्लक असल्यामुळें त्यांच्या सर्वांगाचा थरकांप होतो. ९ ते स्वप्नांत विषय पहातात व जागे झाल्यावर त्यासाठीं प्रायश्चित्त घेतात. मनांतील 'अहं-' भाव मावळला नसल्यामुळें त्यांना सर्वदा असें भय वाटत असतें. २१० पण याप्रमाणें जे विषयांच्या बागुलबुवाला भिणारे लोक असतात, त्यांना आत्मज्ञान तत्त्वतः केव्हांहि होत नाहीं. त्याच्यासारखा तूं नाहींस. तूं निधड्या छातीचा असल्यामुळें तुला आत्मबोध प्रत्यक्ष दिसतो. २११.

—आतां देव भगवानाचें अलिप्तत्व सांगतात—

स्मायावलोकलवदर्शितभावहारिभ्रूमंडलप्रहितसौरतमंत्रशौण्डैः अनंगबाणैः—मंद स्मितानें विलसित होणारें जें अवलोकन त्याच्या कटाक्षानें प्रदर्शित केलेला जो आशय त्यानें मनाचें हरण करणारें जें भ्रूमंडल, त्यानें सोडलेले जे सुरतसंबंधी-मंत्रांनीं प्रगल्भ झालेले मदनाचे बाण त्यांनी आणि, करणैः—मोह पाडणाऱ्या काम-कलादिकांनीं, षोडषसहस्रं पत्न्यः—सोळा सहस्र स्त्रिया, यस्य इंद्रियं विमथितुं न विभ्व्यः—ज्याच्या मनाला क्षुब्ध करण्याला समर्थ झाल्या नाहींत तो तूं अलिप्त आहेस. १८.

हे स्वामिराया! 'मी आत्मबोधानें परिपूर्ण आहें हें कोणीहि पाहूं शकत नाहीं' असें जर म्हणशील तर त्या विषयींची उपलक्षणभूत खूण आम्ही सांगतों, ती ऐक! १२ तुझ्या घरांत सोळासहस्र भार्या, शिवाय गोकुळांतील इतर गोपी वेगळ्याच. मथुरेमध्यें कुब्जादि कर्णकुमारिका या सर्वांशीं तूं रममाण झालास. १३ तुझी मुंज होण्याच्यापूर्वींच तूं एका पांगळ्या गवळणीला कोनाकोपऱ्यांत गांठून नदी, ओढे इत्यादि स्थळीं भोगिलीस. १४ याप्रमाणें अविधीनें स्त्रियांचा भोग घेऊनहि तुझें ज्ञान मलिन झालें नाहीं. उलट अर्जुनाला हातीं धरून स्वतः क्षीरसागरांत गेलास. १५

**केला जाणा । हरूनि ब्राह्मणाचीं बाळें ॥ १६ ॥ जेवीं आपुलें स्वरूप आपण । पहावया कीजे दर्पण । तेवीं पहावया कृष्णार्जुन । स्वयें नारायण अपत्यें आणी ॥ १७ ॥ तूं अवतार नरनारायण । तुझें ध्यावया दरुषण । ब्राह्मणअपत्यें जाण । म्यां आपण आणिलीं ॥ १८ ॥ ऐसें नारायणाचे बोले । सप्रेम अति-सखोल । आम्हीं ऐकिले गा सकळ । तुझा बोध अकळ श्रीकृष्णा ॥ १९ ॥ तीं ब्राह्मणाचीं अपत्यें । जीं बहु काळ जालीं होतीं मृतें । तुवा आणोनि दिधलीं श्रीअनंतें । तीं देखिलीं समस्तें चरितें आम्हीं ॥ २२० ॥ तुझी नारायणासी आस्था । तेथ आमुची कवण कथा । पार न कळे जी अच्युता । गुणातीता श्रीकृष्णा ॥ २१ ॥ मागां अवतार जाले । परी ऐसें चरित्र नाहीं केलें । विधिवेदां लाजविलें । व्यभिचारियां दिधलें निजपद ॥ २२ ॥ जें म्यां भोगिलें स्त्रियांसीं । तें तूं उदासीनत्वें म्हणसी । तेणें बाध न पवे बोधासी । हृषीकेशी तें न घडे ॥ २३ ॥ हावभावविलासेंसीं । अंगें दाविती चपळतेसी । तुज लक्षोनि पुरुषोत्तमासी । कामबाणासी योजिती ॥ २४ ॥ बाऊनि भ्रूमंडलाचे वेढे । व्यंकट कटाक्षें बाण गाढे । सुरतमंत्री रोकडे । केले धडफुडे सतेज ॥ २५ ॥ ज्या बाणांचे घायीं । इंद्र खोंचला सहस्रां ठायीं । शिव लोळविला पाहीं । मोहिनीव्यामोहीं महाबाणें ॥ २६ ॥ ज्या बाणाचा पिसारा । लागतांचि पैं भेदरा । तापसीं घेतला पुरा । सोडोनि घरदारा पळाले ॥ २७ ॥ ऐसे सोळा सहस्र बाण । अखंड तुजचिवरी संधान । करितां न मैळे बोधु जाण । अतिविंदान हें तुझें ॥ २८ ॥ घरींच्या स्त्रिया सहस्र सोळा । गोकुलादि मथुरेच्या अबळा । तुज विषयी करावया गोपाळा । नव्हती सकळा समर्था ॥ २९ ॥ त्यांचेनि तुज न करवे विषयी । परी त्या त्वां केल्या निर्विषयी । ऐसा तूं त्रैलोक्याचे ठायीं । स्वामी पाहीं श्रीकृष्णा ॥ २३० ॥ ऐसी तुझी कीर्ती ऐकतां । अथवा चरणतीर्थ घेतां । याचि दोही तीर्थांची समर्थता । पवित्रता जगासी ॥ ३१ ॥**

---

शेषयायी नारायणाला तुझ्या दर्शनाची फार उत्कंठा लागली होती. तेव्हां त्यानें ब्राह्मणाच्या मुलांचें हरण करून तुझ्या दर्शनाचा उपाय योजिला. १६ ज्याप्रमाणें आपलें स्वतःचें मुख पहावयास आरसा घ्यावा लागतो, त्याप्रमाणें कृष्णार्जुनांस पहाण्यासाठीं नारायण स्वतः ब्राह्मणांचीं मुलें घेऊन आला. १७ 'तूं नारायणाचा अवतार आहेस. तुझें दर्शन घडण्यासाठीं मी हीं ब्राह्मणांचीं बाळें स्वतः घेऊन आलों' १८ हें नारायणाचें प्रेमयुक्त, रहस्यपूर्ण शब्द आम्हीं स्वतः ऐकिले. हे श्रीकृष्णा ! तुझा बोध अगम्य आहे. १९ दीर्घ काळापूर्वीं मृत झालेलीं ब्राह्मणबालकें तूं अनंतानें परत आणून दिलींस. हें सर्व तुझें चरित्र आम्हीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. २२० हे गुणातीत श्रीकृष्णा ! अच्युता ! नारायणालाहि जर तुझी इतकी आस्था आहे, तर तेथें आमची काय कथा ! तुझा अंत कोणाला लागत नाहीं. २१ यापूर्वीं पुष्कळ अवतार झाले, पण असें चरित्र कोणीं केलें नाहीं. विधि व वेद यांना तूं लाजविलेंस. व्यभिचाऱ्यांना निजपद दिलेंस. २२ 'मीं जे भोग भोगिले ते उदासीनत्वानें भोगिले, त्यामुळें माझ्या बोधाला कांहीं बाध येत नाहीं,' असें तूं म्हणतोस. पण हे हृषीकेशा ! तें संभवत नाहीं. २३ तुज पुरुषोत्तमाला पाहून स्त्रिया हावभाव इत्यादि विलास करून चापल्यानें आपलीं अंगें दाखवितात व तुझ्यावर कामशर सोडितात. २४ भुंवया वर चढवून वक्र कटाक्षांनीं सुरतमंत्रामध्यें प्रवीण असलेले नेत्रकटाक्षरूपी बाण तुझ्या अंगांत खोल रोवितात. २५ ज्या कामशरांनीं इंद्राला सहस्र भगें पडलीं, ज्या महाबाणानें मोहिनीच्या मोहामुळें शंकराला लोळविलें, २६ ज्या बाणांचा पिसारा लागतांच विश्वामित्रासारख्याला धडकी भरली, ते तपस्वी घरदार सोडून पळाले. २७ अशा सोळाहजार बाणांची तुझ्यावर सतत वृष्टि होत असूनहि तुझें आत्मज्ञान मळलें नाहीं. हें तुझें केवढें विलक्षण कौशल्य ! २८ स्वतःच्या सोळाहजार स्त्रिया, गोकुळांतील गोपी, मथुरेंतील कुमारी या सर्वजणीं तुला आपला प्रेमाचा विषय करण्यास समर्थ नव्हत्या. २९ पण हे गोपाळा ! तूं स्वतः त्या सर्वजणींचा प्रेमविषय झालास. व त्यांना निर्विषय केलेंस आणि त्यांच्या अंतःकरणांतील विषयवासनाच नाहींशी करून टाकिलीस. असा तूं त्रैलोक्याचा स्वामी आहेस. हे श्रीकृष्णा ! २३० याप्रमाणें तुझी कीर्ति ऐकली असतां किंवा तुझ्या चरणाचें तीर्थ घेतलें असतां जगाला या दोन तीर्थांच्या सामर्थ्यानें पवित्रत्व येतें. २३१.

विभ्व्यस्तवामृतकथोद्वहास्त्रिलोक्याः पादावनेजसरितः शमलानि हन्तुम् ।
आनुश्रवं श्रुतिभिरङ्घ्रिजमङ्गसङ्गैस्तीर्थद्वयं शुचिषदस्त उपस्पृशन्ति ॥ १९ ॥

**तुझिये कीर्तीचें श्रवण । आंतरमलाचें क्षालन । करूनियां वृत्ति जाण । परम पावन कीर्तनें ॥ ३२ ॥ तुझिया चरणींची गंगा । । सकळ पातकें ने भंगा । ते पायवणीं श्रीरंगा । पवित्र जगातें करी ॥ ३३ ॥ या दोहीं तीर्थांचें सेवन । अखंड करिती साधुजन । तेणें होऊनि परम पावन । समाधान निजवृत्ती ॥ ३४ ॥ अवतारांचे अंतीं । ये दोनी तीर्थीं अतिविख्याती । प्रकट केली तुवां क्षिती । तारावया श्रीपति निजदासां ॥ ३५ ॥ एक श्रवणें एक स्नानें । दोनी तीर्थें परम पावनें । प्रकट केलीं जगज्जीवनें । मलिन जन तरावया ॥ ३६ ॥**

श्रीबा०— इत्यभिष्टूय विबुधैः सेशः शतधृतिर्हरिम् अभ्यभाषत गोविंदं प्रणम्ययाम्बरमाश्रितः ॥ २० ॥

**शुक म्हणे परीक्षिती । यापरी देवीं समस्तीं । स्तविला स्वानंदें श्रीपती । परमभक्तिभावार्थें ॥ ३७ ॥ ऐसा करूनि स्तुतिवादु । संतोषविला गोविंदु । देवांसी होत असे आल्हादु । परम विनोदु सर्वांसी ॥ ३८ ॥ स्तुति करावया अग्रणी । ब्रह्मा शिव पुढें येऊनी । तिंहीं जयजयकार करूनी । लोटांगणें घातलीं ॥ ३९ ॥ देव राहूनियां गगनीं । हात जोडोनि विमानीं । विनंती करावयालागोनी । ब्रह्मा पुढें राहोनि बोलतु ॥ २४० ॥**

---

—म्हणून—

तव अमृतकथोद्वहाः—तुझ्या अमृतरूप कथा याच उदकाला वहाणाऱ्या कीर्तिरूप नद्या आणि, पादावनेजसरितः—पादोदकापासून झालेल्या गंगादि नद्या, त्रिलोक्याः शमलानि हन्तुं विभ्व्यः—त्रैलोक्याचें पाप घालविण्यास समर्थ आहेत. ( कोणत्या प्रकारानें ? उत्तर—गुरूच्या उच्चारणानंतर श्रवण केला जाणारा, म्हणून अनुश्रव असा जो वेद त्या ) आनुश्रवं श्रुतिभिः—वेदांतील कीर्तिरूप तीर्थाला श्रवणेंद्रियांनीं व, अङ्घ्रिजं अंगसंभवैः—चरणापासून उत्पन्न झालेल्या तीर्थाला अंगसंगांनीं म्ह० स्नान, आचमन इत्यादिकांनीं, याप्रमाणें, शुचिषदः ते तीर्थद्वयं उपस्पृशन्ति—स्वाश्रमधर्मामध्यें तत्पर असलेले संत तुझ्या तीर्थद्वयाचें सेवन करितात. १९.

तुझ्या कीर्तीचें श्रवण केलें असतां अंतःकरणांतील पापाचें क्षालन होऊन वृत्ति कीर्तनानें परम पावन हातात. ३२ तुझ्या चरणापासून निघालेली गंगा सर्व पातकांचा नाश करिते आणि हे श्रीरंगा ! ती गंगा जगाला पावन करिते. ३३ साधुजन या दोन तीर्थांचें सतत सेवन करितात. त्यामुळें त्यांची वृत्ति परम पावन होऊन समाधान पावते. ३४ अवतारांच्या शेवटीं हे श्रीपति ! आपल्या भक्तांना संसारांतून तारण्यासाठीं या दोन तीर्थांमध्यें तूं आपली ख्याति प्रकट केलीस. ३५ पापीजन तारण्यासाठीं जगज्जीवनानें एक श्रवण व दुसरें स्नान, अशीं दोन परम पवित्र तीर्थें प्रकट केलीं. २३६.

श्रीबादरायणिः उवाच—शुकाचार्य म्हणाले, विबुधैः इति अभिष्टूय सेशः शतधृतिः अम्बरं आश्रितः सन्—याप्रमाणें देवांसह भगवानाची स्तुति करून महेश्वरासह ब्रह्मदेव आकाशाचा आश्रय करून, गोविंदं हरिं प्रणम्य अभ्यभाषत—भक्तांच्या पापाचें हरण करणाऱ्या गोविंदाला प्रणाम करून असें बोलला. २०.

शुकाचार्य म्हणाले ‘ हे परीक्षिति राजा ! याप्रमाणें सर्व देवांनीं आनंदानें व परम भक्तिभावानें श्रीपतीची स्तुति केली ३७ आणि स्तुतीनें त्यांनीं गोविंदाला संतोषविलें, त्यामुळें देवांना आनंद वाटला व सर्वांच्या मनाचें अत्यंत रंजन झालें. ३८ नंतर ब्रह्मदेव व शंकर स्तुति करणाऱ्या देवांमध्यें अग्रेसर असलेला ब्रह्मा व शिव ह्या दोघांनीं हात जोडून जयजयकार करून लोटांगण घातलें. ३९ देव आकाशांत राहून विमानांतून हात जोडून विनंति करूं लागले. ब्रह्मदेव पुढें उभा राहून असें बोलूं लागला. २४०.

ब्र०–भूमेर्भारावताराय पुरा विज्ञापितः प्रभो । त्वमस्माभिरशेषात्मंस्तत्तथैवोपपादितम् ॥ २१ ॥

**उतरावया धराभारा । पूर्वीं प्रार्थिलासी यदुवीरा । अभय द्यावया सुरवरां । आम्ही श्रीधरा विनविलें ॥ ४१ ॥ आम्ही विनविलें जैसें । तुवां कार्य केलें म्हणों तैसें । त्याहूनियां विशेषें । केली निजविन्यासें धर्मवृद्धी ॥ ४२ ॥ तूं सर्वेश्वरु सर्वात्मा । जें कार्य न कळेचि आम्हां । तेंही तुवां पुरुषोत्तमा । घनश्यामा संपादिलें ॥ ४३ ॥**

धर्मश्च स्थापितः सत्सु सत्यसन्धेषु वै त्वया । कीर्तिश्च दिक्षु विक्षिप्ता सर्वलोकमलापहा ॥ २२ ॥

**सत्यवादी साधु जे कांहीं । ज्यांचा संकल्प तुझ्या पायीं । धर्म स्थापिला त्यांच्या ठायीं । तुवां पाहीं यथास्थित ॥ ४४ ॥ आणिक दश दिशांप्रती । विस्तारिली उदार कीर्ती । तेणें पावन त्रिजगती । होय निश्चितीं श्रवणद्वारें ॥ ४५ ॥**

अवतीर्य यदोर्वंशे बिभ्रद्रूपनुत्तमम् । कर्माण्युद्दामवृत्तानि हिताय जगतोऽकृथाः ॥ २३ ॥

**पूर्णपुरुषा हृषीकेशी । तूं अवतरलासी यदुवंशीं । सीमा तुझिया रूपासी । बरवेपणासीं न करवे ॥ ४६ ॥ तूं सर्वांमाजीं सर्वोत्तम । देखतां वृत्तींसी उपरम । लीलाविग्रही पुरुषोत्तम । मनोरम सकळिकां ॥ ४७ ॥ कर्में केलीं परमाद्भुतें । गोवर्धन धरिला वाम हस्तें । मुखें प्राशूनि वणव्यातें । गोपाळांतें वांचविलें ॥ ४८ ॥ मृता आणिलें गुरुपुत्रांसी । गत गर्भ भेटविले देवकीसी । गोपालवत्सें तूं झालासी । विधात्यासी भुलविलें ॥ ४९ ॥ जगाचिया परम हिता- । लागीं नाना चरित्रकथा । करिता झालासी श्रीअनंता । कृष्णनाथा निजजनका ॥ २५० ॥**

---

ब्रह्मा उवाच–ब्रह्मदेव म्हणाला, हे, अशेषात्मन् प्रभो– हे सर्वात्म्या प्रभो, पुरा अस्माभिः–पूर्वीं आम्हीं, भुमेः भारावताराय त्वं विज्ञापितः–भूमीचा भार उतरण्यासाठीं तुला विज्ञापना केली, तत् तथा एव उपपादितं–त्याप्रमाणें तूं तसेंच कार्य संपादन केलेंस. २१.

पृथ्वीचा भार उतरण्यासाठीं हे यदुवीरा ! पूर्वीं तुझी प्रार्थना केली होती. हे श्रीधरा ! आम्हीं तुला देवांना अभय देण्यासाठीं विनविलें होतें. ४१ आमच्या विनंतीप्रमाणें–आम्हीं जसें सांगितलें तसें कार्य तर तूं केलेंसच; पण त्याहूनहि विशेष अशी आपल्या सामर्थ्यानें तूं धर्माची वृद्धि केलीस. ४२ तूं सर्वेश्वर, सर्वात्मा आहेस. जें कार्य आम्हांला कळत नाहीं तेंहि हे पुरुषोत्तमा, घनश्यामा ! तूं संपादन केलेंस. २४३.

सत्यसंधेषु सत्सु वै– ज्यांची प्रतिज्ञा सत्य आहे अशा साधूंमध्येंच, त्वया धर्मः च स्थापितः–तूं धर्माची स्थापना केलीस, सर्वलोकमलापहा कीर्तिः च दिक्षु विक्षिप्ता–आणि सर्व लोकांच्या पापांचा नाश करणारी कीर्ति दशदिशांमध्यें पसरलीस. २२.

जे कांहीं सत्यवादी साधु आहेत, ज्यांची तुझ्या पायांवरच निष्ठा आहे, त्यांच्यामध्यें तूं धर्माची यथास्थित स्थापना केलीस. ४४ आणि दाही दिशांत आपली उदार कीर्ति पसरविलीस. त्यामुळें खरोखर त्रैलोक्य श्रवणद्वारां परम पावन झालें आहे. २४५.

अनुत्तमं रूपं बिभ्रत्–सर्वोत्तमरूप धारण करणाऱ्या तूं, यदोः वंशे अवतीर्य–यदूच्या वंशांत उत्पन्न होऊन, जगतः हिताय–जगाच्या हितासाठीं, उद्दामवृत्तानि कर्माणि अकृथाः–ज्यामध्यें असामान्य पराक्रम आहेत अशीं कर्में केलींस. २३.

हे पूर्णपुरुषा, हृषीकेशा ! तूं यदुकुळांत अवतरला आहेस. तुझ्या रूपाच्या उत्कृष्टपणाला सीमा नाहीं. ४६ तूं सर्वांमध्यें सर्वोत्तम आहेस. तुला पहातांच इंद्रियांच्या वृत्ति शांत होतात, मनुष्यदेहधारण करणाऱ्या हे पुरुषोत्तमा ! तूं सर्वांना मनोरम वाटतोस. ४७ तूं अत्यंत अद्भुत कृत्यें केलींस. उजव्या हातावर गोवर्धनपर्वत उचलून धरिलास. वणवा आपल्या मुखानें प्राशन करून गोपाळांना वांचविलेंस. ४८ गुरूच्या मृतपुत्रांना उठविलेंस, देवकीचें नाश पावलेले गर्भ तिला पुनः भेटविलेस. तूं स्वतः गोपालवत्सें झालास व विधात्याला भुलविलेंस. ४९ जगाच्या कल्याणासाठीं नानाप्रकारच्या चरित्रकथा हे अनंता, कृष्णनाथा, निजजनका ! तूं केल्यास. २५०.

यानि ते चरितानीश मनुष्याः साधवः कलौ । शृण्वन्तः कीर्तयन्तश्च तरिष्यन्त्यञ्जसा तमः ॥ २४ ॥

कथाकौतुकें विचित्रें । नाना परींचीं चरित्रें । परम पावन पवित्रें । येणें अवतारें त्वां केलीं ॥ ५१ ॥ कलियुगीं साधुजन । या चरित्रांचें श्रवण कीर्तन । करितां तरले जाण । मायामोह त्रिगुणेंसीं ॥ ५२ ॥

यदुवंशेऽवतीर्णस्य भवतः पुरुषोत्तम । शरच्छतं व्यतीयाय पञ्चविंशाधिकं प्रभो ॥ २५ ॥

अवतरल्या यदुवंशीं । पुरुषोत्तमा हृषीकेशी । संख्या या अवतारांसी । जाली ते तुजपाशीं सांगेन ॥ ५३ ॥ मृत्युलोकीं मनुष्यमर्यादा । शत वर्षें जी गोविंदा । ते अतिक्रमोनि आवदा । अधिक मुकुंदा पंचवीस जाहली ॥ ५४ ॥

नाधुना तेऽखिलाधार देवकार्यावशेषितम् । कुलं च विप्रशापेन नष्टप्रायमभूदिदम् ॥ २६ ॥

यावरतें येथ कांहीं । देवकार्य उरलें नाहीं । यादवकुळ म्हणसी तेंही । नष्टप्राय पाहीं उरलेंसे ॥ ५५ ॥ उठवणी आलें हतिरूं । कां पांख उपडिल्या पांखरूं । तैसा यादवांचा दळभारू । भूमियें भारू उरला असे ॥ ५६ ॥ निवणाचा फुटका डेरा । कां क्षयो लागल्या राजकुमरा । वणवा आहाळल्या अजगरा । यादववीरां ते दशा ॥ ५७ ॥ दारुण ब्राह्मणाचा शाप । नासला वीर्यशौर्यप्रताप । गळाला वाढिवेचा दर्प । केवळ प्रेतरूप दिसताती ॥ ५८ ॥

ततः स्वधाम परमं विशस्व यदि मन्यसे । सलोकान् लोकपालान्नः पाहि वैकुण्ठ किङ्करान् ॥ २७ ॥

---

ईश–हे ईश्वरा, यानि ते चरितानि–जीं तुझीं चरित्रें त्यांचें, कलौ साधवः मनुष्याः–कलियुगांतील साधु पुरुष, शृण्वन्तः कीर्तयन्तः च तमः अंजसा तरिष्यन्ति–श्रवण व कीर्तन करीत होत्साते अज्ञानाला अनायासानें तरतील. २४.

अशीं विचित्र, अनेक प्रकारचीं चरित्रें परम पवित्र कथाकौतुकें तूं या अवतारांत केलींस. ५१ कलियुगांत साधुजन या चरित्रांचें श्रवण-कीर्तन करून त्रिगुणमायामोहापासून तरले. २५२.

पुरुषोत्तम–हे प्रभो पुरुषोत्तमा ! यदुवंशे अवतीर्णस्य भवतः–यदुवंशांत अवतीर्ण झालेल्या तुझीं, पंचविंशाधिकं शरच्छतं व्यतीयाय–एकशें पंचवीस वर्षें होऊन गेलीं. २५.

हे पुरुषोत्तमा, इंद्रियांच्या स्वामिन्, यदुवंशांत हा अवतार घेऊन किती वर्षें राहिलास, ती संख्या आतां सांगतों, ऐक. ५३ मृत्युलोकांत मनुष्यांची आयुर्मर्यादा शंभर वर्षें आहे. तिचें अतिक्रमण करून हे गोविंदा, तुझ्या वयाला पंचवीस वर्षें अधिक झालीं आहेत. २५४.

हे अखिलाधार देव–हे सर्वाधार देवा ! अधुना ते कार्यावशेषितं न–आतां तुझें कांहीं कार्य अवशेष राहिलें नाही. इदं कुलं च विप्रशापेन नष्टप्रायम्–हें यादवकुलहि विप्रशापानें नष्टप्राय झालें आहे. २६.

यानंतर आतां येथें कांहींच देवकार्य करावयाचें अवशिष्ट राहिलें नाहीं. यादवकुळ म्हणशील तर तेंहि केवळ नष्टप्राय होऊन राहिलें आहे. ५५ हत्ती उठवणीला आल्यावर, किंवा पाखरांचें पंख उपटल्यावर तीं जशीं दुर्बल होतात, त्याप्रमाणें यादवांचें सैन्य भूमीला भार होऊन उरलें आहे. ५६ गवताच्या बैठकीवरील फुटका डेरा, क्षय लागलेला राजपुत्र किंवा वणव्यानें होरपळलेला अजगर हीं जशीं दुर्बल व मरणोन्मुख होतात, तशीच अवस्था यादववीरांची झाली आहे. ५७ ब्राह्मणांच्या दारुण शापानें त्यांचें सर्व वीर्य, शौर्य, प्रताप नाहींसा होऊन ऐश्वर्याचा सगळा गर्व गळून गेला आहे व ते केवळ प्रेतासारखे दिसत आहेत. २५८.

वैकुण्ठ–हे वैकुंठाधिपते ! ततः यदि मन्यसे परमं स्वधाम विशस्व–म्हणून जर तुला वाटत असेल तर आपल्या परम धामामध्यें प्रवेश कर. नः सलोकान् लोकपालान् किंकरान् पाहि–आम्हां लोकांसह लोकपालांचें, आपल्या दासांचें रक्षण कर. २७.

यालागीं जी यादवराया । आम्ही वांछूं तुझ्या पायां । वेगु कीजे स्वधामा यावया । सुरवर्या श्रीकृष्णा ॥ ५९ ॥ ऐकें देवकीनंदना । जरी मानेल तुझिया मना । तरी निघिजो जी याचिया क्षणा । सुरसेना तिष्ठत ॥ २६० ॥ सलोक लोकपाळ जे जे । त्यांवरी तुवा कृपा कीजे । आम्ही किंकर गा तुझे । वचन मानिजे दासांचें ॥ ६१ ॥ ऐकें जी वैकुंठनाथा । तुझी थोर आम्हां अवस्था । आदिकरूनि उमाकांता । आणि समस्तां देवांसी ॥ ६२ ॥

श्रीभ०— अवधारितमेतन्मे यदात्थ विबुधेश्वर । कृतं वः कार्यमखिलं भूमेर्भारोऽवतारितः ॥ २८ ॥

जो योगज्ञाना मुकुटमणी । मेघगंभीरया वाणी । ब्रह्मयाप्रती चक्रपाणी । हास्यवदनीं बोलिला ॥ ६३ ॥ नादब्रह्म मुसावलें । कीं निजानंदाचें फळ पिकलें । तैसें श्रीमुखें बोलों आदरिलें । भाग्य उदेलें श्रवणांचें ॥ ६४ ॥ गौरवें म्हणे ब्रह्मदेवा । संतोषलों तुझिया भावा । पुत्रस्नेहें करूनि तेव्हां । उद्यत खेवा हरि जाला ॥ ६५ ॥ आवडीं म्हणे विबुधेंद्रा । सत्य तुझी वाङ्मुद्रा । तुझेनि वचनें ब्राह्मणेन्द्रा । धराभारा उतरिलें ॥ ६६ ॥ सकळ कार्य निःशेख । म्यां संपादिलें देख । तरी उरलें असे एक । थोर अटक मजलागीं ॥ ६७ ॥

तदिदं यादवकुलं वीर्यशौर्यश्रियोद्धतम् । लोकं जिघृक्षद्रुद्धं मे वेलयेव महार्णवः ॥ २९ ॥
यद्यसंहृत्य दृप्तानां यदूनां विपुलं कुलम् । गन्तास्म्यनेन लोकोऽयमुद्वेलेन विनंक्ष्यति ॥ ३० ॥

हें यादवकुळ येथ । वीर्यशौर्यश्रियोद्धत । धर्म नाशावया उद्यत । अतिदृप्त निजबळें ॥ ६८ ॥ हे छेदूं पाहती धर्ममूळें । म्यां आवरिले असती योगबळें । जेवीं समुद्रातें मर्यादवेळें । असे राखिलें

---

यासाठीं हे यादवश्रेष्ठा, आम्ही तुझ्या चरणांची इच्छा करीत आहों, तरी तूं वैकुंठास येण्याची त्वरा कर. ५९ हे देवकीनंदना ऐक! जर तुझ्या मनाला रुचत असेल तर या क्षणीं निघ. सर्व देवांची सेना तुझी वाट पहात आहे. २६० लोकांसह या सर्व लोकपाळांवर तूं कृपा कर. आम्ही तुझे सेवक आहोंत, तेव्हां या दासाचें वचन मान्य कर. ६१ याप्रमाणें हे वैकुंठनाथा, तुझ्या सेवेची आम्हां उमाकांतादि सर्व देवांना अत्यंत उत्कंठा लागली आहे. २६२.

श्रीभगवान् उवाच–श्रीभगवान म्हणाले, विबुधेश्वर–हे ब्रह्मदेव ! यत् आत्थ एतत् मे अवधारितं–तूं जें सांगितलेंस तें मीं ऐकिलें. वः अखिलं कार्यं कृतं–मीं तुमचें सर्व कार्य केलें आहे. भूमेः भारः अवतारितः–भूमीचा भार उतरला आहे. २८.

योगज्ञानांतील चुडामणि असा चक्रपाणि भगवान् हास्यवदन करून गंभीर वाणीनें ब्रह्मदेवाला बोलला. ६३ जसें नादब्रह्म मुसमुसावें किंवा आत्मानंदानें फळ पिकावें, तसेंच श्रीकृष्णानें जेव्हां बोलण्यास आरंभ केला तेव्हां कानांचें भाग्यच उदय पावलें. ६४ तो गौरवानें म्हणाला, हे ब्रह्मदेवा ! तुझा भाव पाहून मला संतोष झाला. पुत्रस्नेहानें हरि त्याला आलिंगन देण्यास उत्सुक झाला. ६५ तो प्रेमानें म्हणाला, हे देवश्रेष्ठा ! तुझी वाणी सत्य आहे. तुझ्या वचनानें पृथ्वीचा भार उतरला. ६६ मीं सर्व कार्य जरी निःशेष संपादन केलें आहे, तरी एक फार मोठा प्रतिबंध उरला आहे. २६७.

महार्णवः वेलया इव–महासमुद्र त्याच्या तीराकडून जसा मर्यादेंत ठेविला जातो, त्याप्रमाणें, वीर्यशौर्यश्रिया उद्धतं–वीर्य, शौर्य व श्री यांनीं उद्धट झालेलें, लोकं जिघृक्षत्–सर्व लोकांचा नाश करूं इच्छिणारें, यत् इदं यादवकुलं–असें जें हें यादवकुल, तत् मे रुद्धं–त्याला मीं आवरून धरिलें आहे. यदि दृप्तानां यदूनां विपुलं कुलं असंहृत्य– जर या मदोन्मत्त यादवांच्या विस्तृत कुलाचा संहार न करितां, गंतास्मि–मी जाईन तर, उद्वेलेन अनेन अयं लोकः विनंक्ष्यति–ज्यानें मर्यादेचें उल्लंघन केलें आहे, अशा या कुलाच्या हातून या सर्व लोकांचा नाश होईल. २९–३०.

येथें हे यादवकुळ वीर्य व शौर्य यांनीं प्राप्त झालेल्या ऐश्वर्यानें उन्मत्त झालें आहे, आपल्या पराक्रमानें अति गर्विष्ठ होऊन धर्माचा नाश करावयास उद्युक्त झालें आहे. ६८ हें धर्माचें मूळ छेदण्यास पहात आहे. समुद्राला जशी

नेमूनी ॥ ६९ ॥ सांडोनि ऐशियांसी । मज गेलिया निजधामासी । हे प्रवर्ततील अधर्मासी । कोण यांसी वारील ॥ २७० ॥ जैसा निर्मर्याद सागरू । खवळल्या सर्वसंहारकरूं । त्यासी कोण शकेल आवरूं । कैसा विचारू होईल ॥ ७१ ॥ हे अधर्मपर होतील गाढे । तुम्हांसी पडेल सांकडें । सांगों धांवाल मजपुढें । यांचें रोकडें गाऱ्हाणें ॥ ७२ ॥ हे नाटोपती देवां । नाकळती दैत्या दानवां । हे अधर्म करिती जेव्हां । तुम्हीच मज तेव्हां सांगों याल ॥ ७३ ॥

इदानीं नाश आरब्धः कुलस्य द्विजशापजः । यास्यामि भवनं ब्रह्मन्नेतदन्ते तवानघ ॥ ३१ ॥

यालागीं कुळनाशासी त्वरित । आजिपासोनि सुमुहूर्त । केला असे गा निश्चित । यथोचित यादवां ॥ ७४ ॥ ऐकें सखया प्रजापती । या कुळनाशाचिया अंतीं । तुझिया भुवनावरूनि निश्चितीं । निजधामाप्रती येईन ॥ ७५ ॥ ऐसें बोलिला प्रभू । ऐकोनि शंभु स्वयंभु । आनंदला देवकदंबु । समारंभू मांडिला ॥ ७६ ॥ जयजयकारू केला सकळीं । परमानंदें पिटिली टाळी । चरण वंदूनि वनमाळी । पुष्पांजळी अर्पिल्या ॥ ७७ ॥

श्रीशु०– इत्युक्तो लोकनाथेन स्वयम्भूः प्रणिपत्य तम् । सह देवगणैर्देवः स्वधाम समपद्यत ॥ ३२ ॥

शुक म्हणे परीक्षिती । ऐकोनि कृष्णवदंती । सुरवर आनंदले चित्तीं । आल्हादें करिती अभिवंदनें ॥ ७८ ॥ धाता सविता शूळपाणी । मिळोनियां देवगणीं । कृष्णासी घातल्या लोटांगणी । चरण वंदूनि निघाले ॥ ७९ ॥ एवं वंदूनि श्रीपती । आपुलालिया स्थानाप्रती । निघाल्या जी देवपंक्ती । पवनगती विमानें ॥ २८० ॥

---

मर्यादा तसें त्यांना मी आपल्या योगसामर्थ्यानें आंवरिलें आहे. ६९ अशा उन्मत्तस्थितींत त्यांना सोडून मी जर निजधामाला गेलों तर हे अधर्मामध्यें प्रवृत्त होतील. मग त्यांचें निवारण कोण करील ! २७० जसा समुद्र अमर्याद खवळला म्हणजे सर्वांचा संहार करूं लागतो, त्याला कोणी आवरूं शकत नाहीं, त्याप्रमाणें माझ्यामागें यांचें निवारण कोण करील ! ७१ हे मोठे अधर्माचरणी होतील, तुम्ही मोठें संकटांत पडाल व पुनः त्यांचें गाऱ्हाणें सांगावयास माझ्याकडे धांवाल. ७२ हे देवांना आवरणार नाहींत, दैत्य-दानवांना आटोपणार नाहींत व हे जेव्हां अधर्माचरण करूं लागतील तेव्हां तुम्हीच मला सांगावयास याल. २७३.

इदानीं कुलस्य द्विजशापजः नाशः आरब्धः– आतां मी या कुलाचा द्विजशापामुळें होणारा नाश आरंभिला आहे. अनघ ब्रह्मन्–हे निष्पाप ब्रह्मदेवा ! एतदंते–या कुलाचा नाश झाल्यावर, तव भवनं यास्यामि–वैकुंठाला जात असतांना मी तुझ्या लोकीं येईन. ३१.

यासाठीं यादवकुळाच्या सत्वर नाशाचा योग्य मुहूर्त मीं आजपासूनच केला आहे. ७४ हे सख्या प्रजापते, ऐक. या कुळाचा नाश झाल्यावर तुझ्याच लोकावरून मी निश्चयानें वैकुंठाला जाईन. ७५ प्रभूचें हें वचन ऐकून शंकर, ब्रह्मदेव व देवांचा समुदाय संतुष्ट झाला व त्यांनीं समारंभ आरंभिला. ७६ सर्वांनीं मिळून जयजयकार केला. परम आनंदानें टाळ्या वाजविल्या आणि वनमाळीच्या चरणांना वंदन करून पुष्पांजलि अर्पण केली. २७७.

श्रीशुकः उवाच–शुकाचार्य म्हणाले, लोकनाथेन इति उक्तः स्वयंभूः देवः–भगवान् लोकनाथाकडून असा बोलला गेलेला स्वयंभू ब्रह्मदेव, तं प्रणिपत्य देवगणैः सह स्वधाम समपद्यत–त्याला प्रणाम करून देवगणांसह आपल्या ब्रह्मलोकीं गेला. ३२.

शुकाचार्य म्हणाले–हे परीक्षितिराजा, श्रीकृष्णाचे हे शब्द ऐकून देवांना मनांत अतिशय आनंद वाटला व हर्षानें त्यानीं त्याला अभिवंदन केलें. ७८ प्रजापति, सूर्य, महादेव व सर्व देवगण या सर्वांनीं मिळून श्रीकृष्णाला लोटांगण घातलें व त्याच्या चरणाला वंदन करून ७९ तो सर्वदेवांचा समुदाय आपापल्या स्थानीं जाण्यासाठीं वायुवेगानें जाणाऱ्या विमानांतून निघाला. २८०.

अथ तस्यां महोत्पातान् द्वारवत्यां समुत्थितान् । विलोक्य भगवानाह यदुवृद्धान् समागतान् ॥ ३३ ॥

**कुळनाशु करणें रोकडें । ऐसें कृष्णें नेमिलें धडफुडें । तंव द्वारकेसी येरीकडे । महोत्पात गाढे उठिले ॥ ८१ ॥ गगनीं निघाले त्रिकेतु । धूमकेतू दंडकेतू । शिखेसहित शिखाकेतू । गगनाआंतू उगवले ॥ ८२ ॥ माध्याह्नीं जाहला आघात । दिवसा उल्कापात होत । भूतें नागवीं नाचत । गगनाआंत रुदती ॥ ८३ ॥ वृक जंबुक नगराआंत । दिवसा चौबारा कुंकात । नगरीं भालुवा भुंकत । जन कांपत देखोनी ॥ ८४ ॥ नगरा आंतुबाहेरी । श्वानांचीं रडणीं भारी । मार्जारकलहो नगरीं । घरोघरीं होतसे ॥ ८५ ॥ गाई आरडती मध्यरात्रीं ॥ लेंकुरें खेळती झुंझारीं । माणसांतें झडपिती घारी । घुंघाती घरोघरीं दिवाभीतें ॥ ८६ ॥ वागीश्वरी क्षोभली गाढी । बोलीं म्हणती आली यमधाडी । कां रे धांवतां तांतडीं । आगीं उडी घालूं पाहतां ॥ ८७ ॥ भूस्फोट भूमिकंप । अग्निकिरणीं तपे आतप । वारेनि सोडिला अहा कंप । लागे झडप खरस्पर्शें ॥ ८८ ॥ धुरोळा उधळत नगरीं । रज भरे डोळ्यांमाझारीं । डोळे नुघडती नरनारी । दिशा चारी धुमधुमिती ॥ ८९ ॥ ऐसे नाना परींचे उत्पात । नगरीं रुधिरवृष्टि होत । देखोनि यादव समस्त । भयचकित पैं जाहले ॥ २९० ॥ यादव मिळोनि थोर थोर । वृद्ध वृद्ध करिती विचार । ये चिन्हें अरिष्टकर । विघ्न थोर दिसतसे ॥ ९१ ॥ अवघे आले कृष्णापाशीं । वृत्तांत सांगती तयासी । उद्विग्न देखोनि यादवांसी । हृषीकेशी बोलिला ॥ ९२ ॥**

श्रीभ०—एते वै सुमहोत्पाता ह्युत्तिष्ठन्तीह सर्वतः । शापश्च नः कुलस्यासीद्ब्राह्मणेभ्यो दुरत्ययः ॥

---

अथ—त्यानंतर, तस्यां द्वारवत्यां समुत्थितान् महोत्पातान् विलोक्य—त्या द्वारकेंत उत्पन्न झालेल्या भयंकर दुश्चिन्हांना पाहून, भगवान् समागतान् यदुवृद्धान् आह—भगवान् एकत्र जमलेल्या यदुवृद्धांना म्हणाले. ३३.

श्रीकृष्णानें उघड उघड कुळनाश करावयाचें खरोखर योजिलें. तेव्हां इकडे द्वारकेमध्यें भयंकर दुश्चिन्हें होऊं लागलीं. ८१ आकाशांत शेंडेनक्षत्र, धूमकेतु, दंडकेतु, शिखेसह शिखाकेतु दिसूं लागले. ८२ माध्याह्नीं भूकंप झाला. दिवसां उल्कापात होऊं लागले. पिशाचें नागवीं नाचूं लागलीं व तीं आकाशांत रडूं लागलीं. ८३ नगरामध्यें लांडगे, कोल्हे, आस्वली दिवसा ओरडूं लागल्या. तें ऐकून लोकांचा थरकांप झाला. ८४ नगराच्या आंतबाहेर कुत्रीं भुंकूं लागलीं व घरोघर मांजरें भांडूं लागलीं. ८५ मध्यरात्रीं गायी हंबरूं लागल्या. मुलें भांडणें खेळूं लागलीं. घारी माणसांवर झडप घालूं लागल्या, घुबडें घरोंघर घुमूं लागलीं. ८६ लोक म्हणूं लागले कीं, वागेश्वरी आपल्यावर अतिशय क्षुब्ध झाली आहे. यमधाड आली. अरे बाबा ! इतक्या तांतडीनें धांवतां कशाला ! आगींत उडी कशाला टाकतां ! ८७ पृथ्वी दुभंगली. भूकंप झाला. सूर्य प्रखर किरणांनीं तापूं लागला. सोसाट्याचा वारा सुटला व त्याचा वेग असह्य झाला. ८८ नगरांत धूळ उडूं लागली. तिचे कण डोळ्यांत जाऊं लागले. त्यामुळें स्त्री-पुरुषांना डोळे उघडवेनासे झाले. चारी दिशा धुळीनें भरून गेल्या. ८९ याप्रमाणें अनेक तऱ्हेचीं दुश्चिन्हें होऊं लागलीं. रक्ताचा पाऊस पडला. तो पाहून सर्व यादव भयभीत झाले. २९० सर्व वयोवृद्ध व थोर यादव जमून विचार करूं लागले. हीं अनिष्टसूचक चिन्हें आहेत, फार मोठें विघ्न येणारसें दिसतें. ९१ ते सर्व मिळून कृष्णाजवळ आले व घडलेला प्रकार त्याला सांगूं लागले. तेव्हां यादवांना उद्विग्न पाहून भगवान् म्हणाले. २९२.

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान म्हणाले, इह सर्वतः एते वै समुहोत्पाताः उत्तिष्ठन्ति हि—या द्वारकानगरींत सर्वत्र हे भयंकर उत्पात होत आहेत, हें तुम्हांला ठाऊक आहेच. ब्राह्मणेभ्यः नः कुलस्य दुरत्ययः शापः आसीत्—आणि ब्राह्मणांपासून आमच्या या कुलाला ज्याचे उलंघन करितां येणें शक्य नाहीं असा शाप झाला आहे. ३४.

**कृष्ण यादवांसी सांगत । दिविभूअंतरिक्षगत । उठिले जे महोत्पात । सर्वगत सर्वदा ॥ ९३ ॥ देखोनियां त्या चिन्हासी । मजही आठवलें मानसीं । ब्राह्मणशाप यदुकुळासी । चिन्हें त्यासी सूचकें ॥ ९४ ॥ ब्राह्मणाचा शापु खरा । नुल्लंघवे हरिहरां । तुम्ही आतांचि विचार करा । नगराबाहिरा जनु काढा ॥ ९५ ॥**

न वस्तव्यमिहास्माभिर्जिजीविषुभिरार्यकाः । प्रभासं सुमहत्पुण्यं यास्यामोऽद्यैव माचिरम् ॥ ३५ ॥

**येथोनि द्वारकेची वस्ती । आम्हीं सांडावी समस्तीं । जीवीं जाल्या चाड चित्तीं । तरी प्रभासाप्रती रिघावें ॥ ९६ ॥ वेगीं करा रे तांतडी । आजचि निघा लवडसवडी । सांडा घरादारांची गोडी । येथ अर्ध घडी न रहावें ॥ ९७ ॥**

यत्र स्नात्वा दक्षशापाद्गृहीतो यक्ष्मणोडुराट् । विमुक्तः किल्बिषात्सद्यो भेजे भूयः कलोदयम् ॥ ३६ ॥

**ऐका समस्त यादवश्रेष्ठ । प्रभासतीर्थ महावरिष्ठ । जेथिंचेनि स्नानें उडुराट । निस्तरला कष्ट क्षयाचे ॥ ९८ ॥ दक्षें निजकन्या चंद्रासी । सत्तावीस दिधल्या त्यासी । तो रतला रोहिणीसीं । येरां सर्वांसी उपेक्षुनी ॥ ९९ ॥ दक्षें शापिलें चंद्रासी । क्षयरोगु लागला त्यासी । तेणें येऊनि प्रभासासी । स्नानदानासी पैं केलें ॥ ३०० ॥ स्नानमात्रें केवळ । क्षयरोग गेला तत्काळ । कळा पावला सकळ । शोभे निर्मळ निजतेजें ॥ १ ॥**

---

श्रीकृष्णानें यादवांना सांगितलें कीं, स्वर्ग, पृथ्वी व अंतरिक्ष, यांत जे एकसारखे सर्व ठिकाणीं उत्पात होत आहेत, ९३ ते पाहून मला यदुकुळाला झालेल्या ब्राह्मणशापाची आठवण झाली. हीं सर्व दुश्चिन्हें त्याचीं सूचक आहेत. ९४ ब्राह्मणांचा शाप खरा असतो. त्याचें हरिहरांसहि उल्लंघन करवत नाहीं. तेव्हां तुम्ही आतांच विचार करा आणि नगराबाहेर पाय काढा. २९५.

आर्यकाः–हे श्रेष्ठ हो ! जिजीविषुभिः अस्माभिः इह न वस्तव्यं–जिवंत रहाण्याची इच्छा करणाऱ्या आम्हांला आतां येथें रहाणें उचित नाहीं, अद्य एव सुमहत्पुण्यं प्रभासं यास्यामः–आजच अतिशय पवित्र प्रभास क्षेत्रास आपण जाऊं या, मा चिरम्–आतां उशीर लावूं नका. [ ‘ हे देवांचे अंश आपापल्या अधिकारासच योग्य आहेत, मोक्षाला योग्य नाहींत, पण हे जर द्वारकेंतच मरण पावले तर मुक्त होतील. यास्तव अभ्युदय हें फल देणाऱ्या प्रभासतीर्थाला मी यांना नेतों ’ असा ‘ प्रभासं यास्यामः ’ असें म्हणणाऱ्या भगवानाचा आशय आहे. ) ३५.

आम्ही सर्वांनीं आतां द्वारकेंतील वस्ती सोडावी. जिवंत राहण्याची जर इच्छा असेल तर प्रभासाला जाण्यास सर्वांनीं निघावें. ९६ तुम्ही त्वरा करून एकदम आजच निघा. घरादारांचा लोभ सोडा. आतां क्षणभरहि येथें राहूं नका. २९७.

यत्र स्नात्वा दक्षशापात् यक्ष्मणा गृहीतः उडुराट् किल्बिषात् सद्यः विमुक्तः–ज्या प्रभासतीर्थांत स्नान करून दक्षशापामुळें राजयक्ष्म्यानें पीडलेला चंद्र तत्काळ पापापासून मुक्त होऊन, भूयः कलोदयं भेजे–पुनरपि कलावृद्धीला प्राप्त झाला. [ दक्षशापानें क्षय लागलेला चंद्र प्रभासतीर्थांत स्नान करितांच त्या रोगाच्या पीडेपासून तत्काल पूर्ववत् आपल्या पूर्णकलेस प्राप्त झाला. ] ३६.

हे सर्व यादवश्रेष्ठहो ! ऐका. प्रभासतीर्थ फार वरिष्ठ आहे. तेथें स्नान करून चंद्र क्षयाच्या व्याधींतून मुक्त झाला. ९८ दक्षानें आपल्या सत्तावीस कन्या चंद्राला अर्पण केल्या होत्या. त्या सर्वांची उपेक्षा करून तो रोहिणीवर फार आसक्त झाला. ९९ तेव्हां दक्षानें चंद्राला ‘ तुझ्या कलेचा क्षय होईल ’ असा शाप दिला. त्यामुळें त्याला क्षयरोग जडला. पुढें त्यानें प्रभासतीर्थांत स्नान केलें. ३०० तेव्हां तत्काळ तो केवळ स्नानानें रोगमुक्त झाला. त्याच्या सर्व कळा त्याला प्राप्त झाल्या व आपल्या निर्मळ तेजानें तो शोभूं लागला. ३०१.

वयं च तस्मिन्नाप्लुत्य तर्पयित्वा पितॄन् सुरान् । भोजयित्वोशिजो विप्रान्नानागुणवताऽन्धसा ॥ ३७ ॥
तेषु दानानि पात्रेषु श्रद्धयोप्त्वा महान्ति वै । वृजिनानि तरिष्यामो दानैर्नौभिरिवार्णवम् ॥ ३८ ॥

आम्हींही तेथ स्नान दान । पितृतर्पण देवतार्चन । करूं ब्राह्मणपूजन । जे संपन्न श्रुतिशास्त्रीं ॥ २ ॥ नाना परींचीं पक्कान्नें । गुणाधिक्यें मिष्टान्नें । देवां ब्राह्मणांसी भोजनें । नाना दानें विधानोक्त ॥ ३ ॥

श्रद्धेचेनि नेटेंपाटें । पाहूनि दानपात्रें चोखटें । दान द्यावें गोमटें । भूमी वोलटे जेवीं बीज ॥ ४ ॥ ब्राह्मणाचें मुख तें क्षेत्र । पालवियेपेढीवीण पवित्र । ऐसें पाहूनि सुक्षेत्र । दानें विचित्र पेरावीं ॥ ५ ॥ विनीततेची सेल बोल । श्रद्धेचें चाडें निर्मळ । शमदमादि बैल सबळ । ते तत्काळ जुंपोनी ॥ ६ ॥ ऐशिया वोजा परी । बीज पेरिलीया क्षेत्रीं । पीक पिकेल घुमरीं । पुरुषार्थ चारी लगडोनी ॥ ७ ॥ त्या पिकाचेनि सबळें । पापें तरोनि पैं सकळें । जेवीं नावेचेनियां बळें । समुद्रजळें तरिजेती ॥ ८ ॥

श्रीशु०— एवं भगवतादिष्टा यादवाः कुलनन्दन । गन्तुं कृतधियस्तीर्थं स्यन्दनान् समयूयुजन् ॥ ३९ ॥

शुक म्हणे कौरवनंदना । ऐकें परीक्षिती सज्ञाना । कृष्णें दिधली अनुज्ञा । तीर्थविधाना प्रभासा ॥ ९ ॥ यादव उठिले गाढे । रथीं जुंपिले जी घोडे । येर धांवती येरांपुढें । चहूंकडे लगबग ॥ ३१० ॥

तन्निरीक्ष्योद्धवो राजन् श्रुत्वा भगवतोदितम् । दृष्ट्वारिष्टानि घोराणि नित्यं कृष्णमनुव्रतः ॥ ४० ॥
विविक्त उपसंगम्य जगतामीश्वरेश्वरम् । प्रणम्य शिरसा पादौ प्राञ्जलिस्तमभाषत ॥ ४१ ॥

---

वयं च तस्मिन् आप्लुत्य—आम्ही त्या तीर्थात स्नान करून पितॄन् सुरान् तर्पयित्वा—पितर व देव यांस तृप्त करून उशिजः विप्रान्— उत्तम ब्राह्मणांस, नानागुणवता अन्धसा भोजयित्वा—उत्तम अन्नाचें भोजन घालून, तेषु पात्रेषु श्रद्धया महान्ति दानानि उप्त्वा—त्या सत्पात्र ब्राह्मणांस श्रद्धेनें मोठमोठीं दानें देऊन, नौभिः अर्णव इव—नौकेनें जसे समुद्राला त्याप्रमाणें, दानैः वृजिनानि तरिष्यामः—दानांनीं पापांना आपण तरून जाऊं. [ ज्याप्रमाणें चांगल्या शेतांत पेरलेलें बीज पुष्कळ फल देतें, त्याप्रमाणें सत्पात्रीं केलेलें दान अनंत फल देतें हें 'उप्त्वा' या पदानें सुचविलें आहे. ] ३७—३८.

तेथें जाऊन आम्ही स्नान-दानादिक, पितृतर्पण, देवतार्चन व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांचें पूजन करूं. २ अनेकप्रकारचीं मिष्टान्नें व पक्कान्नें करून देव-ब्राह्मणांना भोजन घालूं व विधियुक्त विविध दानें देऊं. ३०३.

भिजलेल्या जमिनींत जसें बीज पेरावें तसें उत्तम सत्पात्र पाहून श्रद्धायुक्त सुंदर दान द्यावें. ४ ब्राह्मणाचें मुख हें पानें व बुंधा यांनीं रहित असें पवित्र शेत आहे. असें सत्पात्ररूप शेत पाहून विविध दानरूपी बीजांची पेरणी करावी. ५ नम्रपणाची सुपीक जमीन, श्रद्धा हींच धान्य पेरण्याचीं आऊतें, शम, दम या बलवान् बैलांची जोडी सत्वर नांगराला जूंपून ६ व अशी मशागत करून बीज पेरलेल्या जमिनींत जोरानें पिक येतें व त्यांत चारी पुरुषार्थ हातीं लागतात. ७ नौकेनें जसा समुद्र तरतां येतो, तसें या पिकाच्या सामर्थ्यानें सर्व पापांना तरून जातां येतें. ३०८.

श्रीशुकः उवाच—शुकाचार्य म्हणाले, कुलनन्दन—स्वकुलाला आनंद देणाऱ्या हे राजा ! भगवता एवं आदिष्टाः यादवाः—भगवानाकडून याप्रमाणें सांगितले गेलेले यादव, तीर्थं गंतुं कृतधियः—तीर्थाला जाण्याचा निश्चय करून, स्यन्दनान् समयूयुजन्—रथ सज्ज करिते झाले. ३९.

शुकाचार्य म्हणाले, हे कुरुवंशांतील ज्ञानी परिक्षिति राजा ! ऐक, कृष्णानें प्रभासतीर्थविधि करण्याची आज्ञा देतांच ९ यादव गडबडीनें उठले, त्यांनीं रथाला घोडे जुंपले व ते एकापुढें एक धांवूं लागले. अशी चहूंकडे गडबड उडाली. ३१०.

राजन् तत् निरीक्ष्य भगवतोदितं श्रुत्वा—हे राजा ! तें पाहून व भगवानानें सांगितलेलें ऐकून, घोराणि अरिष्टानि दृष्ट्वा—आणि घोर अरिष्टें पाहून, नित्यं कृष्णं अनुव्रतः उद्धवः—कृष्णाचें सतत भजन करणारा उद्धव, जगतां ईश्वरेश्वरं विविक्ते उपसंगम्य—सृष्टीच्या ईश्वराचाहि ईश्वर अशा त्या कृष्णापाशीं एकांतात जाऊन, शिरसा पादौ प्रणम्य—पायांवर मस्तक ठेवून, प्राञ्जलिः तं अभाषत—हात जोडून बोलला. ४०—४१.

**थोर वीरांचे बोभाट । गजरथांचे घडघडाट । द्वारकेमाजीं न फुटे वाट । प्रयाण उद्भट प्रभासासीं ॥ ११ ॥ हडबडली देखोनि द्वारावती । ऐक राया परीक्षिती । उद्धवास आठवलें चित्तीं । कृष्णवदंती देवांसी ॥ १२ ॥ कुळनाशासी त्वरित । आजिपासूनि सुमुहूर्त । तोचि देवें प्रस्तुत । कार्यार्थ निश्चित मांडिला ॥ १३ ॥ उद्धव कृष्णासवें संतत । कृष्णानुमतें तो वर्तत । सुरसंवाद निश्चित । होता श्रुत तयासी ॥ १४ ॥ असतां येथ कृष्णनाथ । द्वारकेमाजीं अतिउत्पात । उठिले तें मनोगत । जाण निश्चित कृष्णाचें ॥ १५ ॥ यादव नेऊनि प्रभासासी । अर्ध क्षणें नाशील यांसी । जावया निजधामासी । हृषीकेशी उद्यत ॥ १६ ॥ म्हणाल कां नेले इतुके दुरीं । नाशु न करीच द्वारकापुरीं । तरी तो सर्वज्ञ श्रीहरी । सूत्रधारी जाणता ॥ १७ ॥ यादव देवांश निश्चिती । सातवी पुरी द्वारावती । येथ निमाल्या सायुज्यमुक्ती । हें जाणोनि श्रीपति न नाशी ॥ १८ ॥ यांसी आहे पदाभिमान । द्वारकेमाजीं न घडे निधन । हें जाणोनि जगज्जीवन । करवी प्रयाण प्रभासासी ॥ १९ ॥ ब्रह्मशापाचें मूळ देखा । प्रभासासी निघाली ते येरिका । हें कळलेंसे यदुनायका । तेथ सकळिकां धाडिलें ॥ ३२० ॥ स्वकुळ नासोनि श्रीपती । निघेल निजधामाप्रती । हें जाणोनि उद्धव चित्तीं । बहुतां रीतीं कळवळला ॥ २१ ॥ बाष्पें कंठ निरोधिला । नेत्रीं अश्रूंचा पूर लोटला । स्वेदु सर्वांगीं चालिला । हृदयीं दाटला हुंदका ॥ २२ ॥ कृष्णवियोगें अर्ध क्षण । तेणें निघो पाहे प्राण । विसरला कार्य आठवण । कृष्णवदन निरीक्षी ॥ २३ ॥ वियोगप्राप्तीचे बाण प्रबळ । हृदयीं रुतले अतिसबळ । बुद्धि धैर्येंसीं होती विकळ । जीवीं तळमळ लागली ॥ २४ ॥ एकांत देखोनि श्रीकृष्णासी । धांवोनि लागला पायांसी । मिठी घालोनि चरणेंसीं । उकसाबुकसीं स्फुंदत ॥ २५ ॥**

---

त्या वीरांनीं मोठा गोंगाट केला. हत्तीचा व रथांचा घडघडाट सुरू झाला. द्वारकेमध्यें वाट मिळेनाशी झाली. प्रभासाला जाण्याची अशी गर्दी उडाली. ११ द्वारका गजबजून गेलेली पाहून हे परीक्षिति राजा, ‘आजपासूनच मीं कुळनाशाचा मुहूर्त केला आहे’ हें श्रीकृष्णाचें देवाशीं झालेलें भाषण उद्धवाला आठवलें. १२ खरोखर तेंच कार्य आतां देवानें आरंभिलें आहे. १३ उद्धव नेहमीं कृष्णाबरोबर असे. तो कृष्णाच्या सांगण्याप्रमाणें वागत असे. त्यामुळें देवांशीं झालेला त्याचा संवाद त्यानें ऐकिला होता. १४ कृष्णनाथ द्वारकेंत रहात असून ज्याअर्थीं अशीं दुःचिन्हें होत आहेत, त्याअर्थीं कृष्णाचीच तशी इच्छा आहे. १५ यादवांना प्रभासाला नेऊन तेथें एका क्षणांत तो त्यांचा नाश करील. कारण भगवान् स्वधामाला जाण्यास उत्सुक झाला आहे. १६ पण त्यानें त्यांना इतकें दूर कशाला नेलें ? द्वारकेंतच नाश कां केला नाहीं ? असें जर म्हणशील तर जाणता भगवान् सर्वज्ञ व जगाचा सूत्रधार आहे. १७ यादव हे निश्चयानें देवांचें अंश आहेत. द्वारका सातवें नगर आहे. तेथें देह पडल्यास सायुज्यमुक्ति मिळते. हें जाणून श्रीपतीनें त्यांचा नाश येथें केला नाहीं. १८ यांना आपापल्या देवपदांचा अभिमान आहे. तेव्हां त्यांचें द्वारकेंतच मरण उचित नाहीं. हें जाणून जगज्जीवन त्यांना प्रभासतीर्थास पाठवीत आहे. १९ ब्रह्मशापाचें जें मूळ तें प्रभासामध्यें लव्हाळ्याच्यारूपानें उगवलें आहे. हें यदुनायकाला कळलें होतें, म्हणून त्यानें तेथें सर्वांना पाठविलें. ३२० श्रीपति स्वकुळाचा नाश करून स्वधामास जावयास निघेल, हें जाणून उद्धव मनांत फार खिन्न झाला. २१ त्याचा कंठ दाटून आला. डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. सर्वांगाला दरदरून घाम सुटला आणि हृदय हुंदक्यांनीं भरून आलें. २२ क्षणभर जरी कृष्णावियोग झाला तरी त्याला प्राण निघून जातोसा वाटतो, तो आपल्या कार्याची आठवण विसरतो व कृष्णमुखाकडे पाहूं लागतो. २३ त्याच्या वियोगाचें प्रबळ बाण हृदयांत जोरानें रुततात. त्यामुळें बुद्धि व धैर्य कुंठित होऊन त्याच्या जीवाला तळमळ लागते. २४ म्हणून श्रीकृष्णाला एकांतात पाहून उद्धवानें धांवत येऊन त्याचे पाय धरले व तो त्याच्या चरणाला मिठी मारून मोठमोठ्यानें स्फुंदून रडूं लागला. ३२५.

**जो जगाचा नियंता । त्या काळाचा कृष्ण कळिता । त्याचे चरणीं ठेऊनि माथा । विनीतता बोलतु ॥ २६ ॥**

उद्धव उवाच- देवदेवेश योगेश पुण्यश्रवणकीर्तन । संहृत्यैतत्कुलं नूनं लोकं संत्यक्ष्यते भवान् ।
विप्रशापं समर्थोऽपि प्रत्यहन्न यदीश्वरः ॥ ४२ ॥

**उद्धव म्हणे यादवेंद्रा । देवेंद्राच्या आदिइंद्रा । योगियांच्या प्रबोधचंद्रा । अकळ मुद्रा पैं तुझी ॥ २७ ॥ देवांमाजीं इंद्र ईशु । त्या इंद्राचा तूं जगदीशु । योगियांमाजीं श्रेष्ठ महेशु । त्याचाही ईशु तूं श्रीकृष्णा ॥ २८ ॥ तुझें जें श्रवणकीर्तन । तें पुण्यासी करी पावन । छेदी संसारभवबंधन । समाधान कीर्तनें ॥ २९ ॥ संहरूनि निजकुळासी । सांडोनियां या लोकासी । निजधामा जावों पाहसी । हृषीकेशी निश्चित ॥ ३३० ॥**

नाहं तवाङ्घ्रिकमलं क्षणार्धमपि केशव । त्यक्तुं समुत्सहे नाथ स्वधाम नय मामपि ॥ ४३ ॥

**अन्यथा विप्रशापासी । करावया समर्थ होसी । तें न करूनि कुळ संहारिसी । निजधामासी जावया ॥ ३१ ॥ ऐसें बोलतां आलें रुदन । न धरत चालिलें स्फुंदन । आसुवीं पूर्ण जाले नयन । धांवोनि चरण धरियेले ॥ ३२ ॥ माथा ठेविला चरणांवरी । सखा स्वामी तूं श्रीहरी । आम्हांसी सांडूनियां दूरी । कैशापरी जासील ॥ ३३ ॥ तुझिया प्रयाणाची वार्ता । ऐकतांचि गा अच्युता । उभडु सांठवेना चित्ता । वियोग सर्वथा न व्हावा ॥ ३४ ॥ जळावेगळी मासोळी । तैसा जीवू तळमळी । निष्ठुर जालासी अंतकाळीं । वनमाळी मजलागीं ॥ ३५ ॥ तुज गेलिया पाठीं । मी दीनवदन ये सृष्टीं ।**

---

सर्व जगाचा नियंता, असा जो काळ त्याचाहि नियामक अशा कृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवून नम्रतेनें बोलूं लागला. ३२६.

उद्धव उवाच–उद्धव म्हणाला, हे देवदेवेश–हे देवाधिदेवा, हे योगेश–हे योग्यांच्या ईश्वरा, हे पुण्यश्रवणकीर्तन–ज्याचें श्रवण व कीर्तन पुण्यकारक आहे अशा हे कृष्णा ! भवान् नूनं एतत् कुलं संहृत्य लोकं संत्यक्ष्यते–आपण खरोखर या कुलाचा संहार करून या मर्त्यलोकाला सोडाल, यत्–कारण कीं, ईश्वरः समर्थः अपि विप्रशापं न प्रत्यहन्–आपण समर्थ ईश्वर असूनहि ब्राह्मणांच्या शापाचें निवारण केलें नाहीं. ४२.

उद्धव म्हणाला, हे यादवश्रेष्ठा, इंद्राच्याहि देवेंद्रा, योग्यांच्या ज्ञानचंद्रा, तुझी मुद्रा अलक्ष्य आहे. २७ देवांचा ईश्वर इंद्र आहे, त्या इंद्राचा तूं जगदीश आहेस. योग्यांमध्यें जो श्रेष्ठ महादेव त्याचाहि हे श्रीकृष्णा, तूं स्वामी आहेस, २८ तुझें जें श्रवणकीर्तन तें पुण्यालाहि पावन करितें, संसाराचा भवबंध तोडून टाकितें, असें कीर्तनानें समाधान होतें. २९ पण हे श्रीकृष्णा ! तूं आपल्या कुळाचा संहार करून हा लोक सोडून निजधामाला जाऊं पहात आहेस. ३३०.

केशव–हे केशव ! अहं तव अङ्घ्रिकमलं क्षणार्धं अपि त्यक्तुं न समुत्सहे–मी तुझें चरणकमल एक क्षणभरहि सोडण्यास समर्थ नाहीं, नाथ मां अपि स्वधाम नय–हे स्वामिन्, मलाहि स्वधामाला ने. ४३.

विप्रशाप खोटा करण्याचें तुझ्यांत सामर्थ्य असूनहि तसें न करितां तूं निजधामाला जाण्यासाठीं आपल्या कुळाचा संहार करीत आहेस. ३१ असें बोलत असतां उद्धवाला अनावर रडूं कोसळलें. तो मोठमोठ्यानें स्फुंदून अश्रू ढाळूं लागला. त्यानें धांवत जाऊन हरीचे चरण धरिले, ३२ चरणांवर मस्तक ठेविलें आणि म्हणाला, हे श्रीहरे, तूं सखा, स्वामी आहेस. आम्हांला सोडून दूर कसा जाशील ! ३३ हे अच्युता, तुझ्या प्रयाणाची बातमी कानीं पडतांच दुःखाचा उमाळा मनांत सांठवेनासा झाला आहे. यास्तव तुझा वियोग सर्वथा न होवो. ३४ पाण्याच्या बाहेर काढलेला मासा जसा तळमळतो तसा माझा जीव तळमळूं लागला आहे. माझ्याशीं अंतकाळीं तूं असा निष्ठुर कां झालास ! ३५ तूं गेल्यावर तुझ्या मागें मी दीनवदन होऊन या जगांत कोणा-

**कोणासी सांगों गोड गोष्टी । श्वासु पोटीं न समाये ।। ३६ ।। निघोनि गेलिया आत्मा । प्रेतरुप उर प्रतिमा । तुवां गेलिया निजधामा । तैसें आम्हां होईल ।। ३७ ।। तूंचि आम्हां जनकु जननी । हा दृढ विश्वास आमुचे मनीं । केवीं जातोसी सांडोनि । म्हणोनि लोळणी घातली ।। ३८ ।। तूं निघालासी निजधामा । कोणासी निरविलें जी आम्हां । कां रुसलासी पुरुषोत्तमा । बोलु निजकमा आमुच्या ।। ३९ ।। मुकें बाळ सांडोनि क्षितीं । माता रिघों पाहे सती । तें जेवीं ये काकुळती । तैसी गती उद्धवा ।। ३४० ।। गोडु गिळी आमिषकवळु । सवेंचि पारधी आंसुडी गळु । त्या मीनाऐसा विकळु । होय प्रेमळु उद्धव ।। ४१ ।। तुज गेलियावरी देवा । म्यां कोणाची करावी सेवा । कां रुसलासी गा यादवा । आमच्या दैवा निश्चित ।। ४२ ।। कांटवणे आड क्षिती । आंधळें सांडूनि जाये सांगाती । ते ग्लानी करी वनांतीं । तैसी गती उद्धवा ।। ४३ ।। धांवधांवोनीं पायां पडे । धाय मोकलोनि रडे । मज सांडोनि तूंचि पुढें । कोणीकडे जातोसी ।। ४४ ।। मी नव्हें पायांवेगळा । क्षण नोसंडीं चरणकमळा । तुझें प्रयाण जी गोपाळा । अंतकाळा मज काळु ।। ४५ ।। तुझी थोर लागली सवे । मज न्यावे आपणासवें । हेंचि प्रार्थीतसें जीवेंभावें । कृपा यादवें मज कीजे ।। ४६ ।। तूं गरुडारूढ होसी । तेव्हां कृपेनें बैसवीं पाठीसीं । सांडो नको हृषीकेशी । निजधामासी मज नेईं ।। ४७ ।। सलगी दिधली जन्मवरी । अंतीं कां त्यागिसी दुरीं । कृपाळुवा श्रीहरी । कृपा करीं सर्वथा ।। ४८ ।। म्हणसी मी निजकुळासी काळु । तो तुज केवीं होईन कृपाळु । हें न म्हणें तूं दीनदयाळु । अतिस्नेहाळु भक्तांसी ।। ४९ ।। तुझी कृपा भक्तांवरी । यालागीं मी सलगी करीं । मातें उद्धरीं श्रीहरी । झणें संसारीं सांडिसी ।। ३५० ।।**

---

बरोबर गुजगोष्टी करूं ! माझा श्वास मला आंवरेनासा झाला आहे. ३६ जीव निघून गेल्यावर शरीर जसें प्रेतरूपानें मागें रहातें, तशी तूं निजधामाला गेल्यावर आमची स्थिति होईल. ३७ आमचीं मातापितरें तूंच आहेस, अशी आमच्या मनाची दृढ भावना आहे. आम्हांला सोडून तूं कसा जातोस ! असें म्हणून त्यानें देवाच्या पायांवर लोळण घेतली. ३८ तूं निजधामाला जाण्यास निघालास, पण आम्हांला कोणावर सोंपविलेस ! हे पुरुषोत्तमा ! आमच्यावर कां रुसलास ! आमच्या कर्माचाच हा दोष आहे. ३९ तान्ह्या बाळाला जमिनीवर टाकून त्याची माता सती जावयास निघते तेव्हां तें तान्हुलें जसें काकुळतीस येतें, तशी उद्धवाची स्थिति झाली. ३४० गळांतील आमिषाचा गोड घांस गिळतांच त्या माशाला कोळी धरून आपटतो, तेव्हां त्याचे प्राण जसे कासावीस होतात, तशी प्रेमळ उद्धवाची अवस्था झाली. ४१ हे देवा ! तूं गेल्यावर मी कोणाची सेवा करूं ! हे यादवा, आमच्यावर असा कां रुसलास ! खरोखर हें आमचें दुर्दैवच होय. ४२ आंधळ्याला कांटेरी रानांत आडवाटेंत त्याचे सोबती सोडून गेले म्हणजे तो जसा वनांत व्याकुळ होऊन पडतो तशी उद्धवाची स्थिति झाली. ४३ तो पुनःपुनः पायां पडूं लागला. धाय मोकलून रडूं लागला. मला सोडून तूंच एकटा पुढें कोठें चाललास ! ४४ मी तुझ्या पायांपासून दूर जाणार नाहीं. क्षणभरहि तुझें चरणकमल सोडणार नाहीं. हे गोपाळा ! तुझें प्रयाण म्हणजे माझा अंतःकाळच होय. ४५ मला तुझी अतिशय संवय लागली आहे. तरी मला आपल्याबरोबर घेऊन जा. मी हीच प्रार्थना जीवाभावानें करीत आहें. ४६ यादवा ! इतकी मजवर कृपा कर. तूं जेव्हां गरुडावर आरूढ होशील तेव्हां कृपा करून मला पाठीशीं बसूं दे. हे हृषीकेशा, मला सोडून जाऊं नकोस. निजधामाला मला घेऊन जा. ४७ जन्मभर स्नेह ठेवलास व शेवटीं असा दूर कां टाकितोस ! हे दयाळो श्रीहरे ! मजवर कृपा कर. ४८ ‘मी आपल्या कुळाचाहि नाश करावयास निघालों आहें. तो तुझ्यावर कशी दया करीन !’ असें जर म्हणशील तर हे हरे ! तूं दीनदयाळ आपल्या भक्तांवर अति प्रेम करितोस. ४९ तुझी भक्तांवर सदैव कृपा असते. म्हणून मी तुझ्याशीं सलगी करीत आहें. हे श्रीहरे ! माझा उद्धार कर, मला यासंसारांत टाकूं नकोस. ३५०.

तव विक्रीडितं कृष्ण नृणां परममङ्गलम् । कर्णपीयूषमास्वाद्य त्यजत्यन्यस्पृहा जनः ॥ ४४ ॥

तुझी क्रीडा नानाखेळ । प्राणियांसी परम मंगळ । कर्णद्वारें वेल्हाळ । निजनिर्मळ सेविती ॥ ५१ ॥ तुझे कीर्तिश्रवणाचे आवडीं । लागली कर्णपीयूषीं गोडी । तेथ अमृताची चवी थोडी । हो अर्ध घडी न लागतां ॥ ५२ ॥ ऐशी ऐकतां तुझी कीर्ति । सवासना स्पृहा नासती । ते भक्तु तुज न विसंबती । हृदयीं वाहती सर्वदा ॥ ५३ ॥ त्या तुज प्रत्यक्ष श्रीकृष्णासी । मज न साहवे वियोगासी । सवे लाविली आह्मांसी । सौजन्येंसी स्वामित्वें ॥ ५४ ॥

शय्यासनाटनस्थानस्नानक्रीडाशनादिषु । कथं त्वां प्रियमात्मानं वयं भक्तास्त्यजेमहि ॥ ४५ ॥

तूं तंव आमुचा स्वामी होसी । मज अर्धासनीं बैसविसी । मजवेगळें हृषीकेशी । निजगुजासी तुज नाहीं ॥ ५५ ॥ अचाट कार्य पडे थोर । तेव्हां मज पुससी विचार । मी सांगें जो जो मंत्र । तो तो साचार मानिसी ॥ ५६ ॥ जेव्हां भोजन करूं रिघसी । माझें ताट तार्टेसी मांडिसी । जेवितां नाना विनोद करिसी । निजशेष देसी मजलागीं ॥ ५७ ॥ ब्रह्मादिकां न लभे पंक्ती । तो मी जेवीं तुझिया पातीं । शेषविभागी जी श्रीपती । केलें निश्चितीं त्वां मज ॥ ५८ ॥ मातें धरोनियां हातीं । एकला बैससी एकांतीं । ब्रह्मादिकांची विनंती । तुजप्रती मी सांगें ॥ ५९ ॥ कळों नेदितां कोणासी । तुवां केलें रासक्रीडेसी । तें गुह्य सांगोनि मजपाशीं । गोकुळासी धाडिलें ॥ ३६० ॥ सेजेचें उठवूनि भीमकीशी । मज आपणाजवळ निजविशी । ते निद्रेचिया सुखासी । समाधि कायसी बापुडी ॥ ६१ ॥

---

कृष्ण—हे कृष्णा !, तव विक्रीडितं परमं मंगलं--तुझी क्रीडा मनुष्यांना परम मंगल आहे. जनः कर्णपीयूषं आस्वाद्य अन्यस्पृहां त्यजति—लोक कानाला अमृताप्रमाणें मधुर लागणाऱ्या त्या क्रीडेचा स्वाद घेऊन अन्य विषयांविषयींची इच्छा सोडितात. ४४.

तुझी क्रीडा, अनेक प्रकारचे खेळ मनुष्यांना परम मंगलकारक वाटतात. ते तुझ्या पवित्रकथा कौतुकानें ऐकतात. ५१ तुझ्या कीर्तिश्रवणाच्या आवडीनें आम्हांला श्रवणामृताची जी गोडी लागली आहे, तिच्यापुढें अर्ध्याघटकेंत अमृताचीहि चव कमी होते ५२ व अशी तुझी कीर्ति ऐकिली असतां वासनेसह सर्व कामना नाश पावतात, मग ते भक्त तुला क्षणभरहि विसंबत नाहीं. सर्वकाळ तुला हृदयांत धारण करितात. ५३ त्या तुझा प्रत्यक्ष श्रीकृष्णाचा वियोग मला सहन होत नाहीं. आमचा स्वामी होऊन तूं आपल्या सौजन्यानें आम्हांला आपली संवय लाविली आहेस. ३५४.

शय्या-आसन-अटन स्थान-स्नान,-क्रीडा-अशनादिषु—शय्या, आसन, विहार, स्थिति, स्नान, क्रीडा व भोजन इत्यादि प्रसंगीं भक्त नित्य तुझी सेवा करितात. तेव्हां, वयं भक्ताः प्रियं आत्मानं त्वां कथं त्यजेमहि—भक्त असलेल्या आम्हीं आमचा प्रिय असलेला आत्माच असा जो तूं त्या तुला कसें सोडावें ! ४५.

तूं तर आमचा स्वामी असूनहि मला आपल्या अर्ध्या आसनावर बसविलेंस. हे हृषीकेशा, माझ्यापासून तूं कांहीं गुप्त ठेविलें नाहींस. ५५ जेव्हां एखादें मोठें महत्त्वाचें कार्य निघत असे तेव्हां तूं माझा विचार घेत असस व मी जो सल्ला देत असें तो तूं खरोखर मान्य करीत होतास. ५६ जेव्हां जेवायला बसत असस, तेव्हां आपल्या शेजारी माझें पान मांडून जेवतांना अनेकप्रकारची थट्टामस्करी करीत होतास. आपल्या ताटांतले पदार्थ मला देत होतास. ५७ ब्रह्मादिकांसहि तुझ्या पंक्तीचा लाभ मिळत नाहीं. पण तूं मला पंक्तीला बसवून आपल्या पानांतील अवशेषाचा भागीदार केलेंस. ५८ माझा हात धरून, मला घेऊन तूं एकांतांत बसत होतास व ब्रह्मदेवादिकांची विनंति मी तुझ्या कानांवर घालीत होतों. ५९ कोणाच्याहि न कळत तूं रासक्रीडा केलीस, पण ती गुप्त गोष्ट सांगून तूं मला गोकुळास पाठविलेंस. ३६० पुष्पशय्येवर निजलेल्या रुक्मिणीला उठवून तूं मला आपल्याजवळ निजविलेंस. त्या निद्रासुखापुढें बिचाऱ्या समाधीची काय कथा ! ६१

ऐशिया तुझे संगतीं । रात्री भोगिल्या नेणो किती । त्या मज सांडोनि श्रीपती । जाणें निश्चितीं करितोसी ॥ ६२ ॥ वेळू न गमे चक्रपाणी । मज बोलावूं धाडिसी रुक्मिणी । सारीपाटु आम्हीं दोघींजणीं । एकासनीं खेळिजे ॥ ६३ ॥ जेव्हां विहाळिये निघसी । मज आपुलें रथीं बैसविसी । दोघां गमन एकें रथेंसी । आजि उबगलासी सांघाता ॥ ६४ ॥ जळक्रीडा करितां जळीं । करितां गोपिकांसीं रांडोळी । तेव्हांहि मी तुजजवळी । स्नानकाळीं सर्वदा ॥ ६५ ॥ ऐसें सांगों मी किती । तुजवेगळा जी श्रीपती नाहीं जालों अहोरातीं । केवी म्यां अंतीं सांडावें ॥ ६६ ॥ तूं स्वामी सखा सर्वात्मा जीवाचा जीव पुरुषोत्तमा । तुझा वियोगु मेघश्यामा । केवी आह्मां साहावेल ॥ ६७ ॥ आमुचा जीवु आणि प्राण । ते तुझे गा श्रीचरण । तें वियोगदुःख साहावया जाण । समर्थपण मज नाहीं ॥ ६८ ॥ आमुचा हाचि लाभु अव्यंग । जे तुझिया पायांचा संयोग । त्यांचा न साहावे वियोग । देहभंग जालिया ॥ ६९ ॥ देह राहेल तरी राहो । अथवा जाईल तरी जावो । तुझा चरणांचा वियोग पहा हो । न शकें साहों सर्वथा ॥३७०॥ थोर दुस्तर तुझी माया । ब्रह्मादिकां न ये आया । मज सुगम जाली तरावया । यादवराया निजशेषें ॥ ७१ ॥

त्वयोपभुक्तस्रग्गन्धवासोलङ्कारचर्चिताः । उच्छिष्टभोजिनो दासास्तव मायां जयेमहि ॥ ४६ ॥

तुझें गंधशेष आणि माळा । धरितां कपाळीं आणि गळां । मी नागवें कळिकाळा । दास गोपाळा प तुझा ॥ ७२ ॥ तुझे कांसेचा पिंवळा । येऊनि माझे कांसे लागला । तैंचि कामु म्यां जिंतिला । दृढ जाला निजकांसे ॥ ७३ ॥ तुवां आपुले हृदयींचें पदक । जेव्हां मज दिधलें देख । तेव्हांचि माया जाली

---

अशाप्रकारें तुझ्या सहवासांत किती रात्री घालविल्या त्याची गणती नाहीं. त्या मला सोडून हे श्रीपते ! तूं जाण्याचा निश्चय कसा करितोस ? ६२ हे चक्रपाणे ! तुला वेळ जाईनासा झाला म्हणजे रुक्मिणीला मजकडे बोलावणें धाडीत होतास आणि आपण दोघेजण एका आसनावर बसून सारीपाट खेळत असों. ६३ बाहेर फिरायला निघालास म्हणजे मला आपल्या रथांत बसवून घेतलें आहेस. असे एका रथांतून जे आपण दोघे बरोबर फिरलों त्या माझ्या संगतीला आज कंटाळलास कां ! ६४ जलक्रीडा करतेवेळीं, गोपींच्याबरोबर विनोद करतेवेळीं, स्नानाच्या वेळीं सर्वकाळ मी तुझ्याबरोबर होतों. ६५ हे श्रीपते ! अशा किती गोष्टी सांगूं ! रात्रंदिवस मी तुझ्यापासून दूर झालों नाहीं. त्या मीं तुला आतां शेवटीं कसें सोडावें ! ६६ तूं स्वामी, सखा, सर्वात्मा आहेस. हे पुरुषोत्तमा ! तूं जीवांचाहि जीव आहेस. हे मेघश्यामा ! तुझा वियोग आम्हांला कसा सहन करवेल ! ६७ तुझे चरण माझा जीव कीं प्राण आहेत. त्यांचें वियोगदुःख सहन करण्याचें सामर्थ्य मला नाहीं. ६८ तुझ्या पायांची प्राप्ति हाच आमचा अखंड लाभ आहे. देहपात झाला तरी त्यांचा वियोग आम्हांला सहन होणार नाहीं. ६९ हें शरीर राहिलें तर राहो, नाहीं तर जावो. आम्हांला त्याची पर्वा नाहीं. पण तुझ्या चरणांचा वियोग मात्र सर्वथा असह्य होईल. ३७० तुझी माया अतिशय दुस्तर आहे. ब्रह्मादिकांसहि तिला आटोक्यांत ठेवितां येत नाहीं. ती माया हे यादवश्रेष्ठा ! तुझ्या अवशिष्ट प्रसादानें मला तरून जाण्यास सुलभ झाली. ३७१.

—'तुला सोडण्यास असमर्थ असलेला मी तुझी अशी प्रार्थना करितों, मायेच्या भयानें नव्हे' असें आतां उद्धव सांगतो—

त्वया उपभुक्तस्रक-गंध-वासः-अलंकारचार्चिताः—तूं ज्यांचा उपभोग घेतला आहेस अशा पुष्पमाळा, गंध, वस्त्र, अलंकार यांनीं भूषित झालेले, उच्छिष्टभोजिनः तव दासाः—तूं उपभोग घेऊन अवशिष्ट राहिलेल्या पदार्थांचा स्वाद घेणारे आम्ही तुझे दास, मायां जयेम हि—तुझ्या मायेला नियमानें जिंकूं. ४६.

तुझ्या निर्माल्यांतील माळा गळ्यांत व गंध कपाळीं धारण केलें असतां मी कळीकाळाच्याहि हातीं लागत नाहीं. हे गोपाळा, मी तुझा दास आहें. ७२ तूं नेसलेला पीतांबर माझ्या आंगाला लागतांच मीं कामाला जिंकिलें व जितेंद्रिय झालों. ७३ तूं जेव्हां आपल्या हृदयावरील पदक मला दिलेंस तेव्हांपासून माया विमुख होऊन माझ्यापुढें

विमुख। दासां सन्मुख न राहे ॥ ७४ ॥ मायेसी असतें मुख। तरी हों लाहती सन्मुख। ते मिथ्या गा निःशेख। वृथा लोक भ्रमले पैं ॥ ७५ ॥ तुझें उच्छिष्ट सेवितां देख। लाजोनि जाये समाधिसुख। निडारला निजात्मतोख। शेषें प्रत्यक्ष निजलाभु ॥ ७६ ॥ ऐसा तुझेनि दास्यें सरता जाला। तुझेनि निजशेषें चार्चिला। तुझी माया मी तरला। जिया धाकु लाविला योगियां ॥ ७७ ॥

वाताशना य ऋषयः श्रमणा ऊर्ध्वमन्थिनः। ब्रह्माख्यं धाम ते यान्ति शान्ताः संन्यासिनोऽमलाः ॥ ४७ ॥

मिथ्या मायेच्या धाकासाठीं। योगी रिघाले कपाटीं। जरी सांडिली लंगोटी। तरी पोटीं धाकती ॥ ७८ ॥ आसनस्थ होऊनि जाणा। आकळावया प्राणापाना। मूळबंधें आलोचना। दृढ धारणा ते करिती ॥ ७९ ॥ अंगुलें बारा बारा। जिणावया जी वारा। रात्रदिवस शरीरा। अभ्यासद्वारा आटिती ॥ ३८० ॥ क्षुधेनें खादली भूक। तृषा तहान प्याली देख। जिणोनियां सुखदुःख। अतिनेटक निर्धारें ॥ ८१ ॥ सुबुद्धि धरूनियां हातीं। आकळूनि इंद्रियवृत्ती। वैराग्यें करित ख्याती। ऊर्ध्वगती निघाले ॥ ८२ ॥ भेदोनि मणिकर्णिकावोवरी। उसळले जी ब्रह्मरंध्रीं। जिणोनियां ब्रह्मगिरी। निशाणभेरी लाविल्या ॥ ८३ ॥ तेथ शांतीचेनि योगें। विलसत सर्वांगें। संकल्पत्यागवेगें। जाले अंगें चिद्‌ब्रह्म ॥ ८४ ॥ ऐसे योगबळें योगी। माया जिणती अंगोअंगीं। त्याहोऊनि अतिसुगममार्गीं। आम्हांलागीं त्वां केली ॥ ८५ ॥

वयं त्विह महायोगिन् भ्रमन्तः कर्मवर्त्मसु। त्वद्वार्तया तरिष्यामस्तावकैर्दुस्तरं तमः ॥ ४८ ॥

---

उभी राहीनाशी झाली. ७४ मायेला जर पुढें येण्यास तोंड असतें तर ती समोर आली असती. पण ती निःशेष मिथ्या असून लोक तिला व्यर्थ भाळतात. ७५ तूं भोगून उरलेलें अन्न सेविलें असतां जें सुख होतें त्यापुढें समाधिसुखहि तुच्छ आहे. त्या शेषभक्षणानेंच माझा आत्मानंद परिपक्व झाला आहे. तुझ्या अवशिष्ट राहिलेल्या शेषाच्या ग्रहणानें इतका प्रत्यक्ष लाभ होतो. ७६ याप्रमाणें तुझी सेवा करीत मी म्हातारा झालों. तुझ्या शेषानें भूषित झालों. तुझ्या ज्या मायेनें योग्यांना धाक घातला त्या मायेलाहि मी तरून गेलों. ३७७.

—'संन्यासी ब्रह्मचारी इत्यादि मायेला मोठ्या कष्टानें तरतात. पण आम्ही अनायासानेंच तरून जाऊं' असें उद्धव सांगतो—

ये वाताशनाः ऋषयः ऊर्ध्वमन्थिनः श्रमणाः शांताः अमलाः संन्यासिनः च ते ब्रह्माख्यं धाम यान्ति— जे वायु भक्षण करणारे ऋषि, ऊर्ध्वरेते तापसी, शांत व शुद्ध संन्यासी आहेत ते ब्रह्मसंज्ञक स्थानाला प्राप्त होतात. ४७.

मिथ्या मायेच्या भीतीनें योगी गुहेंत जाऊन राहिले. पण तेथें त्यांची लंगोटी जरी सांडली तरी ते मनांत कासावीस होतात. ७८ ते आसनावर बसून प्राणायाम करून वज्रासनानें गात्रें आंखडून टाकितात. अशी दृढ धारणा करितात. ७९ प्राणवायूचा बारा बारा अंगुळांनीं विजय मिळविण्यासाठीं प्राणायामाच्या अभ्यासानें अहोरात्र शरीराला आटवितात. ३८० त्यांनीं क्षुधेनें भुकेला खाऊन टाकिलें, तृषेनें तहानेला पिऊन टाकिलें. निश्चयानें सुखदुःखाला अगदीं जिरवून टाकिलें. ८१ आणि सुबुद्धीला हातीं धरून, इंद्रियवृत्तीचें नियमन करून, विरक्तीनें आपली प्रसिद्धि करीत ते ऊर्ध्वमार्गानें निघतात. ८२ मणिकर्णिकादि चक्रांचा भेद करून ब्रह्मरंध्रामध्यें वेगानें जातात. ब्रह्मगिरीला जिंकून नगारे वाजवितात. ८३ तेथें शांतीच्या योगानें सर्वांगीं शोभूं लागतात. संकल्पाचा त्याग करून स्वतः चिद्रूप ब्रह्म होतात. ८४ याप्रमाणें योगी योगाच्या बलानें मायेला जिंकितात. पण तूं त्याहून अति सोपा मार्ग आमच्यासाठीं केला आहेस. ३८५.

महायोगिन्—हे महायोग्या, वयं तु इह कर्मवर्त्मसु भ्रमन्तः—पण आम्ही या लोकीं कर्ममार्गामध्यें भ्रमण करणारे, तावकैः तद्वार्तया दुस्तरं तमः तरिष्यामः—तुझ्या भक्तांशीं तुझ्या गोष्टी बोलत संसाराला तरून जाऊं. ४८.

भजावें तुझिया निजभक्तां । ऐकावी तुझी कथावार्ता । इतुकेनि तरावें जी सर्वथा । कृष्णनाथा निजमाया ॥ ८६ ॥ आम्हां कर्ममार्गींचिया कर्मठां । तूवां उपकारु केला मोटा । तुझ्या कथेचा श्रवणपाठा । मुक्त दारवंठा मोक्षाचा ॥ ८७ ॥ असो मोक्षाची कथा । चाड नाहीं गा सर्वथा । तुझ्या भक्तांसी तुझी कथा । करितां भवव्यथा न बधीची ॥ ८८ ॥ तुझे अभेदभक्तीचें कोड । आम्हां संसारुचि गोड । ठेंचूनि त्रिगुणाचें तोंड । भक्त प्रचंड भजताती ॥ ८९ ॥

स्मरन्तः कीर्तयन्तस्ते कृतानि गदितानि च । गत्युत्स्मितेक्षणक्ष्वेलि यन्नृलोकविडम्बनम् ॥ ४९ ॥

तुझ्या चरित्राचें श्रवण । आवडीं करितां कीर्तन । त्यांचा भवबंधच्छेदन । बळेंचि जाण तूं करिशी ॥ ३९० ॥ पुसोनियां संसारभावो । निजपदीं देसी ठावो । हा श्रवणकीर्तनलाभ पाहा हो । आम्हीं सहजें लाहों निजभक्त ॥ ९१ ॥ स्वभावें कीर्तन करितां । एवढा लाभु होये तत्त्वतां । मा तुझिये मूर्खींच्या कथा गातां । आपणियां देता तूं होशी ॥ ९२ ॥ तुझीं गोकुळींचीं गमनपदें । आवडीं वर्णिती आनंदें । त्यांसीं खांदीं वाऊनियां निजबोधें । कीर्तनच्छंदें नाचशी ॥ ९३ ॥ तुवां जे केली लीला । ते आवडीं गातां जी गोपाळा । नित्य त्या सेवकांजवळा । अंगें अंगवळा तूं होशी ॥ ९४ ॥ तुझें वर्णिती जे हास्यवदन । त्या भक्तांचें तूं करिशी ध्यान । त्यांचेनि बोलें समाधान । स्त्रीशूद्रां जाण तूं देशी ॥ ९५ ॥ तुझे दृष्टीचें दर्शन । दृश्यातीतनिरीक्षण । सर्वत्र देखणेपण । कीर्तनीं गान जे गाती ॥ ९६ ॥ त्यांच्या पाउलापाउलासी । आपुलें सर्वांग तूं वोवाळिसी । अंग टाकूनि तिष्ठसी । त्यांपाशीं सर्वदा ॥ ९७ ॥ आपुली गुह्य ज्ञानमुद्रा । त्यांसीं अर्पिसी तूं ज्ञानिनरेंद्रा । निजबोधें प्रबोधचंद्रा । त्यांच्या निजभद्रा तूं करिशी ॥ ९८ ॥ रासक्रीडादि नाना छंद । अंगनामंगनादि प्रबंध ।

---

हे कृष्णनाथा ! तुझ्या भक्तांचें भजन व तुझें कथाकीर्तन, इतक्यानेंच मी तुझी माया सर्वथा तरून गेलों. ८६ आम्हां कर्मठ–कर्ममार्गी लोकांवर तूं मोठा उपकार केला आहेस. तुझ्या कथेचें श्रवण व पाठ केल्यानेंच मोक्षाचें दार उघडतें. ८७ मोक्षाची गोष्ट तर राहोच, त्याची आम्हांला मुळींच चाड नाहीं. तुझ्या भक्तांना तुझी कथा संसारबंधनापासून मुक्त करिते. ८८ आम्हां प्रपंची जनांना तुझी अभेद भक्तीच आवडते. आम्हांला संसारच गोड वाटतो. महाभक्त त्रिगुणांचें तोंड ठेचून तुला भजतो. ३८९.

ते कृतानि गदितानि च गति-उत्स्मित-ईक्षण-क्ष्वेलि यत् नृलोकविडंबनं स्मरन्तः कीर्तयंतः ( दुस्तरं तमः तरिष्यामः )–तुझ्या कृति, भाषणें, गति, स्मित, पहाणें व थट्टामस्करी इत्यादि जें मनुष्यलोकाचें अनुकरण त्याचें स्मरण व कीर्तन करीत होत्साते संसाराचें उल्लंघन करूं. ४९.

तुझ्या चरित्राचें भक्तीनें श्रवण व आवडीनें कीर्तन करणारांचा तूं भवबंध बळेंच तोडून टाकितोस. ३९०. संसाराची आसक्ति नाहींशी करून त्यांना आपल्या चरणाजवळ स्थान देतोस. हा श्रवणकीर्तनानें होणार लाभ आम्हीं–तुझ्या भक्तांनीं सहज अनुभविला. ९१ सहज कीर्तन केलें असतां एवढा मोठा लाभ होतो, पण तुझ्या तोंडच्या गोष्टी सांगणारास तूं आत्मभाव देतोस. ९२ तुझ्या गोकुळांतल्या लीला आनंदानें व आवडीनें जे गातात त्यांना तूं आपलेसें समजून खांद्यावर वहातोस. कीर्तनछंदानें नाचतोस. ९३ हे गोपाळा ! तूं जी लीला केलीस तिचें प्रेमानें वर्णन करणाऱ्या आपल्या भक्तसेवकांचा तूं अगदीं जवळचा आप्त होतोस. ९४ जे भक्त तुझ्या हंसतमुखाचें वर्णन करितात त्या भक्तश्रेष्ठाचें तूं ध्यान करितोस व त्यांच्या शब्दांनीं स्त्री-शूद्रांनाहि समाधान देतोस. ९५ तुझ्या दृष्टीचें दर्शन घडलें असतां तें अदृश्य परमात्म्याचेंच दर्शन ते समजतात. कीर्तनांत तुझ्या लोकोत्तर स्वरूपाचें गायन जे करितात ९६ त्यांच्या प्रत्येक पावलावरून तूं स्वतःला ओवाळून टाकितोस व निराकार रूपानें तूं सर्वदा त्यांच्यापाशीं रहातोस. ९७ हे ज्ञानिश्रेष्ठा ! प्रबोधचंद्रा ! तूं त्यांना आपल्या गुप्तज्ञानाचा ठसा अर्पण करून त्यांचें आत्महित साधितोस. ९८ रासक्रीडादि अनेक लीला, ९९ प्रजापतीला फसवून स्वतःच गोपाळवत्सें होणें, इत्यादि विनोद, ही

कीर्ति अतिशयें विशद । भावार्थे शुद्ध जे गाती ॥ ९९ ॥ कां ठकूनिया ब्रह्मयासी । गोपाळवत्सें तूं जाहलासी । ऐसऐशियां विनोदांसी । हृषीकेशी जे गाती ॥ ४०० ॥ त्यांसी सर्वां भूतीं निजात्मता । देसी तूं आपुली सत्ता । त्यांच्या बोलांमाजीं वर्तता । कृष्णनाथा तूं होशी ॥ १ ॥ मनुष्यनाट्याचेनि योगें । जें जें केलें तुवां अंगें । तें गातां ऐकतां अनुरागें । तरले वेगें निजभक्त ॥ २ ॥ म्यांचि केली जे जे आळी । ते त्वां पुरविली सर्व काळीं । त्या मज उपेक्षूनि वनमाळी । अंतकाळीं कां जाशी ॥ ३ ॥

श्रीशु० उ०-एवं विज्ञापितो राजन् भगवान्देवकीसुतः । एकान्तिनं प्रियं भृत्यमुद्धवं समभाषत ॥

एवं यापरी देवकीसुत । पूर्ण पूर्णांशें भगवंत । विनविला श्रीकृष्णनाथ । निजभृत्यें उद्धवें ॥ ४ ॥ निजभृत्य म्हणणें । उद्धवासी याकारणें । निजगुज श्रीकृष्णें । त्यासीं बोलणें सर्वदा ॥ ५ ॥ जेथ रिगमु नाहीं रुक्मिणीसी । ठावो नाहीं वसुदेवदेवकीसी । बळिभद्रा प्रद्युम्नासी । अनसरू यांसी जे ठायीं ॥ ६ ॥ ॥ ६ ॥ ते ठायीं कृष्णाप्रती । उद्धव असे अहोरातीं । यालागीं पैं एकांतीं । ज्ञाते म्हणती तयासी ॥ ७ ॥ श्रीकृष्णासी वाडेंकोडें । जीवापरीस जें जें आवडे । तें उद्धवासी देणें घडे । प्रेम गाढें भक्तांचें ॥ ८ ॥ देतां तो जरी नेघे । तरी धांवोनि आलिंगी वेगें । न घेतां देवो पायां लागे । भक्तपांगें पांगिला ॥ ९ ॥ यालागीं कृष्णासी प्रियकर । उद्धवुचि साचार । याहूनि प्रेम थोर । नाहीं सधर आनाचें ॥ ४१० ॥ यालागीं विप्र भृत्य एकांती । ये बिरुदें उद्धवासी साजती । तेणें निजस्वामीस विनंती । निजप्रीतीं पैं केली ॥ ११ ॥ ऐकोनि उध्दवाचें वचन । चातकांलागीं जेवीं घन । तेवीं बोळला जगज्जीवन । स्वानंदघन निजबोधें ॥ १२ ॥ चातकाची तहान किती । तृप्त करूनि निववी क्षिती । उध्दवउद्देशें श्रीपती । त्रिजगती निववील ॥ १३ ॥ ऐकतां उध्दवाचे बोल । येताती

---

सर्व कीर्ति जे शुद्धभावानें गातात त्यांना हे हृषीकेशा ! तूं सर्व भूतांमध्यें आत्मभावना देतोस. हे कृष्णनाथा ! तूं त्यांच्या आज्ञेंत रहातोस. ४००-१ लीलेनें मनुष्यरूप घेऊन तूं जें जें चरित्र केलेंस तें प्रेमानें गाणारे व ऐकणारे तुझे भक्त त्वरित तरून गेले. २ मी जो जो हट्ट धरिला तो तो तूं सर्वदा पुरविलास आणि आतां शेवटीं हे वनमाळी ! माझी उपेक्षा करून कां जातोस ! ४०३.

श्रीशुकः उवाच—श्रीशुकाचार्य म्हणाले, राजन्—हे राजा ! एवं विज्ञापितः भगवान् देवकीसुतः—याप्रमाणें विज्ञापना केला गेलेला भगवान् देवकीपुत्र, एकान्तिनं प्रियं भृत्यं उद्धवं समभाषत—एकान्ति अनन्य प्रिय सेवक जो उद्धव त्याला असें बोलला. ५०.

याप्रमाणें देवकीपुत्र पूर्णांश भगवान् श्रीकृष्णाला त्याच्या उद्धव भृत्यानें विनविलें. ४ उद्धवाला त्याचा सेवक अशासाठीं बोलावयाचें कीं, त्याच्याशीं श्रीकृष्णाच्या सदासर्वदा गुप्तगोष्टी चालत असत. ५ जेथें रुक्मिणीला प्रवेश नाहीं, वसुदेव, देवकी, बलराम, कृष्णाचा पुत्र प्रद्युम्न यांचाहि जेथें शिरकाव नाहीं, ६ तेथें उद्धवाला मज्जाव नव्हता. उद्धव कृष्णाजवळ एकांतांत रात्रंदिवस असे. म्हणून ज्ञाते त्याला कृष्णभक्त म्हणतात. ७ श्रीकृष्णाला आपल्या प्राणाप्रमाणें जें जें आवडत असे तें तें तो उद्धवाला देत असे. कारण त्याला भक्तांची फार आवड होती. ८ उद्धवानें जरी घेतलें नाहीं तरी देव धांवत येऊन त्याच्या पायां पडत असे. इतका तो भक्तांच्या अधीन झाला होता. ९ म्हणून खरोखर कृष्णाला उद्धवच अत्यंत प्रिय आहे. त्याचें याहून अधिक प्रेम दुसऱ्या कोणावरहि नव्हतें ४१० म्हणून ब्राह्मणभृत्य, एकांतभक्त या पदव्या एका उद्धवालाच साजतात. अशा उद्धवानें आपल्या स्वामीला प्रीतीनें अशी विनंति केली. ११ तेव्हां चातकावर जसा मेघ प्रसन्न होतो तसा जगज्जीवन आनंदघन उद्धवाचें वचन ऐकून प्रसन्न झाला. १२ चातकाची तहान ती केवढी ! पण ती भागवून मेघ पृथ्वीला जसा शांत करितो तसा श्रीपति उद्धवाच्या निमित्तानें त्रैलोक्याला तृप्त करील. १३

श्रीकृष्णासी डोल । भक्तभाग्य जी सखोल । जाली बोल प्रेमाची ॥ १४ ॥ ते बोळले भक्तभूमीसी । निजबीज पेरील हृषीकेशी । तें पीक पुरेल जगासी । मुक्तराशी मुमुक्षां ॥ १५ ॥ धेनु वत्साचेनि वोरसें । घरीं दुभतें पुरवी जैसें । तेवीं उद्धवाचेनि उद्देशें । जग हृषीकेशें निववीजे ॥ १६ ॥ घरीं पाहुणयालागीं । कीजती परवडी अनेगी । तेथ बालकें जेवीं विभागी । होती वेगीं न मागतां ॥ १७ ॥ पक्कान्न सेवूं नेणती बाळें । तरी माता मुखीं घाली बळें । तैसें जनार्दनें आम्हां केलें । स्वयें दिधलें निजशेष ॥ १८ ॥ नवल कृपा केली कैशी । कृष्ण उद्धवातें उपदेशी । तोचि अर्थ दिधला आम्हां-सी । देशभाषीं अर्थितां ॥ १९ ॥ एका जनार्दनु म्हणे । श्रोतां सावधान होणें । हें मी तोंडें बोलों कवणें । तिहीं मज करणें सावध ॥ ४२० ॥ निजभक्तें केलीं विनंती । निजज्ञान बोलेल भक्तपती । श्रवणाची सावध पंक्ती । बैसवा वृत्ति तद्बोधें ॥ २१ ॥ येथ मुक्तांचें कोड । पुरे मुमुक्षांची चाड । येचविषयीं कथा गोड । श्रवणकवाड उघडेल ॥ २२ ॥ उद्धवें श्रीकृष्ण विनविला । ना तो श्रवणीं डांगोरा पिटिला । मुमुक्षां म्हणे चला चला । कृष्ण बोळला निजबोधें ॥ २३ ॥ मोक्षमार्गींचे कापडी । अर्थतृषातृषितें बापुडीं । प्रबोधबोधाची पव्हे गाढी । उद्धवें रोकडी घालविली ॥ २४ ॥ भक्तिजननी माझी तेथ । कडे घेऊनि होती नेत । जनार्दन परमामृत । जालें प्राप्त तिचेनी ॥ २५ ॥ ते तुझी भक्ति तत्त्वतां । आम्हांसी असावी सर्वथा । तुज मागावी मुक्तता । तंव ते मूर्खता भक्तांची ॥ २६ ॥ साच असावी बद्धता । तरी म्यां मागावी बद्धमुक्तता । तेचि नाहीं गा तत्त्वतां । मिथ्या मागतां मूर्खत्वें ॥ २७ ॥ मीतूंपणेंवीण सहज स्थिती । तुझी असो अभेदभक्ती । हेंचि मागणें पुढतपुढतीं । संतांप्रती

---

उद्धवाचे शब्द ऐकून श्रीकृष्ण डोलूं लागला. भक्तांचें भाग्य फार मोठें म्हणून प्रेमाचा पूर वाहूं लागला. १४ त्या भक्तरूपीभूमीमध्यें श्रीकृष्ण आपलें ज्ञानबीज पेरील. त्याचें मुमुक्षूंना मुक्त करणारें पीक जगाला पुरेल. १५ गाय जशी वासरावरील स्नेहानें दूध देतें, पण तें घरांतल्या सगळ्या माणसांना पुरें पडतें; त्याप्रमाणें उद्धवाच्या निमित्तानें श्रीकृष्ण जगाला शांत करील. १६ घरांत अनेक प्रकारचीं पक्वान्नें पाहुण्यांच्यासाठीं होतात, पण मुलांना तीं न मागतां मिळतात. १७ आणि जरी तें पक्वान्न कसें खावयाचें हें त्या मुलांना ठाऊक नसलें, तरी त्यांची माता त्यांच्या तोंडांत तें बळेंच घालते, त्याप्रमाणें जनार्दनानें केलें १८ व काय आश्चर्य आहे पहा, कृष्णानें स्वतःच उद्धवाला उपदेश केला, व त्याचा अर्थ आम्हांला प्राकृत भाषेंत सांगितला. १९ एका जनार्दन म्हणतो कीं, मी श्रोत्यांना सावधान चित्तानें ऐका, असें कोणत्या तोंडानें सांगूं ! त्यांनींच उलट मला सावध केलें पाहिजे. ४२० भक्तानें विनंति केली. भक्तांचा स्वामी स्वात्मज्ञान सांगेल. तें ऐकण्यास आपल्या वृत्ति सावधान ठेवा. २१ येथें मुक्तांची हौस पुरेल. मुमुक्षूंची इच्छा तृप्त होईल. ही गोडकथा ऐकण्यास कानाचें दार उघडेल. २२ उद्धवानें श्रीकृष्णाला विनंति केली असें म्हणण्यापेक्षां त्यानें श्रवणाचा डांगोराच पिटिला आणि मुमुक्षूंना म्हटलें, चला, चला, कृष्ण स्वात्मबोधानें प्रसन्न झाला आहे. २३ या मोक्षमार्गांतील बिचारे प्रवासी अर्थतृषेनें तान्हेले होते, त्यांना ज्ञानामृताची पाणपोयी दाखवून उद्धवानें त्यांची तृषा घालविली. २४ माझी भक्तिरूपी माता मला कडेवर घेऊन तेथें नेत होती. तों जनार्दनस्वामीरूप परम अमृत मला प्राप्त झालें. २५ ती तुझी भक्ती आमच्याजवळ नेहमीं असावी. तुझ्याजवळ मुक्ति मागणारे भक्त मूर्खच असले पाहिजेत. २६ बंधन जर खरोखर असेल तर मीं बंधमुक्त होण्याची मागणी करावी; पण तत्त्वतः बंधन नसूनच मूर्खपणानें लोक त्यांतून मुक्त करण्यास विनवितात व मुक्त होण्याची इच्छा करितात. २७ 'मी, तू' पणावांचून सहजस्थिति व कृष्णाची अभेदभक्ति असावी,

सर्वदा ॥ २८ ॥ उद्धवासी ज्ञान गुप्त । उपदेशील कृष्णनाथ । एका जनार्दना विनवित । दत्तचित्त त्वां दीजे ॥ ४२९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां देवस्तुत्युद्धवविज्ञापनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

---

# अध्याय सातवा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो चतुरक्षरा । चतुरचित्तप्रबोधचंद्रा । जनार्दना सुरेंद्रइंद्रा । ज्ञाननरेंद्रा निजबोधा ॥ १ ॥ तुझी करितांचि गोठी । प्रगटसी पाठीपोटीं । सन्मुख ठसावसी दृष्टीं । हृदयगांठी छेदूनि ॥२॥ छेदूनि विषयवासना । स्वयें प्रगटसी जनार्दना । भवअभवभावना । नेदिसी मना आतळों ॥३॥ आतळतां तुझे चरण । आकळलें राहे मन । सहज देशी समाधान । आनंदघना अच्युता ॥४॥ ऐशिया जी गुरुनाथा । समसाम्यें चरणीं माथा । पुढील परिसावी जी कथा । जेथ वक्ता श्रीकृष्णु ॥ ५ ॥ उद्धवें विनविलिया-वरी । कृपाकळवळला श्रीहरी । निजज्ञान अतिविस्तारीं । बोधकुसरीं सांगतु ॥ ६ ॥ होतें कृष्णाचे मानसीं । मज गेलिया निजधामासी । माझें निजज्ञान कोणापासीं । अतियत्नेंसीं ठेवावें ॥ ७ ॥ तंव देखिली उद्धवाची अवस्था । सुख जाहलें श्रीकृष्णनाथा । वैराग्ययुक्त उपदेशितां । होये सर्वथा निजज्ञान

---

हेंच संतांपाशीं पुनःपुनः सर्वदा मागणें आहे. २८ आतां श्रीकृष्णनाथ उद्धवाला गुप्तज्ञानाचा उपदेश करील तरी तूं मला सावधान चित्तत्त्व दे, असें एका विनवीत आहे. ४२९.

इति श्रीमद्भागवत पुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह देवस्तुति व उद्धवविज्ञापना या नांवाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

हे चतुराक्षरा जनार्दना! चतुरांच्या चित्ताला ज्ञानरूपी आल्हाद देणाऱ्या चंद्रा, हे देवेंद्राच्याहि देवा! हे ज्ञाननरेंद्रा, म्ह० हे ज्ञानीपुरुषांतील श्रेष्ठा, हे आत्मबोधा, १ तुझें नांव घेतांच तूं बाहेर आणि आंत प्रकट होतोस. डोळ्यांपुढें उभा रहातोस. हृदयांतील चिज्जड ग्रंथीचा छेद करितोस. २ विषयवासना तोडून तूं स्वतः प्रकट होतोस. हे जनार्दना! संसार व मोक्ष यांच्या वासनेचा तूं मनाला स्पर्श होऊं देत नाहींस. ३ तुझ्या चरणस्पर्शानें माझें मन स्थिर होऊन रहातें. त्यामुळें हे आनंदघना! अच्युता! तूं परम समाधान देतोस. ४ अशा हे गुरुनाथा! तुझ्या चरणावर मी समभावानें मस्तक ठेवितों व ज्यांत श्रीकृष्ण स्वतः वक्ता आहे ती कथा ऐकावी असें विनवितों. ५ उद्धवानें विनविल्यावर श्रीहरि दयेनें गहिंवरला व त्यानें अति कुशलतेनें आत्मज्ञान विशद करून सांगण्यास आरंभ केला. ६ कृष्णाच्या मनांतहि होतेंच कीं, आपण निजधामास जातांना कोणापाशीं तरी आत्मज्ञान मोठ्या यत्नानें ठेवून जावें. ७ तेव्हां उद्धवाची ती स्थिति पाहून श्रीकृष्णाला मोठें समाधान वाटलें. वैराग्यानें युक्त असलेल्या याला उपदेश केला असतां आत्मज्ञान अवश्य होईल असें